
साप्ताहिक

# माणूस

१९ मार्च/८३
दोन रुपये

## ज्याचा पोवाडा गावा असा एक गाव..



साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : बाविसावे

अंक : चाळीसावा ४२

□

१९ मार्च १९८३

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ

सुभाष अवचट


# इथून–तिथून

## ' गांधी 'चा परिणाम

रिचर्ड अॅटनबरोंच्या ' गांधी ' या चित्रपटाचे जगात सगळीकडे जोरदार स्वागत झाले. त्यावर उलटसुलट प्रतिक्रिया आल्या.

पण व्हर्जिनियाची ही बातमी पहा. लेस्ली कोले ही २८ वर्षांची नौदलात काम करणारी मुलगी. गेल्या महिन्यात तिनं 'गांधी' पाहिला आणि नसतीच आफत ओढवून घेतली. 'गांधी' पाहिल्यावर तिची सद्‌विवेकबुद्धी जागृत झाली आणि तिने वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगितले, ' मी आता यापुढे नौदलाचा गणवेश घालणार नाही की इथली कामे करणार नाही ! मी जर हा गणवेश घालणार असेन तर माझा त्यावर विश्वास असला पाहिजे; पण माझा त्यावर विश्वास नाही. असं असताना काही करणं हे माझ्या स्वभावाच्या विरुद्ध आहे !'

असा साक्षात्कार वगैरे होणे ' गांधीं'ना मानवेल; पण इथल्या लष्कराचे काही नियम आहेत. तिच्यावर लष्करी खटला भरून तिला ३७५ डॉलर दंड व ६० दिवसांची सक्तमजुरीची शिक्षा फर्मावली !

## ११·७५ लाख बेकार

भारतात ११·७५ लाख अर्जदारांनी डिसेंबर ८२ पर्यंत नोकरी मिळावी म्हणून एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजेसकडे अर्ज केले. ही माहिती मजूर राज्यमंत्री धर्मवीर यांनी राज्यसभेत दिली. आदल्या वर्षापेक्षा हा आकडा जास्त होता.

३१ डिसेंबर ८२ पर्यंत देशातील वेठबिगारांची संख्या १,५२,३३८ होती. त्यापैकी १,११,७६९ वेठबिगारांचे पुनर्वसन केले.

## जिस देश मे गंगा....

दरवर्षी पुरामुळे सरासरी १३६८ जण मृत्यू पावतात, तर २९० कोटी रुपयांची हानी होते असे १९५३-८२ दरम्यानच्या पुराच्या अभ्यासात आढळले असल्याचे राज्यसभेत जलसिंचन–राज्यमंत्री मिर्धा यांनी सांगितले.

८ राज्यांतील पुरांमुळे ४५% मृत्यू झाले असून ते गंगेच्या खोऱ्यात घडले आहेत. एकूण नुकसानीच्या ६६% नुकसान गंगा ज्या राज्यात आहे तेथे घडलेले आहेत. □

## सप्रेम नमस्कार

□ १२ फेब्रुवारीचा अंक नुकताच वाचला. त्यात अॅड. विकास देशपांडे ह्यांच्यावर झालेला पोलीसहल्ला ते वकील होते म्हणून झालेला नाही, म्हणून बार–असोसिएशनच्या उपाध्यक्ष शालिनी राणे ह्यांनी ठराव केल्याचे वृत्त वाचले. असोसिएशनचे दोन हिस्से ह्या मुद्द्यावर झालेले दिसतात. काही वकील तरी राणे ह्यांच्या मताचे असावेत म्हणूनच हा ठराव त्या करवून घेऊ शकल्या. इतर वकिलांनी त्यांचा निषेध केला व त्यांचे सभासदत्व रद्द केले, त्या अर्थी त्या अल्पमतात असाव्यात ही समाधानाची बाब.

राणे ह्यांनी मांडलेली बाजू (!) लक्षात घेण्यासारखी आहे. ती खरी धरली तर मास्तरांनी मुलाला मारलं म्हणून आता पालक तक्रार करू शकणार नाहीत. मी तुमचा म्हणून त्याला मारलं नाही, माझा विद्यार्थी म्हणून मारलं असे मास्तरांनी म्हटले की झाले. हुंडाविरोधी चळवळ तर संपुष्टातच येईल. ' मारून टाकले आम्ही आमच्या सुनेला, तुमच्या लेकीला नाही ! ' असे सासरचे म्हणाले तर उत्तर काय देणार शालिनी राणे ? समाजात वावरताना अनेक नातीसंबंध प्रत्येक व्यक्ती निर्माण करीत असते. अनेक भूमिका पार पाडीत असते. सगळ्याच भूमिका वेगवेगळ्या करता येत नाहीत. म्हणून बापाला मुलाची केस फक्त सिनेमात तपासणीसाठी देऊन संघर्ष निर्माण करतात. विद्यापीठे परीक्षकांना स्वतःच्या नातेवाइकांचे पेपर तपासू देत नाहीत.

शालिनी राणे यांनी घेतलेला पवित्रा

वरवर तात्विक असला तरी त्याचा पाया फार ठिसूळ आहे.

२१ फेब्रुवारी, ८३ — **वसुधा धागमवार**, धनबाद (बिहार)

□ 'पोलंडचा पुरुषोत्तम लेक वालेसा' ही श्रीकांत मुंदरगी यांची नवीन रसरशीत लेखमालिका सुरू करीत आहात त्याबद्दल अभिनंदन ! चालू परिस्थिती तआपल्या देशातही सर्वांना बरोबर घेऊन जाईल असा एखादा पुरुषोत्तम हवा आहे; परंतु आपल्या देशासारख्या भिन्न भाषा, प्रकृति, धर्म, स्वभाव असणाऱ्यांच्या देशात हे कसे शक्य आहे असा प्रश्न पडतो.

आसाममध्ये नरमेध चालू असताना आपण 'मराठी विनोद' सारखे नीरोचे फिड्ल' माणूस' मधून वाजवत होतात. आम्ही फिड्ल ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हतो. स्वभाव झालाय म्हणून विकत घेत होतो. जमेल ते वाचत होतो. आणि नंतर 'जन्मभूमि', 'The week' यांसारखे Assam cover story देणारे अंकच वाचत होतो. वाचकांची मनःस्थती लक्षात घेऊन त्यांना नेमके काय पाहिजे ते द्यायला आपण चुकलात याबद्दल आपणाला क्षमा नाही. मुद्दा असा की आपला 'मराठी विनोद' आसामच्या वणव्यात जळून भस्मसात झाला. अजून तरी आसामबाबत वाचकांना उद्बोधक माहिती द्यावी. असो.

आपली ही नवी मालिका मात्र नक्कीच प्रेरणादायी आहे. या मालिकेचे पुस्तक नक्कीच खरेखुरे लोकवाङ्मय, आपल्या भाषेत अक्षरवाङ्मय होऊ शकेल. कारण माहिती व साहित्यिक गुण या दोन्हीच्या मिश्रणातून सुरुवातीचा लेख तरी चांगलाच परिणामकारी व प्रत्ययकारी उतरला आहे.

'गांधी' चित्रपटावर बरीच चर्चा झाली आहे. तरी अजूनही बरीच होईल. आपण तत्पूर्वीच 'महात्मा आणि माणूस' ही लेखमालिका (विल्यम शिरर) वाचकांना क्रमशः सादर केली होती. 'गांधी' चित्रपट पाहताना तिच्यातील काही संदर्भही आठवले. 'विल्यम शिरर' दिसला. पुनःप्रत्ययाचा आनंद मिळाला. आम्ही म. गांधींना पाहिलेले नाही; परंतु त्यांच्याविषयी खूप वाचले आहे ऐकले आहे. तरीदेखील या चित्रपटातील 'गांधी' मुद्दा म. गांधी बाबतचा आमचा सम्यक् अनुभव अधिक समृद्ध करतात.

पाकिस्तानचे संस्थापक कायदेआझम बॅ. जिना जेव्हा म. गांधींना झुलवत असतात तो प्रसंग अंगाची लाही लाही करतो. आफ्रिकेतील सत्याग्रहाचा, जालियनवाला बागेतील हत्याकांडाचा प्रसंगही हृदयस्पर्शी आहे. कित्येक व्यक्तिचित्रे त्यात नाहीत हेही जाणवते. असो.

२५ फेब्रुवारी, ८३ — **र. वा. परांजपे**, **मालाड**

---

## सामंत–सिंग चर्चा

# भुलभुलैय्या की भूमिकेत बदल ?

गिरणीसंप आता मिटणार अशी आशा गिरणीकामगारांना वाटू लागली आहे. ज्यांनी हा संप पुकारला त्या डॉ. दत्ता सामंत यांच्याशी वाटाघाटी करण्यास केंद्रसरकार गेले चौदा महिने नकार देत होतं. तब्बल चौदा महिन्यांनी केंद्राने किमान चर्चेसाठी डॉ. सामंत यांना दार उघडलंच. परिणामी कामगारांमध्ये दीर्घकाळ चाललेला हा संप आता मिटू शकेल अशी आशा निर्माण होणं स्वाभाविक आहे. त्यामुळेच अर्थसंकल्पीय विधानसभेच्या पहिल्या दिवशी, ७ मार्चला गिरणीकामगारांनी विधानसभेवर डॉ. सामंत यांनी केलेल्या लाँगमार्चला प्रचंड गर्दी केली होती.

गेल्या चौदा महिन्यांत राज्य व केंद्रसरकारने या संपाची उपेक्षाच केली. संपाने जागतिक विक्रम केला खरा; पण कामगारांचं कंबरडंही पार मोडलं. या चौदा महिन्यांत सरकारने डॉ. सामंत यांची जिरवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. सर्व प्रयत्न करूनही, अनेक देकार पुढे करूनही बहुसंख्य कामगारांना सरकार कामावर परतवू शकले नाही. संप मोडण्याचाच ज्या सरकारने गेल्या चौदा महिन्यात प्रयत्न केला, ते सरकार आता सामंतांशी चर्चा करून काही वेगळा विचार करू मागतंय का ?

नकारघंटा वाजविणाऱ्या सरकारच्या भूमिकेत आता बदल झाल्याचे उद्गार डॉ. सामंत यांनी परवाच्या सभेत काढले; पण त्यापाठोपाठच सामंत पुढे म्हणाले, 'दिल्लीत आशा वाटावी अशी बोलणी झाल्याचं वाटलं. तरी त्याच्या अगदी उफराटा अनुभव मुंबईत दादांशी बोलणी करताना आला !' 'सरकारच्या मनात नेमकं काय आहे हे समजलं नाही' हेही उद्गार सामंतांचेच. नवे केंद्रीय व्यापारमंत्री विश्वनाथ प्रतापसिंह यांच्याबरोबर झालेल्या आपल्या पहिल्या चर्चेचा तपशील, जो सामंत यांनी परवाच्या सभेत दिला, तो निश्चित आशादायक होता. मुंबई औद्योगिक संबंध कायदा कामगारहिताच्या आड येत असेल आणि कामगारांची मागणी असेल तर तो कायदा कायम ठेवावा असं आपल्याला वाटत नाही. असं नव्या व्यापारमंत्र्यांनी संपनेत्यास सांगितलं. राष्ट्रीय मिलमजदूरसंघाबाबतही हीच भूमिका व्यापारमंत्र्यांनी मांडली. गिरणी कामगारांची मुख्य मागणी हीच आहे. आपल्याच पक्षाच्या कामगार संघटनेबाबत, व्यक्तिगत का होईना, असं मत जेव्हा केंद्रीय मंत्री मांडतो तेव्हा कामगारांना संप मिटण्याची आशा वाटणे साहजिकच आहे. सामंतांनीही शेवटी जे आवाहन केलं ते असं; आता मागण्या पदरात पडणं शक्य आहे. तेव्हा जे असहाय्यतेने कामावर गेले असतील त्यांनी बाहेर यावं आणि खंबीरपणे संप चालू ठेवावा !

### संघाची प्रतिक्रिया

राष्ट्रीय मिल मजदूर संघाची सरकारच्या या नव्या भूमिकेबाबत काय प्रतिक्रिया आहे ? संघनेते खाजगीत बोलताना सांगतात, 'हा सारा भुलभुलैय्या आहे ! सामंतांबरोबरची चर्चा मोघम असून त्यातून काहीच बाहेर येणार नाही !'

मग वस्तुस्थिती काय आहे ? सरकारच्या

मनात नेमकं काय आहे, हे सामंतांनाही कोडं पडलंय. मेख आहे ती इथेच! सरकार गेल्या चौदा महिन्यांत वागलं कसं? सुरुवातीला संप मोडण्याचे आटोकाट प्रयत्न सरकारने केले. डॉ. दत्ता सामंत यांचे नेतृत्व उभे राहू नये हाच यामागील हेतू होता, आहे.

दुसऱ्या बाजूने चर्चेचे, वाटाघाटींचे सर्व दरवाजे बंद होते. सरकारच्या प्रयत्नांना कामगार बळी पडणं शक्यच नव्हतं. ही वस्तुस्थिती आहे की, कामगार राष्ट्रीय मिल मजदूर संघाला विटला आहे. संघाची हकालपट्टी ही त्यांची पहिली मागणी. गुप्त मतदानाने संघटनेस मान्यता मिळावी ही मागणी त्यासाठीच आहे. कामगार मेला तरी हरकत नाही; पण सामंतांना उभं राहू द्यायचे नाही, हीच भूमिका सरकारची या काळात राहिली. पहिले ८–१० महिने कामगारांची जिद्द कायम होती. बहुसंख्य कामगार आपल्या गावी जाऊन राहिला आहे. मुंबईत शिल्लक असलेल्यांपैकी थोडा कामगार, जो असहाय्य आहे, तो नाइलाजाने कामावर निश्चित परतला आहे. सरकारला हेच हवं होतं. मात्र त्यांना अपेक्षित यश मिळालं नाही हा भाग वेगळा. हे कामावर परतलेले कामगार आणि संघाच्या प्रयत्नाने झालेली काही नवी भरती यामुळे काही गिरण्या अंशतः सुरू झाल्या. काही प्रमाणात का होईना, कामगार कामावर परतलाय, याला परवाच्या मोर्चात डॉ. सामंत यांनी केलेल्या आवाहनाने दुजोराच मिळतो. ६० पैकी ५८ गिरण्या सुरू झाल्या असल्याचा सरकारने विधानसभेत दावा केला आहे; परंतु त्यातील कामगारांची संख्या मोजली तर संपस्थिती राहिलेली नाही, हा सरकारचा दावा मात्र खोटा ठरतो.

## सरकारची बेपर्वाई

संपाबाबत सरकार दाखवत असलेली बेपर्वाई सरकार-मालक संगनमताचेच द्योतक आहे. गिरण्यांतील जुनी यंत्रसामुग्री बदलून गिरण्यांचे नूतनीकरण करण्यास मालकांना मुक्त वाव मिळावा असंच सरकारचं धोरण आहे. नूतनीकरणाचा सरळ परिणाम कामगारकपातीत होणार आहे आणि ती कुऱ्हाड ७५हजार बदली कामगारांवर पडणार आहे. १८०,००० गिरणी-कामगार (त्या फक्त १४५,००० कायम कामगार, अधिक ७५,००० बदली कामगार. असे सुमारे अडीच लाख गिरणीकामगार आहेत; पण नव्याने सुरू होणाऱ्या गिरण्या एक लाख ४० हजार कामगारांना कामावर घेऊ शकतील असं मिल मालक संघाचं म्हणणं आहे. कामगार कामावर जात असूनही काम मिळत नाही अशी स्थिती अनेक गिरण्यांमध्ये आहे. याबाबत सरकारने त्रिपक्ष समिती नेमलीय. कामगार–संघटना (म्हणजे संघच), मालक-संघ आणि सरकारचे प्रतिनिधी यांची; पण ७५ हजार कामगारांचे काय करणार? न्या. देशपांडेंच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीचा अहवाल अद्याप यायचा आहे; पण त्या समितीच्या शिफारसी सरकारच्या शक्यतेच्या कक्षेतीलच असणार यात शंका नाही.

ज्या गिरण्या सुरू होऊ शकणार नाहीत असं सांगितलं जातं, त्या गिरण्या अशा :– कोहिनूर मिल क्रमांक १,२,३ मुकेश, मधुसूदन सीताराम, ब्रॅडबरी. यापैकी मुकेश आणि सीताराम या गिरण्या बंद करण्याची मालकांनी मागितलेली परवानगी सरकारने नाकारली आहे. टाटा, फिन्लेगोल्डमोहर, पोद्दार, मफतलाल क्र. ४ या आणखी काही गिरण्या. पैकी सुमारे दहा गिरण्यांना किमान दोन कोटींची आर्थिक गरज लागेल असं सरकारने विधानसभेत सांगितलं आहे. या काही गिरण्यांनी दाखविलेला तोटा पाहायला हवा. कोहिनूर–३९ ते ४७ कोटी रुपये, टाटा – ११ कोटी रुपये, मधुसूदन – ११ कोटी रुपये, सीताराम – ८ कोटी रुपये, ब्रॅडबरी – ८ कोटी रुपये. (रा. मि. म. संघाचे माजी अध्यक्ष वसंतराव होशिंग यांनी दिलेली आकडेवारी) या गिरण्यांची सरकारडे आता मागणी आहे, दीर्घ मुदतीची आणि अतिशय सवलतीच्या व्याजदराने कर्जे देण्याची. स्वतःच्या अन्य उद्योगांतून पैसा उभारण्यास हे मालक तयार नाहीत.

गिरणीमालक कामगारांना अधिक काही देऊ इच्छीत नाहीत आणि सरकारचा रा. मि. म. संघ टिकवायचाय, या पार्श्वभूमीवर दिल्लीत केंद्रीय व्यापारमंत्री डॉ. सामंत यांच्याशी चर्चा करताहेत. खर्ची आणि ८१ चा बोनस यापलीकडे कोणतीही पगारवाढ सरकार द्यावयास तयार नाही. गिरणीकामगारांचं कंबरडं मोडल्यानंतर आता रा. मि. म. संघाला कामगारांमध्ये पुन्हा स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न सरकार करतंय. संघाच्या नेतृत्वात झालेले बदल हे त्याच्या वातारणनिर्मितीसाठीच आहेत.

## फाळके, नाईक कशासाठी?

संघाबद्दल विश्वास निर्माण करण्याचं काम आपण करू असं वसंतदादांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्याच पत्रकार–बैठकीत सांगितलं होतं. आता दादांनी आपले मेव्हणे मनोहर फाळके आणि एक विश्वासू सहकारी हरिभाऊ नाईक यांची संघाच्या सल्लागारपदी नेमणूक केली आहे. एन. के. भट यांच्याकडे यापूर्वीच संघाचे अध्यक्षपद सोपवलं आहे. होशिंग, भोसले या स्थितीला तरी संघापासून बाजूला करण्यात आले आहेत. गिरणीधंद्यातील माहिती असलेला माणूस म्हणून हरिभाऊ नाईक यांची नेमणूक झाली आहे, तर पश्चिम महाराष्ट्रातील गिरणीकामगारात (जे आपल्या गावी जाऊन राहिलेत) विश्वास निर्माण व्हावा म्हणून फाळकेंची नेमणूक. दादा पश्चिम महाराष्ट्रातले. गिरणीकामगारांची कुटुंबं तिथं आहेत. त्यामुळे काही बदल होतोय असा विश्वास निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे; पण संघाच्या गोटात या बदलाचं तात्पुरती राजकीय सोय असंच वर्णन केलं जातंय आणि ती वस्तुस्थिती आहे. कामगारांच्या मागण्या मान्य होण्यात त्यांचे समाधान होणार आहे. फाळके–नाइकांच्या नेमणुका या निव्वळ मलमपट्टचा ठरणार आहेत. १९६२ ते १९७२ या काळात दादांनी ज्या संघाचं नेतृत्व केलं त्याला वाचविण्याचा प्रयत्न दादा आता मुख्यमंत्री म्हणून करताहेत.

गिरणीमालक अजूनही अडून बसलेत. सरकार पाठीशी आहेच; पण सरकारला संघालाही तगवायचंय आणि स्वतःलाही. त्यातलीच एक रणनीती म्हणून डॉ. दत्ता सामंत यांच्याशी चर्चा करण्याची तयारी केंद्राने दाखविली आहे. संपाच्या चौदा महिन्यांनंतरही हे त्रांगडं कायम आहे. सहा महिन्यांपूर्वी मार्ग निघण्याची आशा डॉ. सामंत यांनी व्यक्त केली होती. त्यानंतर पुन्हा सहा महिने गेले. चौदा महिन्यांनंतर सरकारच्या भूमिकेत बदल झाल्याचे आणि आशेचा किरण असल्याचे सामंत पुन्हा म्हणताहेत. यानंतर किती महिने जाणार? ते जितकं सरकारवर अवलंबून आहे तितकंच डॉ. सामंत यांच्यावरही!

–कपिल पाटील

# मुक्काम मुंबई

मुंबईत एकूण सगळं कसं छान चाललंय. छान म्हणजे अगदी उत्तम! पाण्याची बोंब आहेच. बस-रेल्वेला भाविकांची गर्दी तर विचारू नका. त्यात पुन्हा, रेल्वेपास भाड्याचे दर घसघशीत वाढले आहेत आणि तिथे फ्लोराफाउंनटजवळ सरदार पसरिचा–मोटर वाले आणि फेरीवाले यांचा झनक झनक पायल बाजे चालू आहेच. आता बोला!

एक सांगतो. मुंबईचं पब्लिकही आता पूर्वीसारखं राहिलं नाहीये. पूर्वी पाणी आलं नाही की लोक महापालिका आयुक्तांच्या हपिसासमोर रिकाम्या बादल्या दे दणादण वाजवायचे. हल्ली लोक पाण्याचे पाइप्स प्लग करून चक्क पाणी चोरतात. अशा चौर्यकर्मापायी महापालिकेला लाखो रुपयांचं नुकसान सोसावं लागत आहे हे सांगून आता आयुक्तांचा घसा सुकलाय; पण छे, लोक कसचे ऐकतात? आयुक्तांच्याच सांगण्यानुसार या 'अशा' कामात पश्चिम उपनगरातला एक आय कॉंग्रेसचा आमदार आघाडीवर आहे. थोडक्यात राष्ट्र प्रगती के पथ-पर आहे हे खरं!

तसंच, पूर्वी रेल्वेगाड्यांची गर्दी मानवेनाशी झाली की लोक मरेपरेच्या (मध्य रेल्वे–पश्चिम रेल्वेच्या) जनरल मॅनेजरला जाऊन भेटायचे. आपली गाऱ्हाणी मांडायचे अन् चहा पिऊन घरी यायचे.

आता लोक रुळावर चक्क झोपतात अन् गाड्या अडवतात. या अशा नाड्या आवळल्यामुळे रेल्वेवाले कसे रुळावर येतात.

तर एकूण सगळं असं चाललंय. सर्वत्र चैतन्याचे अन् उत्साहाचे वारे वाहताहेत. आता आदिक-वसंतदादांचंच बघा ना. जाहीर सभांतून आणि भाषणांतून दोघेही जण परस्पर प्रेमाची इतकी ग्वाही देतायेत की तमाम पब्लिक खुश झाली आहे.

अर्थात, कुचका नारळ ठेवणारे कपाळकरंटे हे आहेतच. दादा मंत्रिमंडळातल्या दोन ज्येष्ठ मंत्र्यांची 'आतली' लफडी बाहेर काढली जातील असं बोललं जातंय. काही उद्यमशील पत्रकार या उद्योगाला अगदी घरचं कार्य समजून लागले आहेत म्हणतात. म्हण दे!

तिकडे शरदरावनी फ्लोराफाउंटनच्या फेरीवाल्यांचा ज्वलंत प्रश्न हाती घेतला आहे. एखाद्या धूमकेतूसारखे राव भरल्या रात्री उगवतात. फेरीवाल्यांना भराभर गोळा करतात अन् 'यह गरीब हॉकर्स के साथ खेल मत करो' असा दणदणीत दमवजा इशारा देऊन अंतर्धान पावतात. नंतर 'गरीब' फेरीवाले (फ्लोराफाउंटनजवळचे सगळे फेरीवाले 'गरीब' आहेत आणि इम्पोर्टेड घड्याळं, टू–इन–वन, अत्तरं विकण्याचा 'गरीब' धंदा करतात.) ऑम्लेट सँडविच खायला जातात.

मृणाल गोरे, प्रमिला दंडवते प्रभृतींनी पुन्हा रणशिंग फुंकले आहे. परवा आंतरराष्ट्रीय महिलादिनानिमित्त निघालेला मोर्चा एकदम टेसात झाला. तुमचं माहीत नाही, आमच्याकडे आयाबहिणींनी हत्यारं (म्हणजे लाटणी, चिमटे वगैरे) परजायला सुरुवात केली आहे.

बाकी सगळं ठीक चाललंय. नेहमीप्रमाणे स्टेट बँकेला फोन जोडला की मेसर्स रज्जबअली तय्यबअली ट्रान्सपोर्ट कंपनीत बेल वाजते. इरॉसपासून मंत्रालयापर्यंतचा रस्ता जागोजागी खोदून ठेवला आहे. चर्चगेट स्टेशनजवळचा बॉलपेनवाला मजेत आहे. पेडररोड भागात फ्राइड चिकनचे लचके तोडत 'गांधी' वर चर्चा अजूनही चालू आहे. टॅक्सीवाले नेहमीप्रमाणे सुटे पैसे देत नाहीत. आणि हो, एक विसरलोच! नेहमीप्रमाणे सूर्य रोज उगवतो अन् ल्याला जातो. बस्स!

□

### अकबर उवाच

गेल्या सोमवारी संजय विचार मंचचे आद्य प्रणेते अकबर अहमद यांची टीसेंटरमध्ये दणदणीत प्रेसकॉन्फरन्स झाली.त्यातला काही उद्‌बोधक भाग देत आहे.

: आपलं राजीव गांधींविषयी काय मत आहे?

: ही इज अ नॉन–एन्टिटी.

: फोतेदार–धवन मंडळी?

: अहो, हे सगळे कारकून आहेत ओन्ली क्लार्क्स.

: महंमद युनुसने मनेका गांधींविषयी जे लिहिलं आहे त्याबद्दल तुम्हाला काय वाटतं?

: काय वाटायचं? युनुस हा नेहरू-गांधी कुटुंबातला साधा गडी आहे. ही इज अ डोमेस्टिक सरवंट.

: तुम्ही अंतुलेना भेटलात का?

: नो कॉमेंट्स.

: अेनी टॉक ऑन फोन?

: आय डोंट वॉन्ट टू पुट माय फ्रेंडस् इन डिफिकल्टी.

: तुमच्या पक्षाला पैसा कुठून मिळतो?

: जियून श्रीमती गांधींना मिळतो.

: तुम्ही हाजी मस्तानला वारंवार भेटता असं बोललं जातं ...

: साफ खोटं. लास्ट टाइम आय मेट हाजी वॉज अॅट हिज डॉटर्स वेडिंग. पण एक सांगतो, १९७८ मध्ये हाजींनी कॉंग्रेस (आय) ला मदत केली आहे. आमेन.

—विष्णू जयदेव


दुसरी आवृत्ती

एक होता कार्व्हर

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

प्रकाशनाच्या वाटेवर

'माणूस' १९८२ दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेली

आयडा स्कडर

या आद्य मिशनरी स्त्री डॉक्टरची अपूर्ण जीवनकहाणीही लवकरच पूर्ण पुस्तकरूपात.

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

राजहंस प्रकाशन, पुणे

या ना त्या निमित्ताने...

फिरोझ रानडे

# दबाव-तंत्र, दबाव-यंत्र व श्याम

वा ! अंदाजपत्रक असावे तर असे !' श्याम त्या सकाळी वर्तमानपत्रात आलेले अंदाज–पत्रक वाचता वाचता जवळजवळ ओरडलाच. राधाने त्याच्याकडे फक्त भुवया वर करून पाहिले व ती हातातले काम करू लागली.

खरे म्हणजे इतर सर्वसामान्य जनांप्रमाणे श्यामला अंदाजपत्रकातले ओ का ठो कळत नसे. त्यातले Direct taxes, indirect taxes ह्यातला फरक त्याला किती तरी दिवस कळला नव्हता.

सरकारी नोकर असल्यामुळे त्याची कचेरी त्याच्या पगारातून आम–कर आधीच कापून घेत असे. त्यामुळे direct tax म्हणजे काय हे त्याला फक्त माहीतच नाही तर जाणवतही असे; पण Indirect tax हे त्याला पुष्कळ दिवस कोडे होते. वेगवेगळे उद्योगपती, व्यापारी मोठ्या अधिकाऱ्यांना वा मंत्र्यांना पैसे देतात ते म्हणजे indirect tax अशी त्याची भोळी समजूत होती.

मग एकदा त्याच्या सज्जन पण थोडेसे अर्थशास्त्र जाणणाऱ्या मित्राने पगारातून कापला जातो तो थेटकर व आपण सिगरेट पितो त्यावरचा कर वाढला की तो व्यापाऱ्याकडून जरी घेतला जात असला तरी त्या व्यापाऱ्याला मुळात आपणच तो देत असतो तो indirect tax वगैरे श्यामच्या पैशाने सिगरेट विकत घेऊन सोदाहरण समजावून सांगितले, त्या वेळी श्यामच्या डोक्यात थोडा प्रकाश पडला होता.

राधाला श्यामच्या डोक्यात पडलेल्या ह्या प्रकाशाच्या थोडेपणाची कल्पना होती. त्यामुळे आज नुसते अंदाज–पत्रक पाहून त्याने 'अंदाज-पत्रक असावे तर असे' ओरडत सुटावे ह्याचे तिला आश्चर्य वाटले.

'झाले बहु–होतील बहु–पण ह्या सम हा. वा ! राष्ट्राच्या भावना जाणणारा असा अर्थमंत्री पाहिजे' श्याम अजुनी अंदाज-पत्रकानंदातच डुचमळत होता.

राधाने आता हातातले काम सोडले व श्यामकडे पाहू लागली. 'झाले बहु, होतील बहु' हे हिंदुस्थानच्या अर्थ-मंत्र्याबाबत खरे आहे हे राधालाही माहीत होते. 'पण ह्या सम हा' म्हणण्याइतके ह्या अर्थ-मंत्र्यात खास काय आहे हे तिला कळेना. सगळेच अर्थ-मंत्री दरवर्षी ठराविक म्हणजे जादा कर बसवणारे अंदाज-पत्रक सादर करत असतात. आता तर काय एक सोडून तीन–तीन अंदाजपत्रके सादर करण्याची टूम निघत चालली आहे ! एक रेल्वेचे, एक पोस्टाचे व एक मुख्य ! आणि सगळ्यात काय केले असेल तर कर-वाढच. तेव्हा 'ह्या सम हा' म्हणून अर्थ–मंत्र्यांचे एवढे कौतुक का करताहेत हे तिला कळेना.

'पण एवढे काय आहे अंदाज–पत्रकात ते तर सांगा !' राधा उत्सुकतेने विचारती झाली.

पण श्यामची त्या आनंदसागरातून वर येण्याची तयारी नव्हती. तो स्वतःशीच बोलतात त्या पद्धतीने म्हणाला, 'आकडे–मोड, करवाढ वगैरे तर काय सगळेच करतात; पण राष्ट्राच्या मान-चिन्हाला अशा तऱ्हेने आपल्या पत्रकात मान देणारा हा पहिलाच अर्थमंत्री !'

आता मात्र राधा चिडीला आली. आता एखाद माणूस व तोही नवरा काही कारण-मीमांसा न करता नुसतंच एखाद्याचे कौतुक करू लागला तर राधाच काय पण कोणतीही बाई चिडीला आली असती.

'हे पहा काय ते स्पष्टपणे सांगणार आहात का ? नाही तर माझ्याशी गाठ आहे !'

राधाची ही धमकावणी ऐकताच पत्रकानंदात डुचमळणारा श्याम तातडीने वर आला व सांगू लागला, 'अग, ह्या वेळच्या अंदाज–पत्रकात दबाव-यंत्रावरचा म्हणजे प्रेशर–कुकरवरचा काही कर कमी केला आहे. म्हणजे तो आता स्वस्त होणार आहे. राष्ट्राच्या भावना समजणारा ...'

'मग त्यात काय मोठे ?' नाटकात एका पात्राचे वाक्य पुरे होण्याआधी दुसरे पात्र जसे घाईघाईने बोलते तसेच राधा म्हणाली.

कारण श्यामला ह्या गोष्टीचा इतका आनंद का व्हावा तेच मुळात कळले नव्हते. ठीक आहे. दबावयंत्र थोडे स्वस्त होईल; पण ती काही दररोजच्या विकत घेण्यातली गोष्ट नाही. प्रेशर कुकर स्वस्त होणार असला तरी त्यातल्या कुक करण्याच्या गोष्टी म्हणजे तांदूळ, डाळ, भाजी वगैरे तर महागणारच होत्या ना ? काय पण नवरेलोकांची डोकी असतात. प्रेशर कुकरची किमत थोडी कमी झाली तर 'ह्या सम हा' काय व ह्या आनंदाच्या उकळ्या काय !

पण हे सगळे उघड उघड न म्हणता ती म्हणाली, 'अहो, केला असेल कुकरवरचा कर थोडा कमी व होईल त्यामुळे तो थोडा स्वस्त; पण त्याचे काय एवढे ? बाकीच्या गोष्टी...'

आता श्यामने राधाला आपले वाक्य पुरे करू दिले नाही. 'नाही, नाही ही फक्त एखाद्या वस्तूवरचा कर कमी करण्याची बाब नाही. हे हिंदी जनतेच्या कौटुंबिक व राजकीय जीवनातल्या एका गोष्टीला, एका विचारप्रणालीला राजमान्यता देण्यासारखे आहे. प्रेशर-कुकर म्हणजे आपल्या राष्ट्राचे मानचिन्ह आहे !'

आता मात्र राधाच्या मनातले प्रेशर, प्रेशर–कुकरमध्ये होते त्यापेक्षाही दाट झाले. 'अहो, तुम्ही काय त्या कंपनीचे अेजंट की विक्रेते ? की त्या प्रेस्टीज वा हॉकिन्ससाहेबांचे जावई ? काय मेली ती साधी गोष्ट आणि त्याकरता अगदी चळ लागल्यासारखे बोलावयाचे ?' असे म्हणून ती कुकर लावण्याकरता म्हणून स्वैपाकघरात निघून गेली.

श्यामच्या दबाव-यंत्राबाबतच्या भावना राधाला कळणे अवघड होते व त्या समजून सांगणे हे श्यामला जास्तच अवघड होते.

प्रत्येक राष्ट्राला वा समाजाला अेक मान-

चिन्ह (symbol) असते. ते परिस्थिती अनुरूप बदलते वा त्याचा अर्थ बदलत असतो. त्या चिन्हाने राष्ट्राच्या भावना व्यक्त केल्या जातात.

हिटलरने नाही का सत्तेवर आल्यावर आपण आर्यवंशीय आहोत ह्या अभिमानाचे प्रतीक म्हणून स्वस्तिक हे मान-चिन्ह निवडले ? त्यांचे झेंडे स्वस्तिकाचे होते. हातावरच्या पट्टयांवर, डोक्याच्या टोपीवर स्वस्तिके असत.

दुसऱ्या महायुद्धात चर्चिलने दोन बोटांचा V for victory ची खूण नुसती लोकप्रियच नाही केली तर त्याने आपल्या लढणाऱ्या फौजांना आत्मविश्वास मिळवून दिला व युद्ध जिंकले.

तेच सोविएत रशियाचे मान-चिन्ह हातोडा व कोयता अगदी वेगळ्या अर्थाने योग्य ठरले. हातोडा ही कामगारांची निशाणी व कोयता ही शेतकऱ्यांची. लालभडक झेंड्यावर आपला हातोडा व कोयता पाहून काय आनंद झाला असेल त्या शेतकऱ्यांना व कामकऱ्यांना ! जगात प्रथम कोणा राष्ट्राच्या निशाणावर त्यांची मान-चिन्हे आली होती.

अजूनही रशियाच्या झेंड्यावर हातोडा व कोयताच आहेत; पण त्यांचा संदर्भ बदलला आहे. आता कोणी सरकारच्या विरुद्ध उभा राहिला की त्याच्या डोक्यात हातोडा बसतो व कोणी विरोधी बोलू लागला की कोयत्याने त्याची जीभ कापली जाते !

दबाव-यंत्राबाबत श्यामच्या 'स्वस्तिक' 'V' वा 'हातोडा व कोयता' भावना होत्या.

कोणताही प्रेशर कुकर वा दबावयंत्र असो, त्यात दबाव वाढवून काम लवकरात लवकर करून घ्यावयाचे हे दबाव-तंत्र त्यामागे असते. ह्या यंत्राचा शोध भले प्रेस्टीजसाहेबाने वा हॉकिन्ससाहेबाने लावला असेल पण त्या तंत्राचा शोध श्यामच्या एका काकूने लावला ह्याबद्दल श्यामला नुसती खात्री नव्हे तर रास्त अभिमानपण आहे.

आपणा हिंदी लोकांचे नशीबच खत्रुड ! त्या रेडिओचा शोध नाही का प्रथम जगदीशचंद्रांनी लावला ? पण हे श्रेय गेले त्या मॉरकनी का कोणा साहेबाला. चलच्चित्रपटाचा शोध आपल्या नाशिकच्या दादासाहेबांनी लावला; पण श्रेय गेले कोणा दुसऱ्याच विलायती साहेबाला. तसेच ह्या दबाव-यंत्रामागले तंत्र शोधले श्यामच्या काकूंनी, पण श्रेय ? पण ते जाऊ द्या.

दाब देऊन, दबाब वाढवून आपले काम चटाचटा करून घ्यावयाचे तंत्र श्यामच्या काकूने नुसते शोधूनच काढले असे नव्हे तर त्याचा महात्माजींच्या सत्याग्रहाप्रमाणे यशस्वी उपयोग पण केला.

एखादी गोष्ट श्यामच्या काकांनी केली ना केली; पण काकूंच्या मनाप्रमाणे झाली नाही की काकू आपल्या दबाब-तंत्राचा उपयोग करत असे. प्रथम म्हणजे ती काकांबरोबरचे बोलणे टाकावयाची. बाकी सगळ्यांशी बोलावयाचे-चालावयाचे पण काकांशी शब्दही नाही !

मग काकांची फार तिरपिट उडे. श्यामचा काका कलेक्टरकचेरीत-त्या वेळच्या कलेक्टरकचेरीत सुपरिंटेंडेंट होता. म्हणजे जणु वाघच की; पण हा वाघ काकूच्या दबाब-तंत्रापुढे शेळीसुद्धा रहात नसे. न केलेली कामे वा काकूच्या मनाप्रमाणे न झालेली कामे तर तो करून टाकावयाचाच; पण काकू खूष व्हावी म्हणून कचेरीतली महत्त्वाची कामे सोडून तो लवकर घरी यावयाचा. 'तुझी आई खूप दिवसात आली नाही, तुझा भाऊ फार उमदा माणूस आहे हां' वगैरे चमचेगिरीत्मक वाक्ये पेरावयाचा; पण काकू अशी नाठाळ की, एक शब्द बोलत नसे !

म्हणून तर मघाशी राधा 'माझ्याशी गाठ आहे' म्हणून तंबी दिल्यावर श्याम अंदाज-पत्रकानंदाच्या सरोवरात डुंबत होता तो तातडीने वर आला होता.

आता काका-काकूंची दिलजमाई कशी व केव्हा होत असे हे श्यामच्या बालबुद्धीला कळले नाही. पुढे राधाही त्याच तंत्राचा वेळी-अवेळी उपयोग करू लागली त्या वेळी काका-काकूंची दिलजमाई केव्हा व कशी होत असेल ह्याचा त्याला अंदाज आला; पण तो अंदाज चारचौघात सांगण्यासारखा नाही.

स्वातंत्र्यपूर्वकाळात राष्ट्रपिता महात्मा गांधींनी हे दबाब-तंत्र फार मोठ्या प्रमाणात व फार यशस्वीपणे वापरले. त्यांच्या दबाब-तंत्रात उपासाला महत्त्व होते. चळवळीत काही हत्या झाली, झाला ह्यांचा दबाब-उपास सुरू. हरिजनांना वेगळे मतदारसंघ देताय ? डॉ. आंबेडकर ऐकत नाहीत ? झाला ह्यांचा दबाब-उपास सुरू. पाकिस्तानसारख्या आपल्या बंधु-राष्ट्राने फक्त काश्मिरवर हल्ला केला म्हणून त्याचे पंचावन्न कोटी अडकवताय ? झाला ह्यांचा दबाब-उपास सुरू ! द्यायला लागले सरकारला ते पंचावन्न कोटी रुपये !

अर्थात गांधींनी फक्त आपल्या लोकांवरच दबाब आणला नाही, परकी सरकारवर पण आणला. सत्याग्रह करून, परदेशी मालावर बहिष्कार टाकून ब्रिटिश सत्तेला जेरीला आणले व स्वातंत्र्य मिळवून दिले. आता काही लोक म्हणतात की, क्रांतिकारकांच्या कृत्यांमुळे वा सुभाष बोसांच्या आझाद हिंद फौजेमुळे सरकारवर दबाब आला व म्हणून स्वातंत्र्य मिळाले.

मग तो गांधींच्या दबाबाचा परिणाम असो वा आझाद हिंद फौजेचा दबाब असो त्या सगळ्यांचे श्रेय श्यामच्या काकूलाच जाते, निदान जावयास पाहिजे.

स्वातंत्र्यानंतर तर ह्या दबाब-तंत्राचा फार मोठ्या प्रमाणात उपयोग होऊ लागला. थोडे मार्ग बदलले, नाही असे नाही; पण मार्ग बदलले तरी तत्त्व तेच राहिले व ते म्हणजे या ना त्या मार्गाने दबाब वाढवावयाचा व आपले काम करून घ्यावयाचे.

आता कोणी उपास करत नाहीत, नाही करत कोणी सत्याग्रह. आता रोको-तंत्र वा जाळो तंत्र वापरले जाते; पण शेवटी त्याने दबाबच निर्माण होतो.

उसाला योग्य भाव पाहिजेत ? रस्ता रोको. बटाट्याला योग्य भाव पाहिजेत ? रेल रोको. विश्व-विद्यालय पाहिजे ? काही-तरी रोको. विश्वविद्यालय नको ? परत काही तरी रोको.

कोणा विशिष्ट थोर माणसाचे नाव विश्व-विद्यालयाला पाहिजे ? रेल्वेस्टेशन जाळो. विश्वविद्यालयाला त्या थोर माणसाचे नाव नको ? गरीब बिचाऱ्या दलितांच्या झोपड्या जाळो; पण काही तरी करून सरकारवर दबाब आणो हे तत्त्व !

आता सरकारला पण ह्या तंत्रांची सवयच झाली आहे. जसं मूल रडायला लागल्याशिवाय बायका दूध तापवायला वा दुधाची बाटली शोधायला सुरुवात करत नाहीत, त्याचप्रमाणे सरकारही काही तरी रोकल्याशिवाय वा काही तरी जाळल्याशिवाय वा

कोणाला तरी जिवानिशी मारल्याशिवाय हालचालच करत नाही !

आता डॉ. दत्ता सामंतांच्या गिरणीकामगारांच्या संपाचेच पहा ना ! अगदी महात्मा गांधींच्या तत्त्वावर शांततेने व कोणत्याही तऱ्हेची हिंसा न होता गेले पंधरा महिने हा संप चालला; पण केली त्याची सरकारने पर्वा ? त्यांना आत्तापर्यंत भेटीलासुद्धा बोलावले नव्हते कारण काय ? तर ते कामगारांचे खरे पुढारी नाहीत म्हणून ! म्हणजे ज्याच्या सांगण्यावरून दोन-अडीच लाख लोक संपावर जातात तो पुढारी नाही ! ! नुसता शांततेने संप करून सरकारवर दबाब कसा येणार ? हेच जर त्या कामगारांनी रस्ते रोकले असते, पोस्टऑफिसेस, दुकाने, रेल्वेस्टेशन्स्, कचेऱ्या जाळल्या असत्या, काही लोकांचे खून पाडले असते तर दबाब तयार झाला असता व संप १०–१५ दिवसांत यशस्वी झाला असता !

म्हणजे सरकारने – तेही गांधींच्या सरकारने–लोकांना धडा काय दिला ? तर शांततेने दबाब निर्माण होत नाही व मागण्या पदरात पडत नाहीत.

आसामचे विद्यार्थी गेले तीन वर्षे आपला लढा शांततेने चालवत होते. त्या तीन वर्षांत एकही मृत्यु पावला नव्हता की, झोपडी जाळली गेली नव्हती; तर त्यांच्या तोंडाला सरकारने पाने पुसली. नुसत्या चर्चा करत झुलत ठेवले. आता गरीब बिचारे शेकड्याने मरत आहेत, गावेच्या गावे जळत आहेत. आता सरकारवर दबाब आला आहे. आता तो प्रश्न कदाचित् सुटेल !

दत्ता सामंत जिंकले नाहीत तसेच आसामचे विद्यार्थी पण; ह्याचे कारण त्यांना दबाबतंत्र वापरता आले नाही.

त्या दबाब तंत्राचा शोध व प्रथम उपयोग श्यामच्या काकूने केला होता. ह्या अंदाजपत्रकात सरकारने दबाब-यंत्रावर कर कमी करून एका अर्थी दबाब-तंत्राच्या कौटुंबिक व राजकीय जीवनातल्या स्थानाला राजमान्यता दिली नव्हती का ? काकूंच्या तंत्राचा हा एकपरीने विजय नव्हता का ? त्यामुळे श्यामला अत्यानंद होणे साहजिक नव्हते का ? व त्या आनंदात त्याने अर्थ-मंत्र्यांचे कौतुक करणे योग्यच नव्हते का ?

'आता त्या बजेट कौतुक करत बसणार आहात का आंघोळ वगैरे उरकणार आहात ? नाही तर बघा मी ...' राधाचे कडाडणे पुरे होण्याच्या आधीच श्याम 'करतो, करतो,' म्हणत उठला व स्नानगृहाकडे तातडीने गेला. □

मुंबई वार्ता

# 'अस्सल' वाटणारं 'नकली' गाव

ललिता बर्वे

पायाची बोटं फूट–बोर्डवर, डाव्या–उजव्या हातानं वरची दांडी आणि मधलं हँडल धरून, खेचाखेच गर्दीतून प्रवास करणाऱ्या मुंबईकरांनी गेला पंधरवडाभर रेल्वेची दरवाढ या विषयावर चर्चा केली, अगदी पोटतिडिकीनं !

पहिल्या दिवशी संताप, मग चडफड, सरकारला तिरकस उपहासात्मक टोमणे, शिव्या, तळतळाट, सगळं काही त्यात जाणवत होतं. शंकाही खूप होत्या. भाबडया, प्रामाणिक, खवचट ! एखाद–दुसरा समजूतदार स्वरही यायचा.

पण एक मात्र खरं. मुंबईकरांना रेल्वे भाडेवाढ फारच झोंबली. फट म्हणता बजेट प्रसिद्ध झाल्यावर काही तासांतच चर्चगेट आणि व्ही. टी. वर निदर्शनं होऊ शकली.

माणसं टेकीला आली आहेत. ठिणगीची आवश्यकता आहे.

अर्थात ही वस्तुस्थिती पगारदार, नोकरीचाकरी करणारे मध्यमवर्गीय–कनिष्ठवर्गीय यांच्या बाबतीतच खरी आहे. याच मुंबईत अशीही वस्तुस्थिती आहे जिचा भाववाढ, टेकीला येणं, गांजून जाणं याच्याशी दूरान्वयानंही संबंध असल्याचं जाणवत नाही. वातानुकूलित मोठमोठ्या डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये पहा (म्हणजे 'अपना बजार' नाही ! )–वॉर्डन रोडवरचं 'इंटरशॉप', 'बेन्झर' यामध्ये भरपूर गर्दी असते ! नवनव्या फॅशन्स, दागदागिने, मित्र–मैत्रिणी यात गुंगून गेलेली माणसं तिथे दिसतील.

अशाच विलासी वातावरणाचा एक तुकडा म्हणजे वरळीचं नवं रेस्टॉरंट 'द विलेज !' ¤

रात्रीचा दहा–साडेदहाचा सुमार. नेहरू तारांगणाचा चकचकीत घुमट अस्पष्ट दिसतोय. वळणावरच्या उंच उंच इमारतींच्या आकृतिरेखा दुरून दिसताहेत. वाहनांची वर्दळही कमीच आहे. अशा वेळी 'विलेज' मात्र आपले मिणमिणते दिवे घेऊन जागं आहे.

वरळीच्या समुद्रकाठाचं हे गाव. एका बाजूला निळ्या निळ्या पाण्याचा जलतरण तलाव, त्याच्याभोवती विखरून पडलेल्या खुर्च्या, एखाद–दुसरी कमी कपड्यातली पोहणारी गौरांगना आणि दुसऱ्या बाजूला निळा नसलेला, दूषित पाण्याचा अथांग अरबी समुद्र !

हे गाव अस्सल वाटावं इतकं ते नकली आहे ! गावाची वेस म्हणजे उभ्या लाकडाचं कुंपण. फाटकातून आत शिरल्यावर ग्रामीण वातावरणाचे ठळक नमुने हिशेबीपणे मांडून ठेवलेले. सोडून ठेवलेली बैलगाडी. भाजीबाजारातल्यासारखी मांडून ठेवलेली. तिथेच दरवळणारा धुपाचा गंध. छोटचाशा झाडाभोवती बांधलेला आखीव पार आणि प्रकाशयोजनेच्या सहाय्यानं तिथं पेटवलेली शेकोटी. एवढंच काय पण उंच भिंती असणारा आडसुद्धा. त्यावरल्या रहाट आणि पोहऱ्यासकट !

हे सारं झालं गावकुसावरचं. तिथंच वाट वधण्याची सोय. इथेसुद्धा बसल्या बसल्या चाळा म्हणून तीस रुपये पेगप्रमाणे पेयही उपलब्ध. तिथे मांडलेल्या चारपायांवर बसून आणि खाटल्यांवर कलंडून त्याचा आस्वादही घेणारी गिऱ्हाइकं !

इथून गावाकडे जाणारा रस्ता. खास पॉलिश करून खडबडीत केलेला. वळणावळणाची छोटी पायवाट. कोपऱ्यावरची उभी दिवाबत्ती आणि तिच्यात ठेवलेला इलेक्ट्रिकचा कंदील. जेमतेमच प्रकाश देणारा. पायवाटेवर सांडून मांडलेलं भाताचं तूस. सिंथेटिक वाटावं असं चकचकीत !

मधूनमधून दिसणारी वारल्यांची चित्रकला. एका बाजूला चक्की आणि पलीकडे कुंभार–चाक फिरवतो गरागरा, मडकी करतो भराभरा याचं प्रदर्शन येणाऱ्या शहरी बाबूंसाठी करीत बसलेला. त्याच्या बोटात कौशल्य होतं. चाकाबरोबर, चाकाच्या गतीबरोबर भराभर आकार घेणाऱ्या मातीच्या वस्तू खरोखरच खऱ्या होत्या. रेस्टॉरंटमध्ये नोकरीला असलेला, स्वच्छ कपडे घालून बसलेला धीरुभाई हा धारावीतला कुंभार ही त्या रेस्टॉरंटमधली अतिशय खरीखुरी वाटणारी गोष्ट आणि खरीखुरी असलेलीही गोष्ट !

त्यापलीकडे 'इंडियन क्लासिकल म्युजिक' अर्थात 'फोक म्युजिक'च्या वळणानं जाणारं वाजवलं जातंय. तबला, पेटी, सनई अशी वाद्यं वेठीला धरलेली; पण मंद, सांद्र इत्यादी. खेड्यातल्या भजनी मंडळींसारखा आरडाओरडा आणि गोंगाट नाही !

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना झोपड्या, टुमदार आणि चकचकीत शाकारलेल्या. छपरं पेंढ्यांनी बनवलेली. घरगुती वळण आणि 'फील' याकरता कांद्याच्या माळा टांगलेल्या. अगदी वाईट नजर टाळण्याकरता लिंबू आणि मिरचीसकट !

जरा 'भारतीय'पणापासून दूर गेलेली गोष्ट म्हणजे बार–बे–क्यू. खरं म्हणजे या खेड्याचं बाकीचं स्वरूप आहे सौराष्ट्रातल्या खेड्यासारखं; पण बार–बे–क्यू वगैरेंनी त्याला चक्क 'मेक्सिकन टच' दिला आहे. म्हणजे खेडेगावाच्या स्वरूपाशी ही वैश्विक बांधिलकीच झाली म्हणायची !

या विलेजमधून चटपटीतपणे वावरणारी वेटर मंडळी. हीही सारी गावकरी पोषाखात. रंगीबेरंगी घट्ट सलवार, झोळदार असणारा वरचा कुडता, डोक्यावर रंगीबेरंगी रुमाल. मात्र यांची भाषा अर्थातच सफाईदार इंग्रजी.

बसायच्या खुर्च्या आणि टेबलं खरं म्हणजे जराशी गैरसोयीची, आरामात बसता न येणारी. कारण ओबडधोबड ओंडक्यांची बनवलेली; पण काय करणार ? गावात आलं की थोडीशी गैरसोय होणारच ! तीच तर गंमत, आणि त्याचा अनुभव घ्यायलाच तर लोक इकडे येतात !

टेबलांवर आणि एकूणच खेड्यात जिकडे तिकडे कंदील लावून केलेला काळोख.

व्यवस्थित प्रकाशित असलेली एकच जागा. ती म्हणजे स्वयंपाकघर.

पण हे स्वयंपाकघरही खेड्यातून दिसणारं आणि कुंभार वगैरेंसारखं प्रदर्शनातलंच. त्यामुळे तेही नीटनेटक मांडून ठेवलेलं.

इथे स्वैपाकही चुल्हाण्यावरच होतो. नीटनेटक्या सारवलेल्या चुली आणि शेगड्या. नाटकातल्या पात्रांसारखे दिसणारे आचारी. शोभेसाठी म्हणून एका कोपऱ्यात भला मोठा पापड टांगून ठेवलेला, तर दुसऱ्या कोपऱ्यात तशीच मोठी भाकरी. इथे वाढायला आणि जेवायला मातीची भांडी. एवढा सगळा प्रकार पाहून भूक वाढली नसेल, तर क्षुधावर्धक म्हणून जलजीरा ( रुपये ४ फक्त ) आणि नारियल पाणी ( रुपये ८ फक्त ) आहेतच !

यानंतरचं जेवणही परत मगाशी म्हटलेली वैश्विक बांधिलकी साधणार. तरी खिशाशी मात्र नको इतकी जवळीक करणारं. उदाहरणार्थ 'लॉबस्टर दही मसाला' रुपये पासष्ट फक्त ! 'सिकन्दरी रॅन' रुपये पंचाहत्तर फक्त !

हाच तो ग्रामीण वातावरण-जीवनाचा वगैरे हिसका !

तसं आदरातिथ्य इथेही मिळेलच. कमावलेल्या हास्यातून, वाकून केलेल्या अभिवादनातून, खमंग चवदार पदार्थातून.

पण खेडेगावातून कधीही जा, कोणत्याही ओसरीवर टेका. गूळपाणी मिळेलच. आदरातिथ्य होईल आणि गरम भाकर खाऊन जाण्याचा आग्रहही होईल.

या खेड्यातल्या आदरातिथ्याचा लाभ मात्र आधी वेळ ठरवून, अपॉइंटमेंट घेऊनच घ्यावा लागेल !

यामध्ये कशालाच विरोध नाही, की कपाळावर आठ्या चढवून, शिरा ताणून बोलावं असंही काही नाही.

माणसाला नाविन्याची आवड असते, हौस असते. विरंगुळा हवा असतो आणि त्याच्याकडे खर्च करायला पैसाही असतो.

तसा इथला कमावलेला अस्सलपणा बोचतोही म्हणा.

त्या बोचऱ्या जाणिवेतून बाहेर पडलं तर लक्षात येईल की, हा एक नवाच प्रवाह वाहतो आहे.

महेश योगींनं भारतीय योगशास्त्र, समाधी इत्यादी अमेरिकेला विकलं.

रजनीशनं त्याचा बाजार मांडला.

आणि आता गांधीजीही ब्रिटनमार्गे भारतात आयात झालेत.

एकूणच भारतीय संस्कृती, देश, वेष, आचारपद्धती ही 'इन वोग' अशी टूम, चलनी नाणं बनलीच. 'एक्झॉटिक ओरिएण्टल पास्ट' हा आकर्षणाचा विषय आहे.

त्याचा हा देशी अवतार म्हणजे ग्रामीण आकर्षण– ऊर्फ 'विलेज'.

मुंबईकरांना अस्सल ग्रामीण वातावरण पहायला दूर जायला नको. तीन–चारशे गाठीला बांधून ही विलेजची प्रेक्षणीय सहल घडेल.

एक बरंच की, विलेज तंतोतंत अस्सल नाही. नाही तर खेड्यातली उघडी गटारं, गलिच्छ रस्ते, अरुंद बोळ आणि दारिद्र्य मांडावं लागलं असतं ! न जाणो, लुसलुशीत मांसाचा तुकडा घशाखाली उतरलाही नसता ! उगीच गुळगुळीत श्रीमंतीला ठसका लागायचा !! □

---


मांडणी, विचार व देखणेपणा या साऱ्यातच 'उत्तम' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे.
—प्र. भा. भोसले
संपादक, बळीराजा मासिक

# योद्धा शेतकरी

ले. विजय परुळकर

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

मूल्य : ३६ रुपये

# एथ मी चैतन्य पाहिले !



**लेखक : विजय परुळकर । छायाचित्रें : सौ. सरोजा परुळकर**

बँक ऑफ महाराष्ट्रचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. वसंतराव पटवर्धन यांना एकात्मिक ग्रामीण विकास योजनेवर, बँकेच्या अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणार्थ तयार केलेला एक स्लाइडसेट दाखवत होतो. सेट बघून डॉ. पटवर्धनांनी काही सूचना दिल्या आणि ग्रामीण विकास ह्या विषयावर चर्चा सुरू झाली. विकासासाठी गावकऱ्यांच्यात असलेली एकी ह्याबद्दल मी काही सांगत असताना डॉ. पटवर्धन म्हणाले, 'उद्या वेळ असेल तर चला माझ्याबरोबर— तुम्हाला एक वेगळं गाव दाखवतो. तुम्ही दोघं नवरा-बायको महाराष्ट्रभर खेडोपाडी हिंडता; पण हे गाव बघून तुम्ही म्हणाल. 'गोरी तेरा गाव बडा प्यारा'— येता का सांगा उद्या?'

मी चटकन होकार न देता विषय बदलला. मनात आलं, एका मोठ्या बँकेच्या चेअरमनबरोबर खेडेगावात जायचं म्हणजे कसला तरी उद्‌घाटनसमारंभ, हार-तुरे, एखाद्या स्थानिक पुढाऱ्याचं असंबद्ध बरळणं, आभारप्रदर्शनाचं भाषण, पुन्हा हारतुरे, नंतरचं गुळमट जेवण ह्या नाटकातच सारा वेळ वाया जाणार आणि बँकेनं गावात काय केलं असणार, तर एखादी विहीर, पाच-पंधरा गायी-म्हशींसाठी कर्जवाटप, चार–दोन शिलाई मशीन्स् वगैरे— आणि फार तर गाव दत्तक घेतल्याची घोषणा. वाटलं हा सगळा प्रकार सहन करण्याऐवजी डॉ. पटवर्धनांना म्हणावं, 'गावाचं नाव सांगा, आम्ही दोघं सवडीनं बघून येऊ!'

मी टाळाटाळ करतोय हे बहुधा डॉ. पटवर्धनांच्या लक्षात आलं असावं. ते माझ्या बायकोला म्हणाले, 'सरोजाताई, तुम्हाला तर गाव निश्चितच आवडेल. फक्त दीड तासाचा रस्ता आहे. सकाळी ८ वाजता निघायचं. दुपारी दोनपर्यंत परत. येणार ना बरोबर?'

दुसरे दिवशी सकाळी पुणे–अहमदनगर ह्या संपूर्णपणे उखडलेल्या आणि दुर्लक्षित अशा राष्ट्रीय महामार्गावरून बँक ऑफ महाराष्ट्रची ॲम्बॅसॅडर धडधडत अंतर कापत होती. डॉ. पटवर्धन मला शंभर–दोनशे कोटी रुपयांची एक योजना समजावून सांगत होते आणि मी मनातल्या मनात बोटं मोजत, शंभर कोटी म्हणजे एकावर किती शून्यं हे महाकठीण गणित सोडवत होतो.

गाडीनं घोडनदी–शिरूर ओलांडून अहमदनगर जिल्ह्यात प्रवेश केला पारनेर फाट्याला गाडी डावीकडे वळली, पाच– सात किलोमीटरनंतर कुकडीचा प्रचंड कोरडा कालवा पार करून आम्ही राळेगणशिंदी ह्या गावात शिरलो.

गाडीतून उतरल्यावर पहिला प्रश्न पडला, 'हातामधील सिगरेटचं थोटूक कुठं टाकू?' इतका सर्व परिसर स्वच्छ होता. मला एकदम जगातील सर्वात स्वच्छ शहर सिंगापूरची आठवण झाली. सिंगापूर हा अफाट सधन देश. राळेगणशिंदी दुष्काळी, जिरायती शेती असलेलं लहानसं खेडं!— मग इथं इतकी स्वच्छता कशी? सर्वत्र दिसणारे काळ्या सर्पासारखे सळसळणारे सांडपाण्याचे ओघळ,

शेवाळलेली निळचाकाळचा पाण्याची डबकी, त्यात डुंबणारी डुकरं, उकिरडयाचे डोंगर, त्यावर लोळणारी गाढवं, घोंगावणाऱ्या माशा, जागा मिळेल तिथं शेवया वाळत घालाव्या त्याप्रमाणे जंतांचे पुंजके टाकत बसलेली रोगट ढेरपोटी मुलं, पचापचा थुंकणारी आणि नाक शिंकरून समोर दिसेल त्यावर बोटं पुसणारी माणसं– आणि वातावरणात भरून राहिलेला माणसाच्या आणि जनावराच्या मलमूत्राचा दर्प हे ग्रामीण भारतामधील खेडयांचे खास अलंकार! राळेगणशिंदीमधून हे सर्व पिढीजात 'दागिने' गेले तरी कुठं?

संपूर्ण गाव फिरून आलो; पण कुठंही वरीलपैकी एकही 'दागिना' पहायला मिळाला नाही.सर्वच अद्भुत! सर्व प्रथम हे गाव दाखवल्याबद्दल डॉ. वसंतराव पटवर्धनांचे मन:पूर्वक आभार मानले आणि पुण्याला परत निघालो तेव्हा ठरलं, राळेगणशिंदीवरून 'कुठली' जादूची कांडी 'कुणी' आणि 'कशी' फिरवली ह्याचा शोध घ्यायचा. सरोजानं संपूर्ण गावाची, तेथील दैनंदिन जीवनाची फोटोग्राफी करायची. डॉ. वसंतराव पटवर्धनांना कल्पना पटली. आम्हा दोघांना जेव्हा आणि जितक्या वेळ राळेगणशिंदीला जायचं असेल तेव्हा गाडीची सोय करतो असं त्यांनी सांगितलं. फोटोग्राफीचा संपूर्ण खर्च देऊ केला आणि स्लाइटसेट चांगला झाल्यास सरोजाला मानधन देईन असंही आग्रहपूर्वक सांगितलं.

आम्हा दोघांच्या राळेगणशिंदीला फेऱ्या सुरू झाल्या. पहिली भीड चेपल्यानंतर माणसं हळूहळू मोकळेपणानं बोलू लागली. गावातील वडीलधाऱ्या मंडळींबरोबरच्या चर्चा रंगू लागल्या. तरुण मुलं विश्वासानं जवळ आली, बोलू लागली. फोटोग्राफी करत करत सरोजा घराघरातल्या स्वयंपाकघरापर्यंत पोहचली होती. तिच्यामुळं मलादेखील घरातल्या चलीशेजारी, गॅसच्या शेगडीजवळ बैठक मारून घरच्या लक्ष्मीबरोबर, सासूबरोबर, लेकीसुनेबरोबर चार शब्द बोलण्याची संधी मिळत होती. चुलीशेजारच्या देवाण-घेवाणीतून चारदोन नव्या गोष्टी प्रकाशात येत होत्या. काही नवीन ऐकायला मिळालं होतं. नवीन शिकायला मिळत होतं. खेडयामधील चुलीभोवताली फक्त जळमटच नसून जीवनाचं सखोल तत्त्वज्ञान घुटमळत असतं ह्याची पुन:पुन्हा जाणीव होत होती.

आणि हे सर्व चालू असताना मनात एक विचार वारंवार डोकं वर काढत होता. 'माणूस'च्या वाचकमित्रांना भेटून दीड–दोन वर्षं उलटली होती. राळेगणशिंदीमध्ये आम्ही जे अनुभवत होतो ते सर्व मुक्तहस्त लेखणीनं 'माणूस'च्या वाचकांना 'कथन' केलं तर!

---

**चुलीशेजारच्या देवाणघेवाणीतून चार–दोन नव्या गोष्टी प्रकाशात येत होत्या ... काही नवीन ऐकायला मिळत होतं...**

हल्ली झालंय काय तर विकास–विशेषत: ग्रामीण विकास–हा विषय परिसंवाद, चर्चासत्रे आणि राजकीय घोषणा ह्यातच अडकून पडलाय. विकासाची, विकास योजनांची एक खास परिभाषा निर्माण झाली आहे आणि तथाकथित विचारवंतांच्या अंगी ही परिभाषा वापरून एका ठराविक वर्तुळात गोलगोल फिरत राहण्याची वृत्ती वाढत चालली आहे. जमिनीवर पाय असलेले कार्यकर्तेदेखील आता ही परिभाषा वापरण्यात पटाईत होत चालले आहेत. 'आधी केले मग सांगितले' अशा व्यक्ती हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्यादेखील निदान माझ्या पहाण्यात तरी नाहीत.

तर विकासाच्या ह्या परिभाषेत आपल्या देशाला विकसनशील राष्ट्र असं म्हटलं जातं. विकास म्हणजे औद्योगीकरण एव्हढीच मर्यादित व्याख्या असेल तर त्या व्याख्येनुसार आपल्या देशाचा नंबर जगातील औद्योगिकदृष्टचा प्रगतराष्ट्रांच्या यादीत पहिल्या दहामधे असेलही; पण केवळ त्यामुळे छाती फुगवून घेण्याचं कारण नाही. आपल्या देशाचा मोहक रंगीत फोटो न पहाता जर एक्सरे फोटोवरून नुसती नजर फिरवली तरी आपल्या चटकन् ध्यानात येईल की, दारिद्र्याच्या रोगानं पोखरून निघालेला भारत अविकसित आहे. दिवसेंदिवस हा रोग वाढत चाललाय आणि ग्रामीण भागातून राहणारे आपले सत्तर–ऐंशी टक्के नागरिक ह्या दारिद्र्यरोगाला अनेक टकरा देऊन आता इतके हतबल झाले आहेत की, झुंज देण्याची त्यांची मानसिक शक्तीदेखील आता हळूहळू लोप पावू लागली आहे. ग्रामीण भारतातील नागरिकांचं मनोधैर्य संपूर्णपणे खचता कामा



नये, एव्हढयासाठी तरी किमान काही करण्याची वेळ जवळ येऊन ठेपली आहे. त्यांना कुठं तरी आशेचा अंकुर दिसलाच पाहिजे.

ग्रामीण भारत हा अजूनही संपूर्णपणे दुर्लक्षित आणि उपेक्षित आहे हे सत्य शहरी सुशिक्षितांना फार काळ डोळयांआड करता येणार नाही. औद्योगीकरण आणि त्यामुळे होणाऱ्या नफ्यातील न्याय्य वाटा ग्रामीण भारताला मिळालेला नाही. दुसरी दुर्दैवाची गोष्ट अशी की, ह्या ग्रामीण भारताबद्दल शहरी लेखकांनी नाटककार, कादंबरीकार, कवी, चित्रकार, चित्रपटनिर्माते–ह्या सर्वांनी शहरी वाचक आणि प्रेक्षक ह्यांच्यापुढं नेहमी एक फसवं आणि कधीकधी विकृतदेखील चित्र सातत्यानं ठेवलं आहे.

भारतामधील खेडयांमधून सहज जरी फेरफटका मारला तरी प्रथम नजरेत घुसतं भयाण दारिद्रय, सर्वत्र साचलेली घाण, पडकी घरं, आरोग्यहीन मुलं, दिशाहीन तरुण, भुकेली मेल्या नजरेची माणसं. अजूनही हजारो–लाखो खेडी अशी आहेत की, त्यांच्यापर्यंत पोहचण्यास साधा कच्चा रस्तादेखील नाही–मग विकासयोजना तिथवर पोहचणार तरी कशा आणि केव्हा ?

अशा उपेक्षित खेडयांमधून आपली पुढील पिढी आणि आजची तरुण पिढी ज्या प्रकारचं दिशाशून्य जीवन रखडत जगत आहे ते सर्वच मन अस्वस्थ करणारं आहे. अनेक कोवळी मुलं इतकी दुर्दैवी आहेत की, सरस्वतीचं मानचिन्ह अशी पाटीपेन्सिल नुसती हाती धरण्याचंदेखील त्यांच्या भाग्यात नाही–आणि समजा एखाद्याच्या हाती असलीच तर ती पाटी अजूनही कोरी–करकरीत आहे ! ह्याला जबाबदार केवळ राजकीय पुढारी नाहीत–' आपण ' सारे आहोत !

जिथं लक्ष्मी आणि सरस्वती ह्या दोहींचा अभाव तिथं आरोग्य तरी कुठून असणार ? पूर्वी आपण लहान मुलांच्या मनावर संस्कार घडावेत म्हणून रोज सायंकाळी दिवेलागणीच्या वेळी त्यांच्याकडून म्हणवून घेत असू–' शुभं करोति कल्याणम् । आरोग्यं धनसंपदा '–पण जिथं दोन वेळची भूक भागविण्याची मारामार अशा ग्रामीण घरातील रोगानं किडलेल्या, सतत उपाशी असणाऱ्या मुलांनी अंधाऱ्या कोपऱ्यात बसून हा श्लोक म्हणायचा तरी कुठल्या तोंडानं आणि कुठल्या शक्तीच्या बळावर ?

विकासातील त्यांचा न्याय्य वाटा ' आपण ' त्यांच्याकडून हिरावून घेतला आहे आणि आता वेगवेगळया अनुदानयोजनांद्वारा सबसिडीची भीक घालून आपण त्यांना आणखीच दुबळं आणि परावलंबी बनवत चाललो आहोत. सतत अनुदानावर जगणाऱ्यानं स्वाभिमानी, देशाभिमानी नागरिक व्हायचं तरी कसं ? आपल्या शालेय पाठ्य–पुस्तकात जी प्रतिज्ञा आहे, ' भारत माझा देश आहे... ' त्यासाठी देशाबद्दल असणारा स्वाभिमान, अभिमान, प्रेम, त्याग करण्याची वृत्ती हे सर्व ग्रामीण भारतामधील दारिद्रयाच्या अंड्यानं चिरडून गेलेल्या कोवळया मुलांच्याकडून अपेक्षित असणं ही क्रूर थट्टा आहे. अहो, ह्या लहान मुलांची उगवती मनं अंकुर फुटताच कोमेजून कोरकंडून गेली आहेत !

आणि असं हे चित्र सर्वत्र दिसत असताना अगदी अनपेक्षितपणे एखाद्या अनुताई वाघ भेटतात, एखादे अण्णा हजारे भेटतात, एखादे मधु देवल भेटतात आणि आपल्याच वठलेल्या मनाला पालवी फुटते. काजळी काढून हलकी फुंकर घालताच ज्योत जशी अंधाराबरोबर लढायला सिद्ध होते त्याप्रमाणे मनावर साचलेली निराशेची पुटं गळून पडतात आणि वाटतं अजून उशीर झालेला नाही. अजिबात उशीर झालेला नाही. ग्रामीण भारताचं चित्र पालटणं शक्य आहे. अशा वेळी वाटतं अनुताई वाघांची कोसबाड–टेकडीवरील विकासवाडी, अण्णा हजारेंची राळेगणशिंदी, मधु देवलांचं म्हैसाळ ह्यावर एकएक प्रदीर्घ पोवाडा रचावा आणि एखाद्या बुलंद खडया आवाजाच्या शाहिराला म्हणावं, हाती डफ घेऊन चल बरोबर आणि गावोगावच्या पारावर उभं राहून विकासाच्या त्रिसूत्रीचं रहस्य सर्वांना पटवून सांग ! आज राळेगणशिंदीचा गद्य पोवाडा सादर करतोय–

¤

राळेगणशिंदी हे अहमदनगर जिल्ह्यामधील पारनेर तालुक्यातील एक छोटसं खेडेगाव. जेमतेम अठराशे लोकवस्ती असलेल्या ह्या गावात दहा–बारा वर्षांपूर्वी दारूच्या चाळीस हातभट्टया होत्या. संपूर्ण पारनेर तालुका, घोडनदी, शिरूर आणि अहमदनगर शहर इथपर्यंत राळेगणशिंदीमध्ये तयार झालेली हातभट्टी विकली जायची. दारूबंदीचा कायदा येण्याअगोदर इथं हातभट्टया होत्या–दारूबंदीच्या काळात त्यांच्यात वाढ झाली. राळेगणशिंदीमध्ये हातभट्टीची पहिली धार श्री. मापारे या सद्गृहस्थानं काढली ! राळेगणशिंदी हे पारनेर तालुक्यातील सर्वांत कुविख्यात गाव होतं. देवळासमोरील पार हा सदैव झोकांडया खाणाऱ्या दारुडयांनी गजबजलेला असायचा. पारावर अर्वाच्य शिव्यांचा धो धो पाऊस–मारामाऱ्या, भांडणं नेहमीचीच. कुणाची तरी चार टाळकी फुटलेली. पाच–पंधरा सदैव पोलीसकस्टडीत. पोलिसांची ह्या गावावर खूप मर्जी–हप्ता गोळा करण्यासाठी ! त्यांचा नियमित फेरा असायचा. सगळा गाव म्हणजे दारूचा प्रचंड गुत्ता आणि शिव्यांचा उकिरडा अशी परिस्थिती. बायामाणसांना दिवसाउजेडीदेखील गावातून फिरणं मुष्कील.

हातभट्टीची पहिली धार काढणाऱ्या श्री. मापारेंचं वय आज सत्तरीच्यावर असावं. त्यांनी बारा वर्षांपूर्वी हातभट्टीचा धंदा बंद केला. त्यांच्यानंतर इतरांच्या हातभट्टयादेखील बंद ' पाडण्यात ' आल्या. दारू पिण्यावर आज ह्या गावात सक्त निर्बंध आहेत. दारूभट्टया बंद झाल्या, दारू पिणं बंद झालं आणि राळेगणशिंदीच्या पुनर्जन्माला सुरुवात झाली !

राळेगणशिंदीमधील शेतकऱ्याचा, फौजेत भरती झालेला मुलगा, बंगलादेशच्या युद्धानंतर निवृत्त होऊन गावी परतला. गावाची दुर्दशा बघून त्यानं इथं सुधारणा घडवून गावाचा कायापालट करण्याचा वसा घेतला. ह्या द्रष्टया सद्गृहस्थांचं नाव श्री. अण्णा हजारे. बटुमूर्ती अण्णा हजारे दिसायला हुबेहुब कै. लालबहादूर शास्त्रींप्रमाणे आहेत. चालणं, बोलणं सगळं लालबहादूर शास्त्रींसारखं. (मला तर हे विशेष जाणवलं. कारण जर्मन, टिव्हिसाठी ' पोर्ट्रेट ऑफ शास्त्री ' हा पंचेचाळीस मिनिटांचा लघुपट बनवत असताना मी लालबहादूर शास्त्रींच्या अतिशय निकट सहवासात वावरलो होतो.)–फौजेमध्येदेखील सारेजण अण्णा हजारेंना ' शास्त्रीजी ' ह्या नावानंच हाक मारत–असे हे अण्णा हजारे संथ आणि शांत आवाजात सांगत होते–

' इथं जो दारूभट्टीचा व्यवसाय चालयचा त्याचं मुख्य कारण दुष्काळ, सिंचनाच्या सोयी नव्हत्या, अपुरं उत्पादन, जमिनीत कष्ट करून जे पिकायचं त्यावर संसार चालणं अशक्य म्हणून अगदी

निरुपायानं दारू गाळणं हा जोडधंदा झाला होता. एक लक्षात घ्या– तुमच्या पुण्या–मुंबईला चालणारा हातभट्टीचा व्यवसाय आणि त्यावर पोसली जाणारी गुंडगिरी आणि खेडयांमधील हातभट्टीचा व्यवसाय ह्यात फार फरक आहे. शहरामधील हातभट्टया चालविण्यामागे एखाद्या बडया आसामीचा हात असतो. त्या हातभट्टयांचा 'बोलविता धनी' वेगळा ! इथं आमच्या गावात जे लोक दारू गाळायचे ते स्वतःचा चरितार्थ चालविण्यासाठी दारूच्या बाटल्या विकायचे. नफ्यातून ज्वारी–बाजरी विकत घ्यायची, दळून आणायची तेव्हा घरच्या माणसांना भाकरी मिळणार अशी परिस्थिती. अजूनही खेडयापाडयांतून हातभट्टीचा जो व्यवसाय चालतो त्याचं मुख्य कारण जिरायती शेतीवर कुटुंबाचा पोटापाण्याचा खर्च भागत नाही हे आहे.

'गावात आल्यावर चाळीस हातभट्टया चालवणाऱ्या लोकांची मी समजूत पटवून दिली. ज्यानं आडमुठेपणा केला त्याला वेळप्रसंगी ठोकूनदेखील काढला. त्यांच्या तरुण मुलांच्या नोकरीची प्रथम सोय केली. आज ह्याच हातभट्टीवाल्यांची पोरं मिलिटरीत भरती झाली आहेत. घरी वेळेवर पैसे पाठवतात. त्यामुळे ह्या हातभट्टया बंद पडल्या. जे चाळीस लोक जगण्यासाठी हातभट्टीचा व्यवसाय करत होते त्या एकाही घरातील तरुण आज बेकार नाही. त्यांच्या चरित्रार्थाची सोय प्रथम केली. आज आमच्या गावातील बेचाळीस तरुण फौजेत आहेत. मग त्यांचे बाप दारू कशाला गाळतील ?

आमच्या गावात तुम्हाला फरक दिसेल. एखाद्या खेडयामधील, आर्मीत भरती झालेला जवान जेव्हा सुट्टीवर गावी परत येतो तेव्हा बरोबर दोन बाटल्या रम घेऊन येतो. गावात बडेजाव गाजवत मिरवतो. खूप पितो – दादागिरी करतो. त्यामुळं होतं काय तर गावच्या वडीलधाऱ्या माणसांच्या मनात फौजेबद्दल विपरीत कल्पना निर्माण होतात. आमच्या गावातील मिलिटरीत भरती झालेली पोरं जेव्हा रजेवर येतात तेव्हा त्यांनादेखील दोन बाटल्या रम मिळत असणार – पण ते गावात धिंगाणा घालताना कधीच दिसणार नाहीत. आमच्या गावाचं आर्मीबद्दल मत फार चांगलं आहे. आमच्या गावातील फौजेमध्ये भरती झालेले रजेवर येतात तेव्हा त्यांची वागणूक सौजन्याची असते.

त्याउलट एक उदाहरण सांगतो. आमच्या गावचा एक मनुष्य आर्मीमधे ड्रायव्हर होता. निवृत्त झाल्यावर पेन्शन घेऊन तो आला. लहानपणी म्हणजे चाळीस वर्षांपूर्वी हा गुरं राखायला जायचा. पैलवानकी करायचा. नुसती लंगोटी लावून फिरायचा – कारण अंग झाकण्यापुरतं कापड घेण्याची आर्थिक कुवतच नव्हती. माणूस अंगठेबहाद्दर. मिलिटरीत गेल्यावर लिहायला–वाचायला शिकला, फडं इंग्रजी बोलू लागला. त्याचबरोबर दारूची सवय लावून घेतली. इथं आल्यावर एस. टी. मध्ये ड्रायव्हरची नोकरी मिळाली; पण दारू पिऊन दोन वेळा त्यानं अॅक्सिडेंट केला. कसाबसा सुटला; पण दारूची सवय सुटेना. गावात तर दारूचा थेंब नाही. मग हा घोडनदी–शिरूरला जाऊन दारू प्यायचा आणि लपत-छपत घरी येऊन झोपायचा. माणूस स्वभावानं चांगला म्हणून गावानं त्याला संभाळून घेतला. दैव कसं विचित्र बघा, आर्मीत जाऊन सुशिक्षित झाला, उत्तम इंग्रजी बोलायला शिकला; पण पदरात दारूचं व्यसन बांधून घेतलं !

आम्ही त्यावर एक उपाय करायचा ठरवलं. आमच्या गावातून दरवर्षी निळोबारायांची दिंडी निघते. सोळा दिवस पायी चालावं लागतं. गावकऱ्यांनी ठरवलं ह्या माणसाला दिंडीत घ्यायचं. चार-पाचशे माणसं चालत असतात – सर्वांच्याबरोबर हा टिकला तर रोज दारू पिण्याची त्याची सवय थोडी तरी कमी होईल.

दिंडीबरोबर चालण्याचा त्याच्या मनावर इतका परिणाम झाला की, दारू तर सुटलीच; पण आज तो ज्ञानेश्वरी आणि भागवत हातातून बाजूला ठेवत नाही ! त्यावर प्रवचन देखील करतो. सांगायचा उद्देश काय, तर दारूची सवय जितक्या सहज लागते तितक्याच सहज ती सोडता देखील येते. त्यासाठी मात्र अध्यात्माची बैठक पाहिजे – अनुभव पाहिजे.

तुकडोजीमहाराजांनी ग्रामगीता लिहिली. सगळा उपदेश खेडयात जीवन जगणाऱ्यांच्यासाठीच आहे. गाव कसं असावं, गावातील कार्यकर्त्यांची वागणूक कशी असावी, ग्रामसुधारणेचे मार्ग काय हे सगळं तुकडोजीमहाराजांनी अतिशय सोप्या आणि रसाळ भाषेत सांगितलं आहे. ही ग्रामगीता किती सामाजिक कार्यकर्त्यांनी वाचली असेल. पण आता हा माणूस ग्रामगीता वाचल्याशिवाय झोपत नाही.

दुसरं एक उदाहरण सांगतो. मिलिटरीतली नोकरी संपवून आमचा एक गाववाला परत आला. फंडाचे त्याला वीस हजार रुपये मिळाले होते. पेन्शन होतीच. आर्मीमध्ये ड्रिंकची सवय लागलेली. त्याला आम्ही सांगितलं गावात हे चालणार नाही. तो ऐकेना. शेवटी आम्हाला आमचा शेवटचा उपाय वापरावा लागला. पारावरच्या पिंपळाला त्याला आठ दिवस बांधून घालून बडविण्यात आलं. मीच स्वतः पुढाकार घेऊन त्याला चामडयाच्या पट्टयानं फोडून काढला. प्रथम तो गुरकावून धमकी द्यायचा – म्हणायचा, बघून घेईन, ह्याचा परिणाम बरा होणार नाही, एकेकाचा मुडदा गाडीन – पण अखेर आठव्या दिवशी शरण आला!

त्याचे फंडाचे जे पैसे होते ते तर वाचलेच आणि आज तो उत्तम शेती करून सुखात आहे. दारूचं नाव काढत नाही. आज आमच्या गावचा तो एक आदर्श नागरिक आहे – आर्मीची शिस्त अंगात होतीच. आम्ही फक्त वाईट जे भिनलं होतं ते काढून टाकलं.

अहो, फंडाच्या वीस हजारांपैकी एक महिन्यातच त्यानं दारूपायी सहा-सात हजार रुपये गमावले होते. ह्या पद्धतीनं दोन-तीन महिन्यातच तो भुकेकंगाल झाला असता – आज दारू विसरून आपल्या शेतात इमानइतबारे राबतो – घरचे सगळे आनंदात. मग आमची पद्धत चूक का बरोबर ते तुम्ही ठरवा!'

□

अण्णा हजारे जे सांगत होते ते सगळंच विस्मयकारक होतं. दारू पिणे चांगले का वाईट ह्यावर बोलायचा मला अधिकार नाही. मला

**बेकारीवर इलाज प्रथम केला...नंतर भट्टया बंद झाल्या.**

दारू आवडते आणि मी पितो. अण्णा हजारेंनी खेड्यातील हातभट्ट्या आणि शहरातील हातभट्ट्या ह्यांच्यामधील फरक जो मोजक्याच शब्दात सांगितला तो मात्र विचार करण्यासारखा आहे हे निश्चित — विशेषत: दुष्काळी परिसरातील हातभट्ट्या. आमच्या गप्पा चालू असतानाच शेजारच्या गावची मंडळी अण्णा हजारेंबरोबर बोलण्यासाठी ताटकळत बसली आहेत हे ध्यानात येऊन मी आणि सरोजा उठलो आणि फोटो काढण्याच्या निमित्तानं मंदिराच्या सभामंडपातून बाहेर पडलो. अण्णा हजारे सांगतात ते सर्व जरी खरं असलं तरी दारूभट्टी चालवणारे, दारू पिणारे ह्यांना आज काय वाटत असेल हे जाणून घेण्याची ओढ लागली — पण ही मंडळी बोलतील का ? मन उघडं करतील का ? ह्यांना पुन्हा भूतकाळात नेऊन त्यांच्या स्मृती चाळविण्याचा आपल्याला अधिकार आहे का ? मनात अनेक प्रश्नांचा घोळ. सरोजा कॅमेऱ्यानं जे दिसेल ते टिपत होती. मी काहीसा संभ्रमात. त्या नादातच चालत चालत आम्ही दोघे, हातभट्टीची पहिली धार काढणाऱ्या मापारेंच्या वस्तीवर येऊन पोहचलो.

मापारेंचं घर गावाच्या टोकाला. दारात उंबर. त्याखाली सारवलेला स्वच्छ पार. बाजूलाच बांधलेली गावरान बैलांची जोडी — एक तरणा खिलारी खोंड. परसदारी गोबरगॅस, शे-पन्नास कोंबड्यांचं खुराडं, त्याच्या बाजूला गोठ्यात बांधलेली संकरित जर्सी कालवड...

... आम्हा दोघांना बघून मापारे शेजारच्या वावरातून लगबगीनं आले. येतायेता त्यांनी शाळूची कणसं खुडून आणली. पाराखाली गोधड्या अंथरल्या आणि आपल्या पत्नीला चटणी तयार करायची 'ऑर्डर' सोडून मुलाला त्यांनी हुर्डा भाजण्याची तयारी करण्याचा 'हुकूम' सोडला आणि पारावर टेकत म्हणाले —

'हुर्ड्याबरोबर उगाचच 'नामिनल्' चटणी असली म्हंजे चव येते तोंडाला. मला कुणकुण लागली व्हतीच. तुम्ही आमच्या वस्तीकडं वळणार म्हनून. मी तयारीतच होतो. वाटच बघत होतो. दोनतीन दिवस मी दुरून बघतोय — आपलं असंच न्याहाळायचं म्हनून— तुमच्या 'मिसेस' फोटो काढत फिरत व्हत्या, तुम्ही त्यांच्या मागनं मागनं कॅमेऱ्याच्या बॅगचं वझं खांद्यावर अडकवून फिरत त्यांना मदत करत व्हता तेव्हाच मी म्हटलं — हे प्रकरण जरा वेगळं हाय बरं का ! दुसऱ्याच दिवशी मी माझ्या पोराला झापला — म्हटलं, ती जोडी बघ, नवरा बायकोला मदत करतोय आणि तू इथं पाराखाली झोपा काढतोस — तुझी बायको दिवसभर काम करून मरमर मरती. आरं, तिनं चहा करून समोर ठेवला तरी तुझं म्हनूनं तिनंच बशीत ओतून फुंकर मारून तुझ्या घशात ओतावा. तू फक्त आ करण्याचं कष्ट घेणार. कसं चालायचं असं केलं तर ! — तुझी बायको गोठ्यात शेण काढायला जाते तेव्हा तू चार घागरी पाणी भरलंस तर तुझी काय कंबर लचकणार हाय व्हय ?'

मापारे हे सांगत असताना त्यांचा मुलगा हुरडा भाजण्यासाठी शेणाच्या आठ-दहा गोवऱ्या, काटक्या-कुटक्या, वाळकं गवत वगैरे घेऊन आला. शेणाच्या गोवऱ्या बघून मापारे खवळले — 'अरं, तुम्हाला अक्कल तरी कवा यायची ? — तुमच्या शहरच्या मित्रांना घाला शेणाच्या थापलेल्या गोवऱ्यात भाजलेला हुर्डा — तुमचं शहरचं मित्रं तुमच्यापेक्षा थोर विद्वान — जित्राबासारखं हुर्ड्याचे बकाणे तोंडात कोंबीत हुतं. हुर्डा चोळायचा, फुकायचा एव्हढी साधी अक्कल नाही — आणि तुम्हीपण सांगत न्हाई तुमच्या मित्रांना हुर्डा खाण्याची रीत. हुर्ड्याचं आणि गोवऱ्यांचं सगळं गदळ पोटात. आता ह्या पावण्यांना काय तसा हुर्डा खायला घालू ?— आरं, त्यांनी नामांकित शेतकऱ्याच्या मळ्यातला हुर्डा खाल्ला असणार, त्यांची 'मिसेस' कोल्हापूरची हाये — आता आपल्या दुष्काळी गावात आलेत तर निदान हुर्डा तरी पद्धतशीर नको का कराया — चल पळ — आणि वावरात पडलेलं चांगलं सुकल्यालं शेण घेऊन ये —'

मापारेंना सर्व काही खुलासेवार बोलण्याची सवय असावी हे माझ्या ध्यानात आलं. मला उत्सुकता होती. राळेगणशिंदीचा, अण्णा हजारे परतण्यापूर्वीचा इतिहास जाणून घेण्याची, पण मापारेंना कदाचित इच्छा असावी स्वत:चा इतिहास सांगण्याची मी मनाशी ठरवलं— ते जोपर्यंत बोलत आहेत तोपर्यंत ऐकत रहायचं—गाडी फारच



हातभट्ट्या बंद झाल्या
आणि गावातील विकासकार्यांना
गती आली.

'डिरेल' व्हायला लागली तर एखादा प्रश्न संभाषणात अलगद सोडून द्यायचा आणि गाडी मूळ विषयावर आणायची.

अडकित्त्यानं शाळूच्या कणसाचे दांडे एका मापानं कापत मापारे आपल्या तरण्या पोराला लेक्चर झाडत होते. कणसाचे दांडे कापण्याचं देखील एक शास्त्र असावं अशा पद्धतीनं त्यांचा अडकित्ता चालत होता. मापारेंच्या पत्नी चटणीच्या 'प्लेटी' भरून पाराच्या सावलीत येऊन बसल्या. मुलगा टोपली घेऊन वावरात-पळाला तसं माझ्याकडे वळून मापारे म्हणाले; 'वावरात पडलेलं, उन्हात न्याचरल वाळल्यालं गाईचं शेण जळणाला वापरलं तर हुर्डा एकदम खुमासदार होतो. त्याची चव वेगळी. असा हुर्डा प्रकृतीला एकदम उत्तम. बाधत नाही. रक्तवर्धक. हुर्डा म्हंजे शेतकऱ्याचं टानिक. सीझनला दोन–चार मुठी शाळूचा पद्धतशीर हुर्डा खाल्ला ना का लिटरभर रक्त वाढतं बघा!'

त्यांचं हुर्डा–पुराण थांबवत आणि त्यांना काहीसं चिडविण्यासाठी मी म्हणालो– 'मापारे अण्णा, तुम्ही मघाशी पोराला दम दिलात. बायकोला मदत कर म्हणून लेक्चर झोडलंत आणि स्वतःच्या 'मिसेस'ला मात्र चटणी करण्याची ऑर्डर सोडलीत–तुमच्या तरुणपणी तुम्ही करत होता का मदत तुमच्या बायकोला?'

मापारे एकदम उसळले आणि म्हणाले, 'विचारा की! तुमच्या समोरच आमच्या मंडळी बसल्या आहेत–विचारा त्यांना मी मदत करत होतो का न्हाई त्ये. मी कशाला सांगू माझ्या तोंडानं–त्यांनाच विचारा!'

मी विचारलं, ठसठशीत कुंकू लावलेल्या, पन्नाशी पार केलेल्या, मापारेंच्या 'मंडळी' झकासपैकी लाजल्या. त्यांच्या लाजण्यावर खूष होऊन मापारे म्हणाले– 'आता खरं सांगू का–म्हंजे आपलं आमचं खेडवळ तत्त्वज्ञान–तुम्हीच विचार करून बघा–नवरा–बायकोचं तसं नातं पाच–दहा मिनिटांचंच असतं–एरवी सगळं आयुष्य एकमेकांच्या सहकार्यानंच चालवायचं असतं. आपण तिला अर्धांगिनी म्हणतो–मग एकच चाक लावून गाडी चालेल का? नाही चालत! आणि चालली तर ती गाडी वेगळी–संसाराची गाडी तशी न्हाई चालत. मी तुम्हाला सांगतो–माझं लग्न झालं लहानपणी–मी बापाचा एकुलता, आई मेलेली. ही सून म्हणून घरात आली तेव्हा हिचं वय असल सात-आठ वर्षांचं–हिचा सासरा म्हंजे माझा बाप हिला विहिरीवरून पाणी आणाया सांगायचा–मला ते काय बरोबर वाटायचं न्हाई. सात-आठ वर्षांचं वय, प्रकृती नाजूक, विहीर लांब–पाणी भरताना चुकून पडून मेली तर? –एव्हढं आपण हिला बायको म्हणून घरी आणलं, मग तिची काळजी घ्यायला नको?– मी बापाला सांगितलं, पाणी मीं भरतो, तिला सांगू नको. माझं वय असल दहा-बारा–पण मी तगडा होतो. झटक्यात पाणी भरायचो. दळणाचं तसच–बापाला वाटायचं सुनेनं दळून आणावं. चक्की दोन कोस दूर. हिला अर्धपोतं ज्वारीचं वझं डोक्यावर घेऊन तेव्हढं अंतर चालवणार का? मी स्वतः ज्वारी डोक्यावर घेऊन दळून आणायचो. गावातली माणसं, इतर तरुण पोरं मला हसायची. मी म्हणायचो हसेनात–आपल्याला थोडंच त्यामुळं दुखतंय! आपल्याला बायको पाहिजे असल तर नवऱ्यानं तिला कष्टाच्या कामात मदत करायलाच पाहिजे–तरच संसाराचा गाडा सुरळीत चालणार! माझ्या सुनांना मी नेहमी सांगतो–एव्हढी सेवा करू नका नवऱ्याची! पण त्या काही ऐकत नाहीत–मग मरा कष्ट करून! आपण काय करणार? त्यांना जर ऐतखाऊ नवराच आवडत असेल तर आपण कशाला त्यांच्या संसारात ढवळाढवळ करा? घेतील ते बघून आपलं आपलं!'

मापारे एक वेगळंच तत्त्वज्ञान सांगत होते. माझ्या डोक्यात स्त्री मुक्ती–समान हक्क–वगैरे शब्द थैमान घालत होते. सत्तरी ओलांडलेला एक वयोवृद्ध सद्गृहस्थ नवरा–बायकोचं नातं कसं असावं ह्यावर स्वानुभव सांगत होता आणि इथं शहरामध्ये आम्ही स्त्री मुक्ती संघटना स्थापून त्यावर परिसंवाद घेण्यात अडकलो होतो–सगळाच गोंधळ! वास्तविक हाच विषय पुढं वाढविण्यात मला रस होता–पण ते नंतर केव्हा तरी असं ठरवून मी मापारेंना विचारलं– 'मापारे, तुम्ही राळेगणशिंदीमध्ये पहिली हातभट्टी सुरू केली असं सगळे सांगतात–त्याचं काय?'

मला वाटलं हा प्रश्न ऐकून मापारे चमकतील, विषय टाळतील; पण तसं काहीच घडलं नाही. दोन्ही हात जोडून आकाशाला नमस्कार करत मापारे म्हणाले, 'खरं आहे ते. सगळी ईश्वराची कृपा!– बाप मेला मला पोरं झाली. शेतीमधून भागेना· खायची अडचण. काही मार्गच सुचेना–तेव्हा एक माहितगार गाठला. पाच रुपयांचं भांडवल गुंतवून त्यानं सांगितलेला माल आणला आणि म्हणालो शिकव दारू कशी गाळायची ते! त्यानं भट्टी जमवली. दोन बाटल्या दारू गाळून दाखवली. एक स्वतःच प्याला आणि दुसरी बखोटधाला मारून घेऊन गेला. झाली का पंचाइत! म्हंजे बघा विद्या मिळाली; पण भांडवल गेलं. मग पुन्हा इथून तिथून पाच–दहा रुपये गोळा केले. माल आणला. चार बाटल्या दारू पाडली. दोन गावातच इकल्या आणि दोन पल्याडच्या गावच्या पाटलाला इकल्या. धा रुपयाच्या भांडवलावर साडेबारा रुपयाची कमाई झाली. दुसऱ्या दिवशी दारू गाळण्यासाठी धा रुपयाचा माल घेतला, अडीच रुपयात मीठ, मिरची, तेल, जुंधळं घेतलं आणि बायका–पोरांचं प्वाट भागवलं. असला धंदा–हा–पण दारूला मी स्वतः कधी जिभेवर ठेवली नाही!

दारू गाळताना लई वाईट वाटायचं, कारण महिन्याचे सगळे तीसही दिवस आपण आरोपी. दारू गाळताना रोज पांडुरंगाची प्रार्थना करायचो–देवा वाचव! पोलिसांची 'रेड' नको! माझ्या अब्रूला जप! पांडुरंगानं प्रार्थना ऐकली. आमच्या भट्टीवर कधीच रेड पडली न्हाई का आपण कधी पोलिसाच्या हाती सापडलो नाही. ही सगळी देवाची कृपा. आपण पोलिसाला कधी एक छदाम लाच दिली नाही. माझं 'टेकनिक' यकदम वेगळं. संभावित. कुणाला पत्त्या लागणार न्हाई हा दारू गाळणारा म्हणून! परमेश्वराचे आशीर्वाद माझ्या पाठीशी आणि तरी मी पांडुरंगाला रोज विनवायचो, देवा ह्या गंगामाईची आणि माझी लवकर ताटातूट कर!'

'अहो, ही तर गटारगंगा–तुम्ही तिला गंगामाई कसं म्हणता?'

**देवा, या गंगामाईची आणि माझी लवकर ताटातूट कर!**

मी आश्चर्यानं विचारलं तसं श्रद्धेनं ओथंबलेल्या चेहऱ्यानं मापारे म्हणाले, 'अहो, माझी ती गंगामाईच ! गंगामाईच ती माझी–इतरांची गटारगंगा ! माझी ती लक्ष्मी, इतरांची अवदसा. मी तिला कधी जिभेवर ठेवलं न्हाई. ती माझी माऊली. तिनं माझा संसार चालवला !'

'– पण इतरांचा संसार तिनं धुळीला मिळवला ना ! त्याचं काय ?' मी जरा खोचकपणे विचारलं तेव्हा समजुतीच्या स्वरात मापारे म्हणाले, 'माझी एक 'शिष्टीम' व्हती सायेब. गरीब मानूस आला ना तर त्याला मी ग्लासभर दारू फुकट द्यायचो. म्हणायचो. पी बाबा–पण हिच्या नादी लागू नगस. श्रीमन्त शेतकऱ्याला मात्र 'रेगुलर' बाटल्या पोचवायचो. त्यांनी चुकीच्या मार्गानं मिळवलेली लक्ष्मी मीपण चुकीच्याच मार्गानं का होईना पण माझ्या घरी आणायचो–नाही तर माझ्यासारख्या गरिबाचा संसार चालायचा कसा ? आता एखाद्या चांगल्या माऊलींचा, सती–सावित्रीचा शाप मला लागला असणार पण त्याचं प्रायश्चित नंतर घ्यायचं असं मी ठरवलं. अगोदर घर चालवायचं मग प्रायश्चित घ्यायचं ! खरं सांगू सायेब, दारू गाळणं म्हणजे लई बेकार धंदा ! यकदम बेकार ! पण दारू पिणं त्यापेक्षाही बेकार !'

मापारे अण्णांना थांबवत मी म्हणालो, 'पण मी पिणारा आहे–मला आवडते !'– माझ्या हातावर टाळी देत मापारे म्हणाले, 'हंऽऽ–हीच तर गंमत आहे. तुम्ही आवडते म्हणता......बायको आवडते हे बरोबर !–पण बायकोशिवाय चालत नाही म्हटलं की, सगळा घोटाळा झाला बघा. माणूस एकदा बायकोच्या आहारी गेला की, मग तो स्वतःचा रहात नाही बघा ! एकदम वाया जातो. तसंच दारूचं ! प्यायची झाली तर गुडघ्याइतकीच प्यावी. गळ्यापर्यंत पिणाऱ्यांचा सत्यानाश झालाच म्हणून समजा ! पाय लटपटून उपयोग नाही–तिथं 'वार्निंग' असती ! आता काही जणांना सापाच्या विषाचो नशा असते. ते लोक नागसाप पाळतात;–पण किती आणि केव्हा डसून घ्यायचा ह्यावर 'कंट्रोल' ठेवतात. ताबा सुटला की मेला ! तसंच दारूचं–एकच प्याला तो बरोबर राहिला–दुसरा प्याला, तिसरा प्याला आणि गटारात मेला–दारूचं हे असं शस्त्र आहे !'

मापारेंचे दारूप्रवचन जेव्हा 'अल्कोहॉलिक्स ॲनॉनिमस'च्या मार्गानं झुकू लागलं तेव्हा मी त्यांना 'डायरेक्ट' सवाल केला, 'मला सांगा, तुम्ही धंदा बंद का केलात ? राळेगणशिदीमधील सगळ्या चाळीस हातभट्ट्या बंद कशा काय झाल्या ? लोकांचं दारूचं व्यसन कसं काय सुटलं ?'

'सगळी यादवबाबाची कृपा !'– राळेगणशिदीमध्ये ज्या महात्म्याची समाधी आहे त्याची आठवण काढत मापारे पुढं म्हणाले, 'कारणं अनेक आहेत; पण सगळ्यात मुख्य कारण म्हणजे अण्णा हजारे ! लढाईच्या टायमाला अण्णा हजारे शत्रूच्या गोळीनं मरायचेच. आजूबाजूचे मेले, अण्णाला गोळी कपाळाला चाटून गेली. आमच्या गावचं नशीब म्हणून अण्णा वाचला ! रिटायर होऊन परत आल्यावर त्यानं गावची अनास्था बघितली आणि काही तरुण तगडी पोरं हाताशी धरून सगळ्या हातभट्ट्या मोडून काढल्या. हातभट्टीवाल्यांच्या पोरांना मिलिटरीत भरती करून दिलं आणि मग पिण्यावर बंदी आणली. दारू गाळणाऱ्याला आणि पिणाऱ्याला गावातल्या चौकात पिंपळाच्या झाडाला बांधून अण्णा चामडी पट्टयानं फोडून काढायचा. आमचा अण्णा दिसायला लहानखुरा असला तरी नैतिक शक्ती जबर !–तुम्हाला नाही कळणार त्याचा अर्थ. तुमच्या शहरात नैतिक–अनैतिक, ज्ञान–अज्ञान सगळाच घोळ झालाय. काही वाईट किंवा काही अन्यायाचं बघितलं की अण्णा हजारेच्या अंगात ती नैतिक शक्ती संचारती बघा–अशा वेळी एखादा हिंदकेसरी पैलवान जरी अण्णाच्या समोर असला ना, तरी एका थपडेत झीट येऊन पडेल ! हा त्या वेळी अण्णाच्या अंगात धा रेड्यांचं बळ संचारतं! फक्त नैतिक शक्तीच्या जोरावर अण्णा हजारेनं इकडच्या चाळीस हातभट्ट्या बंद पाडल्या, लोकांची पिण्याची सवय घालवली;–पण तुम्हाला ते नाही कळणार ! असल्या गोष्टीवर तुमचा विश्वासच बसणार नाही. तुम्ही शिकलेले, आम्ही अडाणी ! पण दारू इथनं गेली आणि स्वच्छता आली. आता काय समजायचं ते तुमचं तुम्ही समजून घ्या !'

मापारेंच्या वस्तीवर उंबराच्या पाराखाली सावलीत बसून, वावरात पडलेल्या आणि उन्हात 'न्याचरली' वाळलेल्या शेणाच्या शेकोटीत भाजलेला शाळूचा खुमासदार हुरडा, चोळून आणि फुंकून खात चटणी तोंडी लावत आम्ही गप्पात रंगलो होतो. आजूबाजूला धा–पाच जण येऊन बसलेली खबर देखील नव्हती. मी आणि माझी बायको सरोजा, मापारे–अण्णा जे सांगत होते ते लक्षपूर्वक ऐकून साठवता येईल तितकं मनामध्ये 'फाइल' करत होतो. राळेगणशिदीच्या कायापालटाचा उगम समजला होता; पण प्रवाह पहाण्याची इच्छा होती. बाजूला बसलेल्या एका वृद्धाला मी विचारलं, 'आजोबा, तुम्ही सांगा, १९४७ साली आपण स्वतंत्र झालो. त्यानंतर काँग्रेसचं राज्य आलं–त्यानंतर आणखी कुठल्या पार्टीचं आलं. आता तर रोज निवडणुका होतात–पण ते जाऊ दे–स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्यावर राज्य करणाऱ्या पुढाऱ्यांनी तुमच्या गावालादेखील भेटी दिल्या असणार ? सुधारणेचा मार्ग सांगितला असणार ?–मग त्यांचं ऐकून तुम्ही सुधारणा का करून घेतली नाहीत ? अण्णा हजारेंची वाट बघत तुम्ही का थांबलात ? देश सुधारण्याची जबाबदारी पुढाऱ्यांची, मंत्र्यांची, राज्य करणाऱ्यांची–म्हणून तर आपण त्यांना मत देतो. निवडून देतो–मग तुम्हाला मार्गदर्शन करणारा पुढारी कसा काय भेटला नाही ?'

असला बाळबोध प्रश्न विचारणाऱ्या माझ्यासारख्या शहरी माणसाबद्दल मनात उमटलेली कीव डोळ्यात शक्य तो न दाखविण्याचा प्रयत्न करत एक म्हातारबाबा म्हणाले, 'अहो, आम्ही अडानी मानसं. आता कुटं जरा कळाया लागलंय आम्हाला. ते पुढारी बघा नुस्तं मत मागायला यायचे. हे करू, ते करू ! असं व्हईल ! तसं व्हईल–काय काय आश्वासनं द्यायाचे–मग आम्ही त्यांना मत द्यायाचो. आम्ही येडे. मत कसं द्यायचं हे देखील आम्हाला माहीत नव्हतं आणि अजूनही नीट कळलं नाही. पुढारी सांगल त्या निशाणावर शिक्का मारायचा का झाली निवडणूक ! ह्या पुढाऱ्यांनी काय आम्हाला मार्गदर्शन केल्याचं मला तरी आठवत न्हाई बघा ! असं करू, तसं करू म्हणाले; पण मत द्या एव्हढं मात्र ओरडून ओरडून सांगितलं !'

म्हातारबाबांनी हे ज्या पद्धतीनं हातवारे करून सांगितलं ते

ऐकून सगळीच माणसं खळाळून हसली. शाळूची आणखी कणसं हुडर्याच्या भट्टीत सारण्यात आली. मापारेंच्या मंडळींनी चटणीच्या प्लेटी पुन्हा भरून आणल्या आणि सर्वांना उद्देशून प्रश्न केला, 'पुढाऱ्यांनी तुम्हाला मार्गदर्शन केलं नाही असं तुम्ही म्हणता, म्हणजेच मार्गदर्शनाशिवाय आपण सुधारणार नाही असं तुमचं म्हणणं! आता मला सांगा, अण्णा हजारेंचा वेष तर पुढाऱ्यासारखाच आहे. खादीचं पांढरंशुभ्र धोतर, खादीचा पांढराशुभ्र शर्ट, खादीची पांढरीशुभ्र टोपी–मग अण्णा हजारेदेखील एक दिवस पुढारीच होणार, मत मागायला उभे रहाणार असं तुम्हाला का वाटलं नाही? तुम्ही त्यांच्यावर विश्वास का ठेवलात?'

हिरडयांनी हुर्डा चावत एक म्हातारबाबा म्हणाले, 'आम्हाला अण्णा हजारेबद्दल तसं कधीच वाटलं नाही. अहो, अण्णा येकदम वेगळा मानूस हाये. त्याला राजकारणात रस नाही आणि आता आम्ही पण जरा शहाणे झालो ना, पाच–दहा इलेक्शनीच्या अनुभवानंतर! मतवाला पुढारी कोण आणि तळमळीचा कार्यकर्ता कोण ह्याची वळख आम्हाला लगेच पटती–' म्हातारबाबा हे इतक्या इमानइतबारे सांगत होते आणि माझ्या मनात पाल चुकचुकत होती. नायगावचे पाणी–पंचायतचे विलास साळुंखे मत मागणाऱ्या पुढाऱ्याला शिव्या द्यायचे, राजकारणी लोकांवर तुटून पडायचे, पुरंदरच्या परिसरातील लोकांना वारंवार सांगायचे–'राजकारणात वेळ घालवू नका'–आणि आज त्यांनीच राजकीय पक्ष काढला आहे. ते मत मागायला लोकांच्या समोर जाणार आहेत. राजकारणाशिवाय पर्याय नाही असं त्यांचं आता ठाम मत बनलंय! उद्या ते म्हणतील, सत्ताधारी पक्षात पाणीपंचायत विलीन झाल्याशिवाय पर्याय नाही. तेव्हा त्यांना निवडून देणाऱ्यांनी काय करायचं? पाण्याची वाट पहायची का पंचायतीचा झगडा सोडवण्यात वेळ दवडायचा? शेतकरी संघटनेचे शरद जोशी सारखं सांगतात, 'आम्ही मतं मागायला आलो तर जवळच्या झाडाला उलटं टांगून आम्हाला जोडयानी मारा!'–त्यांचं ऐकून निप्पाणीचा एक मनस्वी कार्यकर्ता प्रा. सुभाष जोशी हादेखील तंबाखू–आंदोलनाच्या वेळी तेच म्हणायचा– पण कर्नाटकच्या निवडणुकात सुभाष जोशी मतं मागायला उभा राहिला, शरद जोशी त्यांच्या प्रचारसभेला गेले– बहुधा पायांतील जोडे विसरून!– सुभाष जोशी निवडणूक हरले ही तर वेगळीच शोकांतिका– हे सर्व चालू असताना राळेगणशिदीचे म्हातारबाबा आणि इतर लोक ज्या विश्वासानं अण्णा हजारेंबद्दल बोलत होते त्या विश्वासाला अण्णा पात्र आहेत का नाही हे ओळखायचं तरी कसं? शेवटी कालाय तस्मै नमः।

माझ्या मेंदूत हे अल्पजीवी बौद्धिक किडे कळवळत होते आणि उंबराच्या सावलीत बसलेले म्हातारे बाबा सांगत होते, 'पुढाऱ्यांनी खुर्च्या मिळवल्या, आम्हाला आश्वासनं दिली–भरपूर आश्वासनं; पण झालं काहीच नाही! सगळं तिथल्या तिथं– आणि त्यातूनच आम्हाला शिक्षण मिळालं. पुढाऱ्यांनीच दिलं. पुढाऱ्यांच्या मागून गेलं की काही होत नाही, हे त्यांच्यामुळंच अनुभवानी शिकून आम्ही आता जराशिक शहाणे झालो– हा फायदा कमी हाये का?'

मी काही बोलणार इतक्यात दुसरे एक वृद्ध गृहस्थ म्हणाले, 'आता पूर्वी बघा एखादा पुढारी गावात येऊन सांगायचा– आपण देवळाचा जीर्णोद्धार करू. त्यासाठी वरगणी गोळा करा! आणि मग माझ्यासारख्या एखाद्याच्या कानात सांगायचा, 'शंभरातलं वीस तू ठेव ऐंशी मला दे– मी तुला सरपंच करतो!' मग मी वरगणी गोळा करून माझा हिस्सा वळता करून बाकीचा पुढाऱ्याकडं द्यायचो आणि वाट बघत बसायचो सरपंच कधी व्हतो म्हणून! दरवर्षी हे असं चालायचं, मंदिराच्या जीर्णोद्धाराची वरगणी गोळा करायचो, काही मी खायचो उरलेले पुढाऱ्याला, मी काय सरपंच झालो नाही आणि मंदिराचा जीर्णोद्धारपण झाला न्हाई. एक झालं, मला जसा पुढाऱ्याचा डाव समजला, तसं मी त्याला रुपयातलं आठ आणेच द्यायचो. नंतर तो आमच्या गावाला यायचाच बंद झाला. मी मात्र वरगणी खाल्ली. देवळाला एक नवा दगडदेखील बसवला न्हाई. आम्ही आमचाच उद्धार करत राहिलो; पण अण्णा हजारे एकदम वेगळा! त्याला स्वार्थच नाही. त्याच्यासमोर आमची आम्हालाच लाज वाटू लागली. अण्णानं खरा रस्ता दाखवला म्हणून आम्ही त्या मार्गानं गेलो. अण्णा म्हणाला, 'ह्या रस्त्यानं नीट जा तुला भाकरी भेटेल!' तसं आता आम्ही चाललोय बघा. पुढाऱ्यामागनं गेलो असतो तर राळेगणशिदीत फक्त नरकवास उरला असता! ह्या पुढाऱ्यांचं काही खरं नाही. आम्हाला आता पक्कं उमजून आलंय बघा!'

म्हातारबाबा हे सारं तळमळीनं सांगत असले तरी माझं मन बेचैन झालं होतं. विलास साळुंखे, सुभाष जोशी, शरद जोशी ही माणसं उगाचच त्यांचे उद्गार मनात घुमवत राहिली होती. राजकारण चांगलं का वाईट हे मला माहीत नाही. दारू पिणं चांगलं का वाईट? असा माझा वैयक्तिक प्रश्न जसा आहे तसाच हादेखील वैयक्तिक प्रश्न असावा! विलास साळुंखेंनी नायगावच्या परिसरात ज्या पद्धतीनं जनमानसाची पकड घेतली होती किंवा आहे, सुभाष जोशी म्हणजे निप्पाणीमधील तंबाखू विडीकामगार आणि देवदासी हे समीकरण जसं अजूनही मनात पक्कं आहे किंवा शरद जोशी, माधवराव खंडेराव मोरे, प्रल्हाद पाटील, कऱ्हाड म्हणजे शेतकरी संघटना ह्या कुणाचाच मत मागण्याशी संबंध येणार नाही असा विश्वास!... विलास साळुंखे आणि सुभाष जोशींनी ह्या विश्वासाला एक बारीकसा तडा दिला आहे. मग राळेगणशिदीचे अण्णा हजारे ह्यांच्यावर लोकांनी जो विश्वास टाकला आहे त्याला तडा गेला तर? उद्या अनुताई वाघ निवडणुकीला उभ्या राहिल्या तर? मधू देवलांनी राजकीय पक्ष स्थापन केला तर? ग्रामीण भागात राहून अडाणी शहाणपण असलेलं बरं; पण शहरात राहून असलं शहाणं अडाणीपण नको असं वाटायला लागतं– मेंदूतले हे किडे जेव्हा वळवळ करायला लागतात तेव्हा! क्षणभर वाटलं राळेगणशिदीला आपण उगाचच आलो, कोसबाड बघायलाच नको होतं, म्हैसाळला जाऊन मधू देवलांचं काम बघण्यात, तेथील कांबळे मंड-

## अण्णा हजारे एकदम वेगळा! त्याला स्वार्थ नाही...

ळींच्याबरोबर दिलजमाई करण्यात आपण चूक केली. शेतकरी संघटनेच्या आंदोलनाशी आमचा काय संबंध ? कशाला ह्या नसत्या उपद्व्यापात आपण पडलो ? राळेगणशिंदीचा अण्णा हजारे ह्या निवडणुकीच्या रिंगणात उभा राहिला तर ?

मनातले हे विचार बाजूला झटकत मी मापारेंच्या वस्तीवरील उंबराच्या पाराखाली बसलेल्या वयोवृद्ध माणसांना विचारलं, 'मी जरा स्पष्ट बोलतो त्याबद्दल माफ करा. ह्या पृथ्वीवर कुणीही अमरपट्टा घेऊन आलेला नाही. समजा उद्या अण्णा हजारे गेले– तर तुम्ही काय करणार ? त्यांचा फोटो लावून त्याची पूजा करत बसणार, की त्यांनी दाखवलेल्या मार्गानं चालणार ?'

उंबराच्या पाराखालची सावली एकदम निःशब्द झाली. कुणीच डोळ्याला डोळा भिडवेना. मी गप्पच होतो. अखेर एक म्हातारबाबा म्हणाले, 'हे बघा सायेब, तुम्ही शहरची शिकलेली माणसं. तुमचे प्रश्न आमच्यासारख्या वेडचाबाकडचा माणसांना नीट कळत नाहीत, म्हणून नीट उत्तर सुचत नाही. अण्णा हजारे जर गेले ना तर आम्ही त्यांच्या समाधीची पूजा करणार आणि त्या मार्गावरून चालणार ! आता गांधीबाबाच्या फोटूला आम्ही दरवर्षी हार घालतोय का न्हाई?'

जबाब तसं पाहिलं असता बिनतोड होता; पण माझाच प्रश्न विचारताना ताबा सुटला आणि मी म्हणालो, 'अहो, गांधीबाबाच्या फोटूला तुम्हीच दरवर्षी हार घालता असं नाही, सगळेच घालतात. गांधीबाबांच्या नावानं राज्य करणारे तर सगळचात मोठ्ठा हार घालतात; पण हे लोक गांधीबाबाच्या मार्गानं चालतात का ? हार घालणारे तसे चालले असते तर अण्णा हजारेंना करण्यासारखं काम उरलंच नसतं ! तुम्ही अण्णा हजारेंच्या समाधीची वर्षातून एकदा पूजा कराल, फोटोला हार घालाल, त्यांच्या मार्गानं चालाल; पण तरुण पिढीचं काय ? ते चालणार का ह्या मार्गानं ? तुमच्या इथं यादवबाबा होऊन गेले ! त्यांची समाधी तुमच्या गावात आहे. त्यांच्या काळातील वृद्ध माणसांनी त्यांनी सांगितलेला आचार पाळला असेल; पण नंतरच्या पिढीनंच इथं चाळीस दारुभट्टचा उभ्या केल्या ना ? मग तुमची तरुण पिढी अण्णा हजारेंनी दाखवलेल्या मार्गावरून चालणार का ?'

'नक्की चालणार !'– मापारे उसळून म्हणाले आणि माझ्या हाती हुरडा देत निश्चयी आवाजात सांगू लागले, 'अहो सायेब, सगळ्याच प्रश्नांना वकिली जबाब देता येत न्हाई; पण आम्हाला अंतःकरणापासून जाणवतय ! आमची खात्री आहे की, आमची लेकरे नीट मार्गावरून जाणार; पण तुम्हाला हे समजावून कसं सांगायचं ? तुम्हाला ते पटणार न्हाई. तुम्ही पुरावा मागणार ! अहो, आतून अंतःकरणाला जे पटतं ना त्याचा कागदोपत्री पुरावा देता येत नाही! आमच्यासारखी येडीवागडी मानसं मार्गाला आली तर आमची शिकल्याली, चांगले संस्कार झालेली तरुण पोरं कशाला वाकडया मार्गानं जातील ?'

वातावरणातला ताण कमी करावा म्हणून मी एक कबुली देत म्हणालो, तुमच्या गावात आज तीन दिवस आम्ही नवराबायको वावरतोय. आमच्या कानावर एकही शिवी पडली नाही, ह्याचं मात्र आम्हाला राहून राहून आश्चर्य वाटतंय. पुण्याला गणपतीबाप्पासमोर नाचताना किंवा बाप्पाला बुडवताना नुसत्या आईमाईच्या शिव्या ऐकायची आमच्या कानांना सवय झाली आहे. इतरत्रही शिवी हेच मराठी भाषेचं भूषण असं लक्षण आहे; पण तुमच्या इथं कानात शिवी पडली नाही. म्हणून चुकल्यासारखं वाटतंय !'

मी सांगत होतो ते खरंच होतं. राळेगणशिंदीमध्ये कानावर शिवी पडत नाही. माझं निरीक्षण ऐकून सुखावलेले मापारे म्हणाले, 'संतकृपा झाली तिथं इमारत फळा आली अशी उक्ती आहे. अहो, जिथं भजन चालू आहे तिथं शिवीगाळ ऐकू येणार का ?'

त्यांना डिवचण्यासाठी मी म्हणालो, 'पण आमच्या शहरात शिव्यांचच भजन चालतं ना ?' त्यावर मापारे म्हणाले, 'तुमच्या शहराचं इथं नका सांगू. तो तुमचा 'प्राब्लेम '–मी इथलं, आमच्या खेडेगावचं, आमच्या राळेगणशिंदीचं तुम्हाला सांगतो, इथं वाईट विचार ऐकायला मिळणार नाहीत !

इकडचं वातावरण आता शुद्ध झालंय अण्णा हजारेंनी आता कुठं जमिनीची व्यवस्थित मशागत केली आहे. अशा जमिनीत आणि शुद्ध वातावरणात आता आम्ही रोपं लावतोय. त्यांना फळं चांगलीच येणार ! अहो, निसर्गाचा नियमच आहे तसा ! अदुगर सांगितल्याप्रमाणे आमचा गाव मोडकाळलेला, चाळीस हातभट्ट्यांची राळेगणशिंदी. आजूबाजूच्या गावचा एक एक छबिना इथं यायचा. दारू पिऊन मगरमस्त व्हायचा. यंदोळयंदोळ दारू चालायची. कुणाला कपडे न्हाईत, कुणाला अन्न न्हाई. शेतसारा लहान. जो तो झोळीत मिळेल ते पळवायचा. मतदानवाले यायचे. त्यांना तर हे सगळं एकदम पसंत. त्यांना अशाच गावांची आवड. आम्ही जितके येडे आणि गुतलेले तेव्हढा मत मागणाऱ्या पुढाऱ्याचा फायदा ! अशी सारी परिस्थिती. अहो, शहाणा माणूस जरी गावात आला तरी सात दिवसांत दारू प्यायला शिकायचा, महिन्यात तरबेज व्हायचा !'

मापारेंना अडवत एक म्हातारबाबा म्हणाले, 'खरं हाये हे – मी स्वतः होतो ना दारू पिणाऱ्यातला एक; पण आता सहा वर्षं झाली दारूला हात लावला नाही. माझं वय गेलंय सत्तरीच्या पल्याड. मी सुधारलो. सगळं आयुष्यच बदलून गेलं माझं. अण्णा हजारेंनी वाट दाखवली, मला ता नीट गवसली. त्या वाटेनं मी चाललोय बघा !' अहो, सगळं सर्वत्र निर्मळ होणं अवघड हाये सायेब. त्ये येकदम व्हनार न्हाई. आता रामराज्यात देखील एका परटानं आपलं कापडं धुवायचं काम सोडून सीतामाईवर संशय घेतलाच का न्हाई ? मग राळेगणशिंदी काय रामराज्यापेक्षा थोर हाये का ? पण एका मार्गावरून चाललंय ! आता तुम्ही शहरवाले मात्र त्या परटासारखे अडचणी आणू नका. काय कापडं धुवायची ती तिथं तुमच्या शहरात धुवा ! एव्हढं केलंत तरी पुष्कळ झालं. न्हाई, मगाधरनं ऐकत होतो, तुम्ही फारच खोलवर चवकशी करायला लागला तेव्हा तुमचा उद्देश कळना. शेवटी तुम्हीच स्पष्ट विचारलंत म्हणून स्पष्ट सांगितलं. त्याचा राग मानू नका. आम्ही येडी मानसं !'

संवाद भलत्याच दिशेनं का होईना पण रंगत चालला होता, म्हणून मी देखील मैदान सोडायचं नाही असं ठरवलं. काय व्हायची ती खडाखडी एकदा होऊन जाऊ दे म्हणून जरा आवाज चढवून मी म्हणालो, 'आता मी पण माझं शहरी वेडेपण जरा जास्त स्पष्टपणे सांगतो. गाडगेबाबांनी थोर सामाजिक कार्य केलं. त्यांना वास्तविक

आपण 'मिस्टर गाडगे' म्हणायला पाहिजे. त्यांनी सांगितलेल्या गोष्टी आचरणात आणल्या असत्या तर ग्रामीण भागात खूप फरक पडला असता; पण ग्रामीण भागातले तुम्ही लोक येडे नसून महामतलबी आहात. महाचोर आहात ! मिस्टर गाडगेंनी सांगितलं, देवळात देव नाही ! पण 'तुम्ही' काय केलं? त्यांच्या हयातीतच त्यांचा 'बाबा' केलात ! 'महाराज', 'संतशिरोमणी' केलात. ते मेल्यावर त्यांचं देऊळ बांधून, त्यांनी सांगितलेला 'आचार' विसरून, त्यांच्या नावानी टाळ कुटत, 'विठ्ठलाच्या पायी थरारली वीट' म्हणत भजनात वेळ घालवत बसलात. तुम्ही मिस्टर गाडगेंचा लगेच 'देव' किंवा 'अवतार' करून टाकलात ! कशासाठी माहीत आहे? त्यांनी सांगितलेल्या 'आचारा'पासून पळण्यासाठी. टाळ कुटणं सोपं— आचार कठीण ! स्पष्टच बोलतो म्हणून राग मानू नका. मिस्टर गाडगे हाती झाडू घेऊन गाव साफ करायचे. आम्ही आता त्यांची झाडू देव्हाऱ्यात ठेवून तिला नमस्कार करत बसलोय ! त्या झाडूची वेळ पडल्यास आम्ही दिंडीदेखील काढू ! – तसंच इथं होणार का? तुम्ही अण्णा हजारेंनी शिकवलेला आचार पाळणार का त्यांना संतशिरोमणी करणार ? अण्णा हजारे गेल्यानंतर त्यांची इथं समाधी बांधून गावाचा मात्र उकिरडा असा प्रकार होणार का? जो आपल्या आळंदी–पंढरपूरला झालाय तसा !'

उंबराच्या सावलीत बसलेले सगळेच मुकाट झाले: हुरडादेखील संपत आला होता. मला कळत नव्हतं, मी राळेगणशिंदीला आलो कशाला? हे प्रश्न विचारायचा अधिकार काय? आजूबाजूला बसलेली माणसं वयोवृद्ध. माझ्यापेक्षा तीस-चाळीस पावसाळे आणि दुष्काळ बघितलेली. त्यांना हे विचारणं योग्य का? सगळंच वातावरण घुसमटल्यासारखं झालं. हुरडाची शेकोटी पण विझत आली होती. घसा खाकरून मापारे म्हणाले, 'हे बघा, काही कुत्र्यांची शेपूट तुम्ही सहा महिने फुकणीत घालून ठेवलीत तरी एक वेळ फुकणी वाकेल पण शेपूट सरळ होणार नाही. – पण ज्यांना अर्थ कळलाय ते आचरण करणारच ! सगळी मुलं शाळेत जातात म्हंजे सगळीच ज्ञानी होतात असं नाही. अण्णा हजारेंचं मार्गदर्शन वेगळं आहे. 'मी आणि माझं' ह्या दोन गोष्टी त्यांच्याकडं नाहीत. अहो, प्रत्येक गावाला एक अण्णा हजारे भेटला तर तिथं राजकारण नको किंवा खाजकारण नको. मग सगळे पुढारी पोत्यात भरून समुद्रात फेकून दिले तरी देशाचं काही अडायचं नाही; पण सगळ्या गावात अण्णा हजारे नसतात हीच तर मोठी अडचण आहे ना !

ही तळमळ मला समजत होती. हा संवाद आता कुठं तरी थांबवला पाहिजे हे देखील जाणवत होतं. तरी देखील न रहावून मी विचारलं, – 'तुमचं म्हणणं असं आहे का, प्रत्येक गावात अण्णा हजारे असल्याशिवाय विकास किंवा सुधारणा होणारच नाही ?'

ह्या माणसाला आता काय सांगावं अशा आवाजात मापारे म्हणाले, 'अहो; गावाचाच काय पण देशाचा देखील होणार नाही ! पन आम्ही वेडी माणसं, आमच्या पंचक्रोशीशिवाय आम्हाला अनुभव नाही. तुम्ही जग फिरलेले. तुम्हाला दुसरं काही सूत्र माहीत असेल तर सांगा आम्हाला. आम्ही ऐकू !'

मापारेंचं आव्हान स्वीकारत मी म्हणालो, 'आम्हाला पुस्तकी ज्ञानातून जे माहीत आहे ते असं – विकासासाठी प्रथम योजना पाहिजे, योजनेसाठी पैसा आणि ज्यांचा विकास घडायचा किंवा ज्यांना आपला विकास घडवून घ्यायचा त्यांच्यात एकी. ह्या तीन गोष्टी असल्या तरच विकास होतो; पण तुम्ही म्हणता अण्णा हजारेशिवाय विकास शक्य नाही ! – मग दुसऱ्या एखाद्या खेड्याकडे योजना असेल, पैसा उपलब्ध असेल, एकी असेल; पण अण्णा हजारे नसतील त्यांनी काय करायचं? विकासाला पाठ दाखवायची? आमच्याकडे अण्णा हजारे नाहीत म्हणून निष्क्रियपणे हातपाय गाळून बसायचं ? आपल्याला हे पटत नाही!'



¤

**आमची लेकरे आता**
**नीट मार्गावरून नक्की जाणार...**

¤

एक म्हातारबाबा गंभीरपणे म्हणाले, 'सायेब तुम्ही काय वाटेल ते म्हणा पण आज प्रत्येक गावाला एक अण्णा हजारे पाहिजे असं आम्हाला वाटतंय बघा. हे मी माझ्या अनुभवावरून सांगतो. पैशानं काही होणार नाही. अजिसात काही चालणार नाही. योजना खूप असतात सगळयांच्याच डोस्क्यामधी – पण नि:स्वार्थी मार्गदर्शक पाहिजेच पाहिजे ! पुढारी नको, तुमचे ते कार्यकर्ते नकोत, संघटक नकोत. फक्त मार्गदर्शक पाहिजे, शुद्ध आचरणाचा आणि नि:स्वार्थी – तुम्ही म्हणाला आम्ही महाचोर, लबाड्या करणारे म्हणून ! – म्हणूनच आम्हाला मार्गदर्शक पाहिजे. तरच सुधारणा व्हणार. नाहीतर उकिरड्यातच लोळायचं सर्वांनी – तुम्हीबी आणि आम्हीबी. अहो, गोवर्धन उचलायला गेल्यावर कृष्णानं निस्ती करंगळी लावली, तवा पेंद्या काय म्हणाला ? ह्ाये माहिती तुम्हाला ? – अहो, पेंद्या म्हणाला, माझ्या कृष्णाची माया मोठी न्यारी ! तसंच असतंय हे सगळं आधार पाहिजे असतो फक्त करंगळीचाच – पण कृष्णाच्या करंगळीचा !'

मापारे कुटुंबाच्या वस्तीवरील उंबराच्या पाराच्या सावलीत बराच वेळ बैठक मारून बसल्याने पायाला तर मुंग्या आल्याच होत्या; पण जो सुसंवाद घडला त्यामुळे मेंदूदेखील झिणझिणत होता. शर्टावर पडलेला हुडर्याचा धूळकचरा झटकत उठताना मी मापारे कुटुंबियांचे आभार मानले (–ही आपली शहरी तऱ्हा, अंगवळणी पडलेली) आणि म्हणालो, 'अण्णा हजारेंच्या धाकानं तुम्ही हातभट्ट्या बंद केल्या हे मी समजू शकतो; पण ज्याला अनेक वर्षे दारू पिण्याची सवय जडली त्याचं व्यसन कसं सुटलं हे मात्र मला अजूनही नीट उमगलं नाही...' (हीदेखील शहरी तऱ्हाच, आभार मानून खोचक प्रश्न विचारण्याची–अंगवळणी पडलेली–विशेषत: पुण्यात आल्यापासून ! )

हुरडा भाजण्यासाठी केलेला जाळ विझवत मापारे संथ आवाजात म्हणाले, 'अहो, ह्यात काही कठीण नाही. आता समजा एक बाई एका पुरुषाबरोबर दहा–पंधरा वर्षं संसार करती. तिला दोन–चार मुलं झाल्यावर नवरा मरतो. तर ती बाई दुसऱ्याबरोबर 'तसा' संबंध ठेवत नाही. नवरा असताना लागलेली 'ती' सवय नवरा मेल्याबरोबर त्याच्यासंगच नाहीशी होते. तसंच राळेगणशिंदीचं आहे. दारूच्या भट्ट्या बंद पडल्यावर पिणाऱ्यांची सवय सुटायला वेळ लागत नाही आणि एक गोष्ट लक्षात घ्या, इकडच्या हातभट्ट्या फक्त अण्णा हजारेंच्या भीतीनं बंद पडल्या नाहीत. हांऽऽ–भीती जरूर होती; पण ह्ा माणूस आपल्याला सन्मार्गी लावणार ह्या खात्रीमुळं दारूच्या भट्ट्या बंद झाल्या. अण्णा हजारेंच्या माराला भिऊन न्हाई !–नुस्तं मारून कुठलीच वाईट सवय सुटत नाही. माराच्या भीतीबरोबर समजूत घातली तर सगळं सुधारतं !'

निरोप घेण्याअगोदर मी मापारेंना शेवटचा प्रश्न केला, 'हातभट्टीचा धंदा बंद झाल्यावर तुमचा चरितार्थ कसा चालला ? पैसा कसा मिळवलात ? संसार कसा केलात ?'

मापारेंनी हात जोडून पुन्हा आकाशाला नमस्कार केला आणि ते म्हणाले, 'त्याची कृपा असली म्हणजे सगळं होतं बघा. काही कठीण नाही. मी दारूचा धंदा पैसे कमविण्यासाठी बारा वर्षांपूर्वी सोडला आणि मोठ्या मुलाला नोकरी लागली. त्याच कंपनीत दुसऱ्या मुलालाही नोकरी लागली. एक मुलगा कंत्राटदार आहे. एक कोर्स करतोय, दोन शाळेत शिकताहेत–आणि एक शेती बघतोय. सगळं कसं पद्धतशीर चाललंय, सुखासमाधानात आणि नीती पाळून ! –ज्यानं चोच निर्माण केली त्यानं चाऱ्याचीदेखील सोय केलेली असते. फक्त त्यावर विश्वास पाहिजे !'

¤

मापारेंच्या वस्तीवरून मी आणि सरोजा परत निघालो तेव्हा मनात अनेक विचारांचा कोलाहल चालला होता. हुरडा खुमासदार होता. लिटरभर रक्त वाढलंदेखील असेल; पण उंबराच्या पारावरील त्या गप्पागोष्टींनी मनात अनेक प्रश्नांचं काहूर माजवलं होतं. मापारे एके काळी दारूभट्टीचा व्यवसाय करत असतील; पण त्यांच्यातील माणूसपण हरवलं नव्हतं. त्यांच्याबरोबर ज्या मनमोकळ्या गप्पा झाल्या त्यातून हा मनुष्य वंदनीय आहे अशीच भावना झाली. वाल्ह्याचा वाल्मीकी हे कदाचित एकमेव उदाहरण नसावं. आपल्या देशात अशी उदाहरणं गावोगावी असणार. असे वाल्मीकी भेटल्यावर ते ओळखता मात्र आले पाहिजेत तरच कदाचित नवीन रामायण घडू शकेल. निदान लिहिता तरी येईल. रामायण अगोदर घडलं आणि मग लिहिलं का अगोदर लिहिलं आणि मग घडलं हे तरी आपल्याला निश्चितपणे अजून कुठं माहीत आहे ?

मापारेंच्या वस्तीवरील उंबराच्या पारावर गप्पा रंगल्या तेव्हा एक म्हातारबाबा–'शिक्षण' ह्या विषयावर चर्चा चालू असताना सहजपणे बोलून गेले होते, 'सगळे जर तुमच्यासारखे शिकून शहाणे झाले तर ही भिताडं कोण बांधणार, ह्या टिकाव–फावड्याला कोण हात लावणार, बैलांची दावण कोण धरणार, नांगरामागनं कोण चालणार, पेरणी–खुरपणी–कापणी–मळणी कोण करणार ? सगळीच शिकून शहाणी झाली तर धान्य कोण पिकवणार ? घराचं बांधकाम कोण करणार ? सगळाच विस्कोट नाही का होणार ?'–ह्या सर्व प्रश्नांना माझ्याकडे उत्तर नव्हतं आणि नाही. प्रश्न मात्र यक्षप्रश्नांपेक्षा कठीण हे निश्चित !

¤

भारतामधील कुठल्याही खेड्यात कार घेऊन गेलात की, गुळाच्या ढेपेला ज्याप्रमाणे मुंग्या चिकटतात त्याप्रमाणे मुलांचा आणि रिकामटेकड्या तरुणांचा गाडीला घेरावा पडतो. दार उघडून बाहेर पडणंदेखील मुष्कील होतं. धक्काबुक्की करून मार्ग काढावा लागतो. गळ्यात कॅमेरा असला तर विचारायलाच नको ! पोरांच्या झुंडीच्या झुंडी मागून येतात आणि काम करणं अशक्य करून सोडतात. राळेगणशिंदीत मात्र असं घडलं नाही. इकडच्या पारावर रेंगाळत निष्क्रियपणे बसलेलं कुणी दिसत नाही. शाळेतील मुलं आपआपल्या उद्योगात रमलेली असतात. अगदी सुट्टीच्या दिवशीदेखील इथं मुलं टवाळक्या करत फिरताना दिसणार नाहीत. ह्याचा अर्थ सगळी मुलं मिलिटरी शिस्तीच्या बडग्यानं–त्या भीतीनं गंभीरपणे वावरतात असा नाही. उलट इतकी हसतमुख आणि प्रसन्न चेहऱ्याची मुलं दुसऱ्या कुठल्याच खेड्यात आढळणार नाहीत. राळेगणशिंदीत भरपूर दारिद्र्य आहे. मुलांच्या अंगावर साधेच कपडे आहेत. काहींचे शर्ट जीर्ण होऊन न शिवता येण्याइतके फाटके आहेत; पण हसत–खेळत एकत्र काम करण्याची कला त्यांनी आत्मसात केली आहे. इथं प्रत्येक मुलामुलीच्या डोळ्यात एक वेगळी चमक आहे. ही मुलं खऱ्या अर्थानं

सुसंस्कृत आहेत !

आपला दुष्काळी गाव, सिंचनाची सोय होत नाही तोपर्यंत आर्थिकदृष्ट्या मागासलेलाच रहाणार हे लक्षात घेऊन अण्णा हजारेंनी गावातील मुलं हेच आपलं भांडवल असं ठरवून त्यांच्यावर योग्य संस्कार घडावेत ह्यासाठी अतोनात श्रम घेतले. त्याबद्दल बोलताना अण्णा हजारे म्हणाले—

'मुलांना आपल्या घरच्या माणसांबद्दल, इतर मुलांच्याबद्दल, वडीलधाऱ्या माणसांबद्दल प्रेम वाटलं तर त्यांचं स्वतःच्या घरावर प्रेम बसणार. घरावरचं प्रेम टिकून राहिलं की, मग गावाबद्दल प्रेम वाटायला लागणार. मग जिल्हा, मग प्रांत आणि देश ह्याबद्दल प्रेम निर्माण होणार. हे प्रेम निर्माण होण्यासाठी शाळेव्यतिरिक्त इतर शिक्षण मुलांना लहानपणापासूनच मिळायला पाहिजे हे लक्षात घेऊन आमच्या येथील शिक्षकांनी मधल्या सुट्टीनंतर रोज एक तास 'चिंतन' हा कार्यक्रम आखला. ह्या कार्यक्रमात प्रथम प्रथम शिक्षक स्वतःच एखादा चांगला इंग्रजी लेख वाचून दाखवायचे, एखादी गोष्ट सांगायचे, एखाद्या विषयावर चर्चा घडवून आणायचे. हळूहळू मुलांना वाटू लागलं की, आपणही एखादी गोष्ट सांगावी, एखादा निबंध लिहून-वाचून दाखवावा. अशा पद्धतीनं हा चिंतनाचा कार्यक्रम रंगत गेला. आता संध्याकाळी उगाच सार्वजनिक टीव्हीसमोर बसून कसला तरी सिनेमा किंवा छायागीतसारखे वाईट संस्कार घडविणारे कार्यक्रम बघण्याऐवजी मुलं चिंतनाच्या कार्यक्रमाकडे आकर्षित झाली आहेत. आज आमच्या गावात 'आमची माती आमची माणसं' असे निवडक कार्यक्रमच पाहिले जातात. त्यावर चर्चा घडवून आणली जाते. एशियाडच्या वेळी आम्ही टीव्ही मंदिरातल्या सभामंडपात बसवून व्यवस्थित अंधार करून, मुलांना सर्व कार्यक्रम चांगल्या रीतीने पहाता यावे, यासाठी खास सोय केली होती. एशियाडमधील आपल्या भारतीय क्रीडापटूंचं अपयश आमच्या तरुण पिढीच्या मनाला फार लागलं. अस्वस्थ झालेल्या ह्या तरुणांनी अनेक प्रश्न विचारून शिक्षकांना आणि मला हैराण करून सोडलं. इतकी जागरूकता चिंतनाच्या कार्यक्रमामुळं आमच्या मुलांत निर्माण झाली आहे. तुम्हाला आमच्या मुलांच्या वागण्यात, बोलण्यात एक वेगळा फरक निश्चितपणे जाणवेल !

: माझा स्वतःचा अध्यात्मावर आणि संतवाङमयावर विश्वास आहे. मग ते कुठल्याही धर्माचं असो. अध्यात्मिक जाणीव नसेल तर माणूस अपूर्ण असतो असं माझं वैयक्तिक मत आहे. आपल्या देशाची आज जी स्थिती झाली आहे, ह्याचं एक मुख्य कारण म्हणजे राज्य चालवणाऱ्या पुढाऱ्यांच्यात अध्यात्मिक भावना उरली नाही. फक्त स्वार्थ ! अध्यात्म माणसाला त्याग शिकवतं, दुसऱ्यासाठी काही केलं पाहिजे ही जाणीव अध्यात्मिक प्रवृत्ती असेल तर सतत जागी असते. मी अंधश्रद्धेला अध्यात्म म्हणत नाही. श्रद्धेला अध्यात्म म्हणतो. अध्यात्मानं सदाचार वाढतो.

: आमच्या इथं दर शुक्रवारी शाळेच्या मुलांना अध्यात्माचा एक पाठ असतो. त्याचा निश्चित परिणाम त्यांच्या चारित्र्यावर होणार. दुसऱ्याचं चोरू नये, दुसऱ्याचं नुकसान करू नये, दुसऱ्याच्या कामात हातभार लावायला चटकन पुढं यावं अशा प्रवृत्ती मुलांच्याच लहानपणापासूनच जोपासाव्या लागतात. त्या आपोआप निर्माण होत नाहीत. नुसत्या शालेय शिक्षणातून ह्या जाणिवा जिवंत होत नाहीत. त्यासाठी अध्यात्मिक बैठक निर्माण करणं जरुरीचं आहे.

: अहो, दहा-पंधरा वर्षांपूर्वी ह्याच मुलांच्या वडलांनी, आजोबांनी ह्या मंदिरात खांब चोरून जाळून दारू गाळली ! आज आता प्रत्ये-



प्रत्येक मुलानं एक झाड जगवलंच पाहिजे असा या गावात नियम आहे.

काच्या बांधावर पोपई, पेरू, संत्री ह्यांची झाडं फळांनी लगडली आहेत; पण चुकूनही कोणी दुसऱ्याच्या झाडावरील फळाला हात लावणार नाही का चिचेला धोंडा मारणार नाही. गावातील लोक आता घराला कुलूपदेखील घालत नाहीत.

आण्णा हजारेंशी बोलत ज्या मंदिराच्या सभामंडपात मी बसलो होतो तिथं साखरेची पोती, तांदूळ-गव्हाची पोती उघड्यावर रचून ठेवली होती. बाजूला मोठाली पितळी भांडी, पाचशे ताटं-वाट्या वगैरे सामान व्यवस्थित रचून ठेवलं होतं. सगळा माल उघड्यावर. ह्या गावात सामुदायिक विवाह होतात. प्रत्येकानं पाचशेएक रुपये द्यायचे विवाहाची सर्व कामगिरी तरुण मंडळ पार पाडतं. त्यासाठी हे सर्व सामान मंदिरात ठेवलेलं होतं. त्या दिशेने हात करून बाजूला बसलेले एक गृहस्थ अभिमानानं म्हणाले, 'अहो, एव्हढा लाख रुपयांचा सार्वजनिक संसार उघड्यावर पडलाय; पण त्यातल्या साखरेच्या दाण्याला कुणी स्पर्श करणार नाही, का कुणी तपेली-वाटीला हात लावणार नाही. फार फरक पडला पूर्वीच्यात आणि आत्ताच्यात! पूर्वी लग्नाची पंगत असली की कुणी लोटाभांडं चोरून न्यायचा, वाढणारा गडीच पुऱ्याची किंवा बुंदीची टोपली परस्पर लंपास करायचा, गोडाधोडाचं कुणी घोंगडीत लपवून घरला न्यायचं, अधाशासारखं बकाबका खायचं. सगळी बेशिस्त आणि नासाडी फार! आता सगळं बदलंय. आता पंगत पद्धतशीर बसते, वाढणारे पण पद्धतशीर वाढतात, कुणाला उगाच आग्रह नाही. प्रत्येक जण पोटापुरतं जेवतो, ताटात आता अन्नाचा कण कुणी वाया घालवत नाही. अण्णांनी पोरांना शिस्त लावली. पोरांचं व्यवस्थित वागणं बघून मग आम्हालाच आमच्या वागण्याची लाज वाटाया लागली. पोरांचं बघून मोठ्या माणसांना चांगल्या सवयी लागल्या-अशी उलटी किमया इथं घडली बघा! अन्न म्हणजे परब्रह्म हे आता सगळ्यांना समजलंय!'

आमचं हे बोलणं चालू असताना शाळेची मधली सुट्टी झाली. मुलं शिस्तीनं रांगा करून वर्गाबाहेर आली. गोंगाट नाही, आरडा-ओरडा, गोंधळ, मारामारी काही नाही. हसत-खेळत सगळे नळापाशी आले. स्वच्छ हात धुऊन घोळक्या-घोळक्यानं डबे सोडून जेवायला बसले. वसतिगृहाची मुलं जेवणासाठी मंदिरात आली होय, इथं उत्तम प्रकारे चालवलेल वसतिगृह आहे. गावकऱ्यांनी श्रमदानानं बांधलेलं. इथं मुलांना चांगलं वळण लागतं म्हणून मुंबईत स्थायिक असलेल्या काही जणांनी आपल्या मुलांना राळेगणशिंदीच्या वसतिगृहात ठेवलं आहे.

इथं शाळेची वेळ सकाळी आठ ते संध्याकाळी पाच अशी आहे. ज्या विषयांचं पुस्तकांच्या आधारे अभ्यास करायचा त्यांच्या आकलनासाठी सकाळची वेळ उत्तम हे लक्षात घेऊन सकाळी आठ ते अकरा-वीसपर्यंत शैक्षणिक धडे. अकरा-वीस ते बारा-वीस एक तास जेवणाची सुट्टी. जेवणानंतर दुपारी साहजिकच डुलकी लागण्याची शक्यता म्हणून चितनासारखा रंगतदार कार्यक्रम, त्यानंतर सायन्सचे प्रयोग, बागकाम वगैरे मुक्त कार्यक्रम, त्यानंतर चित्रकला एक तास वाचन (शाळेत चांगली लायब्ररी आहे.) आणि मग चार ते पाच सर्वांनी खेळाच्या मैदानावर जायचं. इथं मुलांना खेळण्यासाठी अकरा एकरांचं भव्य पटांगण आहे. खो खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, रिंग टेनिस, लांब उडी, उंच उडी, धावण्याच्या शर्यती, गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक हे सर्व खेळ 'रोटेशनने' सर्व मुलामुलींनी खेळलेच पाहिजेत असा नियम आहे. आठवड्यातून दोन वेळा सांघिक कवायत-आणि तीदेखील अतिशय कलापूर्ण रीतीनं इकडची मुलं-मुली करतात. सुट्टीच्या दिवशी क्रिकेटची 'वन् डे' मॅचदेखील इथं खेळली जाते.

ह्या सर्वांबद्दल अण्णा हजारे म्हणाले, 'जे म्हातारे वयस्कर आहेत त्यांचं आयुष्य संपल्यातच जमा धरायचं-पण ह्या नव्या पिढीला ही संधी देणं महत्त्वाचं आहे. खेळाच्या मैदानावर एकत्रितपणे वावरण्यानं मुलामुलींची शरीरं तर सुदृढ होतातच; पण मनंदेखील निरोगी बनतात असं मला वाटतं. लहान आणि तरुण मुलांना नियमित व्यायामाची आणि सांघिक खेळ खेण्याची सवय असणं त्यांच्या व्यक्तिमत्त्वविकासाच्या दृष्टीनं फार महत्त्वाचं आहे हे आम्ही गावकऱ्यांना पटवून दिलं आणि सहा जणांनी मिळून आम्हाला अकरा एकर जमीन दान दिली-तेच हे पटांगण!

: एक छत्रपती शिवाजी झाला तर त्याची प्रेरणा महाराष्ट्राला आणि देशाला अजून जाग आणते. 'बोल छत्रपती शिवाजीमहाराज की जय बोल' अशी आरोळी ठोकून आपली इन्फंट्री जेव्हा ॲटॅक करते तेव्हा नुसत्या त्या गर्जनेनंच शत्रूचं धाबं दणाणून जातं आणि आपल्या जवानांना स्फुरण चढतं. एक विवेकानंद झाला आणि साऱ्या जगानं मानवतावादाची प्रेरणा त्याच्याकडून घेतली. आमच्या राळेगणशिंदीमधूनही असा कुणी तरी निर्माण होईल! त्यापासून जगाचं सोडा पण तालुक्यातील इतर तरुणांनी प्रेरणा घेतली तरी आम्ही जिंकलो असं मला वाटेल! 'झाले ते होउनी गेले, आता तरी वर्तले पाहिजे, जाणपणे' ह्या वचनानुसार निदान ही पिढी तरी मजबूत बनवू या! अशा प्रकारे आमचे प्रयत्न चालू आहेत.'

□

राळेगणशिंदीच्या अण्णा हजारेंना म्हणूनच सुरुवातीला मी द्रष्टा सद्गृहस्थ असं म्हटलं होतं. राळेगणशिंदीमधील शाळेतील मुलांच्यावर आठवड्यातून दोन दिवस ग्रामसफाईचं काम सोपविण्यात आलं आहे. लहान वयातच 'आपल्या गावासाठी काही तरी करावं' ही भावना त्यांच्या मनात रुजविण्यात आली असल्यामुळं 'आपलं' गाव स्वच्छ आणि सुंदर कसं दिसेल ह्यासाठी विद्यार्थी सतत प्रयत्नशील असतात. मुलांना स्वच्छतेची आवड लागली त्याचा अप्रत्यक्ष परिणाम त्यांच्या पालकांवर झाला. वडीलधाऱ्या माणसांनी सवड असेल तेव्हा घराच्या शाकारणीला, घरं रंगवायला सुरुवात केली.

हे सर्व सुरू झालं तरी गावात भांडणतंटे हे चालू असायचेच. कारण नेहमीचंच. बांधावरचं झाड. शेवटी अण्णा हजारेंनी एकदा ग्रामसभा घेऊन निर्णय घेतला की बांधावरील सर्व वादग्रस्त झाडं तोडायची आणि त्यांचा उपयोग करून मंदिराला जोडून सभामंडप बांधायचा. गावकऱ्यांना कल्पना पसंत पडली. बघता बघता श्रमदानातून मंदि-

**'झाले ते होउनी गेले, आता तरी वर्तले पाहिजे, जाणपणे'**

राचा जीर्णोद्धार झाला. भव्य सभामंडप उभारण्यात आला. पारास-भोवतालचा सर्व परिसर साफ करण्यात आला. घरोघरी शोषखड्डे करण्यात आले आणि सांडपाण्याचा प्रश्न सुटला. त्याचा अप्रत्यक्ष परिणाम आरोग्यावर झाला.

सभामंडपामुळे गावकऱ्यांना एकत्र येऊन सभा घेण्याची सवय झाली. त्यातून मग गावच्या आर्थिक विकासावर चर्चा सुरू झाली आणि गाव बहात्तरच्या दुष्काळाच्या तडाख्यात सापडला. त्या वेळी टेल्कोच्या टाटा रिलीफ कमिटीनं धान्यवितरणाची, खाद्यतेलाची सोय केली. दुष्काळात तीन नालाबंडिंग आणि एक पाझर तलाव बांधण्यात आला. दुष्काळ ओसरून पाऊस पडला तेव्हा ह्या नाला-बंडिंग आणि पाझर तलावाचा परिणाम म्हणून गावच्या विहिरींचं पाणी वाढलं. उन्हाळ्यात टिकलं. ते पाहून गावकऱ्यांनी बँक ऑफ महाराष्ट्रचं कर्ज काढून एक मोठी सामुदायिक विहीर खोदली. त्या पाण्यावर सामुदायिकपणे भेंडी पिकवून ती सर्व मॅफकोतर्फे एक्सपोर्ट करून बँकेच्या कर्जाची सव्याज फेड केली. गावकऱ्यांच्या मनात नवीन उमेद निर्माण झाली. हे सर्व चालू असताना भांडणाचं आणखी कारण शिल्लक उरलंच होतं. ते म्हणजे बैलपोळ्याचा सण! कुणाची बैलजोडी पुढं ह्यावरून हमखास भांडणं होऊन रंगाचा सगळा बेरंग व्हायचा. हा मानपानाचा प्रश्न सोडविण्यासाठी सर्वांच्याच जोड्या एका रांगेत उभ्या करून मग मिरवणूक काढायची असा तोडगा निघाला. लग्नसमारंभात अनाठायी खर्च, रुसणे-फुगणे हे सर्व बंद करण्यासाठी सामुदायिक विवाह हा मार्ग गावकऱ्यांनी स्वीकारला.

राळेगणशिदीमध्ये चौथीपर्यंतच शाळा होती. गावकऱ्यांनी श्रमदानाने शाळा वाढविली आणि दहावीपर्यंतचे वर्ग सुरू केले; पण शासन आडवं आलं. मान्यता देईना. तरुण शिक्षकांनी जिद्द सोडली नाही. पगार न घेता ते शिकवत राहिले. वास्तविक त्या वेळचे शिक्षण-मंत्री शंकरराव काळे हे अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री, पारनेर तालुक्याचे आमदार पण त्यांनीच आडकाठी घातली. शेवटी अण्णा हजारेंनी आमरण उपोषण जाहीर केलं. तेव्हढ्यात ते मंत्रिमंडळ गडगडलं. नवीन मंत्र्यांना बाळासाहेब भारदे आणि विखेपाटील ह्यांनी राळेगणशिदीचं प्रकरण समजावून सांगितलं आणि शाळेला मान्यता मिळाली. हायस्कूल सुरू झाल्यावर आजूबाजूच्या परिसरातून दूर-वरून मुलं येऊ लागली. त्यांची जाण्यायेण्याची अडचण लक्षात घेऊन गावकऱ्यांनी श्रमदानानं वसतिगृह बांधलं.


¤

१९८१ साली गावाचं शेतीउत्पन्न नऊ लाख रुपये होतं. आज ते वीस लाखाच्या आसपास आहे. दहावीच्या वर्गात तेव्हा दहा मुलं होती, आज शंभर आहेत. बँकेचा व्यवहार पाच लाखाचा होता, आज बँक ऑफ महाराष्ट्राचा व्यवहार पस्तीस लाखाच्यावर आहे.


ह्या गावाची आर्थिक सुधारणा होण्यासाठी सुरुवातीला फक्त पाच लाख रुपयांचं भांडवल लागलं हे लक्षात घेऊन प्रत्येक जिल्ह्यामधील किमान पंचवीस गावं दरवर्षी निवडून तिथं आर्थिक विकासाचा पाया घालणं का अशक्य असावं?

राळेगणशिदीमध्ये हे घडू शकतं तर इतरत्र का घडू नये? ह्या एव्हढ्या लहानशा, फक्त अठराशे लोकवस्तीच्या गावात बँक ऑफ महाराष्ट्रनं आपली शाखा उघडली आहे. जर एक अण्णा हजारे, गावची जिद्द आणि बँक ह्यांच्या सहकार्यातून गावात आर्थिक प्रगती होऊ शकते तर इतर बँका आणि त्यांच्या परिसरातील खेड्यांना हे अशक्य का असावं?

बँक ऑफ महाराष्ट्रला राळेगणशिदीमध्ये जे सहकार्य मिळालं त्यात सिंहाचा वाटा बँकेचे फील्डऑफिसर श्री. तिरंदाज यांचा आहे. श्री तिरंदाजांनी राळेगणशिदीमधील नागरिकांचे जे प्रेम संपादन केले ते बँक ऑफ महाराष्ट्रचे फील्डऑफिसर म्हणून नव्हे—एक



तीन सामुदायिक बायोगॅस,
तीन हरिजन कुटुंबांना
वैयक्तिक गोबरगॅस आणि
इतर वीस गोबरगॅस...
महाबँकेने यासाठी साडेपाच लाखांची
गुंतवणूक केली आहे.



¤
घरोघर मातीच्या,
जाळाधुराच्या अशा चुली
पूर्वापार होत्याच...
¤

माणूस म्हणून त्यांनी गावचा विश्वास संपादन केला आणि त्या पायावर विकासाचा पहिला मजला रचला.

प्रत्येक गावाला जर एका अण्णा हजारेची गरज असेल तर प्रत्येक बँकेलादेखील बँक ऑफ महाराष्ट्रच्या तिरंदाजसारख्या ऑफिसरची गरज आहे, बँकांमधून जर असे तिरंदाज पुढं आले तर आज मोडकळीस आलेल्या ग्रामीण भारताचं स्वरूप बदलून तेथील नागरिक घरंदाज बनण्यास वेळ लागणार नाही. ते थोडंसं दिवास्वप्न पहाण्यासारखं आहे; पण जर स्वप्नच पहायचं झालं तर ते विध्वंस, उलथापालथ, रक्तरंजित क्रांती असलं पहाण्याऐवजी राळेगणशिदीचं पाहिलं तर जास्त उत्तम, कारण राळेगणशिदी हे स्वप्न नसून सत्य आहे.

सुरुवातीला बँक ऑफ महाराष्ट्रनं येथील २५० शेतकऱ्यांना बारा लाखाचं कर्ज दिलं आणि त्यातून भेंडीची सामुदायिक शेती करून शेतकऱ्यांनी वीस लाख रुपये मिळवले. बँकेचं कर्ज व्याजासह फेडून हे खातं बंद देखील करून टाकलं. कर्जमाफी म्हणजे प्रगती असं मानणाऱ्यांनी हे उदाहरण ध्यानात घेण्यासारखं आहे. आज राळेगणशिदीमध्ये तीन सामुदायिक बायोगॅस, तीन हरिजनकुटुंबांना वैयक्तिक गोबरगॅस आणि इतर वीस गोबरगॅस ह्यासाठी बँकेनं साडेपाच लाखाची गुंतवणूक केली आहे.


ह्या गावाजवळून कुकडीचा कालवा नजदीकच्या भविष्यकाळात वहाणार. आज संपूर्णपणे जिरायती असलेलं हेच गाव बागायती होणार त्या वेळी सरकारच्या सबसिडीचा पांगुळगाडा न वापरता एखाद्या कुशल कारखानदाराप्रमाणे बँकेशी पैशाचा व्यवहार करून स्वतःची आर्थिक प्रगती हे गाव करून घेणार हे निःसंशय—आज त्यांना बँकेशी व्यवहार करण्याचं तंत्र अवगत झालं आहे. कर्ज घेणं, ते जबाबदारीनं फेडणं हे सर्व त्यांच्या अंगवळणी पडलं आहे. त्यामुळं कालव्याशेजारील अनेक बागायती गावात ज्या अनिष्ट प्रथा आपल्याला पहावयास मिळतात त्या इथं दिसणार नाहीत. राळेगणशिदीचा नैतिक पाया मजबूत आहे. त्यामुळे आर्थिक व्यवहारही चोख करण्याची त्यांच्यात प्रवृत्ती आहे.

अनेक जिरायती गावातील नागरिकांना बँकेची पायरी चढण्याची भीती वाटते. बँकेचं कर्ज म्हटलं की धसकाच बसतो. ज्यांचा संबंध फक्त भूविकास बँकेशी आला आणि ज्यांनी जप्ती अनुभवली तो तर बँकेच्या जवळपास फिरकायला तयार नसतो. त्याला लाचारीनं सबसिडीवर जगावं लागतं. राळेगणशिदीमध्ये जे घडलं आणि घडत आहे ते अनेक गावांना मार्गदर्शक ठरू शकेल.

¤

स्वातंत्र्यानंतर एक जमाना असा होता की, देशासाठी त्याग करण्याची वृत्ती जिवंत असलेले अनुताई वाघ, अण्णा हजारे, मधू देवल ह्यासारखे सच्चे कार्यकर्ते; अनेक ठिकाणी होते; पण त्या वेळी पैसा, योजना आणि कल्पकता ह्यांचा तुटवडा होता. जो पैसा होता तो भलत्याच प्रकारची 'आधुनिक मंदिरे' बांधण्यापायी खर्चला जात होता. त्यातूनच शहर आणि ग्रामीण भागात एक भेग पडली, ज्याची आज एक प्रचंड दरी झाली आहे. आज अनुताई वाघ, अण्णा हजारे, मधु देवल दुर्मिळ होत चाललेत आणि पैसा, योजना आणि कल्पना ह्यांचा पाऊस पडतो आहे. त्यातून गाव दत्तक घेण्याच्या कार्यक्रमांना ऊत आला आहे.

गाव दत्तक घेणे हा प्रकार विकासाच्या मार्गात बसत नाही. सुदैवानं बँक ऑफ महाराष्ट्रच्या डॉ. वसंतराव पटवर्धनांना 'गाव दत्तक घेणे' ह्या वाक्प्रचाराचा तिटकारा आहे. बँकेने खेड्यांमधून केलेल्या कर्जवाटपामागे त्यांची कल्पना ग्रामसुधारयोजनेची आहे. बँकेचा पैसा हा शेवटी लोकांचा पैसा आहे. राळेगणशिदीनं बँकेचं कर्ज परत फेडलं तरच बँक दुसऱ्या एखाद्या गावाला कर्जपुरवठा



¤

आता या नव्या शेगड्या आल्या.
स्त्रियांची मोठी सोय झाली...
इंधनाचा प्रश्न सुटला.

¤

करणार. स्वतःच्या नाकर्तेपणावर पांघरूण घालून वर आणि लोकांच्यात स्वतःची प्रतिमा उंचविण्यासाठी कर्जमाफीची घोषणा करणाऱ्या राजकारण्यांमुळे विकासात अडचणी निर्माण होतात हे सत्य नाकारून चालणार नाही.

बँक ऑफ महाराष्ट्रनं राळेगणशिदीबरोबर सहकार्य केलं त्यामुळंच तेथील आर्थिक विकासाला सुरुवात झाली हे निर्विवाद. बँकेबरोबर व्यवहार करण्याच्या अनुभवातून लोकांच्यात आर्थिक नियोजन करण्याबाबत आत्मविश्वास निर्माण झाला होता. सध्या राळेगणशिदीच्या नागरिकांच्या डोळ्यांसमोर एक भव्य योजना आहे. त्याबद्दल माहिती सांगताना अण्णा हजारे म्हणाले, 'ह्या वर्षी तीन सामुदायिक विहिरींच्या पाण्यावर एकूण सव्वाशे एकर नमुनेदार बागायत करायची योजना आम्ही आखली होती; पण दुष्काळापुढं हार खावी लागली. यंदा आमच्या भागाला दुष्काळाचा फार जोरदार फटका बसला आहे. खरीपाचं पीक संपूर्ण गेलं, त्यामुळं गावातील जनावरं जगविण्यासाठी जवळजवळ सत्तर हजार रुपये वैरणीसाठी खर्चावे लागले. विहिरींना बोअर मारून घेण्यासाठी साठ हजार रुपये खर्च आला. हा दुष्काळ नसता तर गावात आर्थिक सुधारणेच्या पहिल्या खुणा तुम्हाला ह्या भेटीतच दिसल्या असत्या.

१९७२ साली आमच्या गावात जेमतेम साठ एकर आठमाही बागायत होती. कुकडीचा कालवा सुरू झाला की आम्ही एक लिफ्ट–इरिगेशन करणार आहोत त्याची संपूर्ण योजना आज आमच्या जवळ तयार आहे. त्या योजनेखाली एकशेचाळीस सभासद येतात. जवळजवळ एक हजार एकराचं क्षेत्र बारमाही बागायतीचं होईल त्या वेळी शेतीचं नियोजनदेखील आम्ही पद्धतशीर करणार आहोत. मॅफकोबरोबर संपर्क साधून त्यांना कोणता माल कधी व किती हवा आहे हे अगोदरच पक्कं करून घेणार आणि त्याप्रमाणे भेंडी, फ्लॉवर, कोबी, गवार अशा प्रकारे तरकारीचं उत्पादन घेणार ! गावाच्या गरजेनुसार लसूणघास, वैरणीसाठी मका वगैरेचं क्षेत्र ठरवणार. क्रॉप प्लॅनिंग करून आम्ही सीड प्लॉटस् ठरवणार. त्यामुळे जरूर ते सर्व बियाणं गावातच तयार होईल. जास्तीचं उरलेलं बियाणं विकून नफा काढता येईल. फक्त तीस एकरांचा एक सलग सीड-प्लॉट दरवर्षी केला तरी भरपूर फायदा होईल. त्यासाठी सहकार, एकी ह्या गोष्टी मात्र आवश्यक आहेत. शेतीमध्ये आज अशी परिस्थिती आहे की, प्रत्येकानं फक्त माझं मी करणार म्हटलं तर कुणाचंच निव्वळ शेतीवर भागणार नाही. शेतीमधून फायदा काढायचा असेल तर आता सामुदायिक तत्त्वावर सहकार ह्याला इथून पुढं पर्याय नाही. सुदैवानं आमच्या शेतकऱ्यांच्या हे ध्यानात आलंय. त्यामुळं आमची योजना यशस्वी होणार ह्याबद्दल मला पूर्ण विश्वास आहे.

मला असं वाटतं की, एकदा गाव आर्थिकदृष्ट्या मजबूत झालं की इकडच्या तरुणानं फार तर आर्मीत भरती व्हावं, ऑफिसर व्हावं, इतर नोकरीच्या भानगडीतच पडू नये. शहराच्या झोपडपट्टीत, त्या गलिच्छ वातावरणात जगण्याऐवजी आमचा तरुण आपल्या स्वच्छ गावी राहून उत्तम शेती करण्यात समाधान मानेल असं मला वाटतं – निदान तशी अपेक्षा आहे. ते घडेलच हे मात्र खात्रीपूर्वक सांगता येत नाही. परवाची गोष्ट. 'चिंतन' कार्यक्रमाच्या वेळी मी विद्यार्थ्यांना सहज प्रश्न केला, आज तुम्ही शाळेत शिकत आहात तर तुमच्या डोळ्यांसमोर उद्दिष्ट काय आहे? प्रत्येक मुलाचं उत्तर एकच – डिग्रीचं शिक्षण घेणार ! मी विचारलं डिग्री घेऊन काय करणार? सर्व म्हणाले नोकरी करणार ! – नोकरी करून काय करणार ? पैसा मिळवणार ! – पैसा मिळवून काय करणार ? – मोठा होणार ! शेवटी मी विचारलं, मोठा होऊन काय करणार ?–

सगळी मुलं चुप ! कुणी उत्तर द्यायला तयार नाही. मग मी म्हणालो, ठीक आहे नोकरी करा, खूप पैसा मिळवा, मोठे व्हा– डॉक्टर, इंजिनिअर, शास्त्रज्ञ, वकील काहीही व्हा; पण मोठं होत असताना आपण ह्या देशाचं काही देणं लागतो, हा देश आपला आहे, एव्हढी जाणीव जरी मनात जिवंत ठेवलीत तरी खूप झालं ! ज्या आईच्या पोटी जन्माला आलो, ज्या आईनं मला दूध पाजलं, कष्टानं जोपासलं, ज्या बापानं घाम गाळून मोठं केलं, ज्या गावानं सामावून घेतलं– ते गाव ज्या देशात आहे त्या देशातील इतरांबरोबर फक्त सौजन्यानं वागलात तरी खूप झालं !'

¤

अण्णा हजारेंना पूर्ण जाणीव आहे की दहावीपर्यंत आपण मुलांच्या मनावर संस्कार घडवून त्यांना 'माणूस 'पणाचं महत्त्व पटवून दिलं असलं तरी उच्च शिक्षणासाठी राळेगणशिदीमधील मुलं–मुली जेव्हा शहरात येतील तेव्हा शहरी संस्कृतीचा स्पर्श त्यांना होणारच. आता शहरात रहाणाऱ्या आपण सर्वांना आपली शहरी संस्कृती उच्च दर्जाची, 'माणूस' जगवणारी, त्याचा विकास करणारी आहे असं वाटत असेल तर राळेगणशिदीच्या तरुण-तरुणींचं व्यक्तिमत्त्व आणखीच बहरून येईल –परिपूर्ण होईल – पण आपल्याला आपल्या शहरीसंस्कृतीबद्दल अशी खात्री देता येईल का ?

¤

– आम्ही राळेगणशिदीमधील नागरिकांचा निरोप घेतला आणि गाव सोडलं. गाडी वेशीबाहेर पडली. गावालगतच्या एका टेकाडावर राळेगणशिदीची तरुण मुलं–मुली वृक्षारोपणात दंग होती. कुणाच्या हाती फावडं, कुणाच्या डोक्यावर घमेलं, कुणी टिकाव धरलेला, कुणी रोप लावत होतं, कुणी रोपाला पाणी घालत होता. आमची गाडी दिसताच सर्वांनी जोरजोरात हात हलवून निरोप दिला. राळेगणशिदीमध्ये आम्ही मूर्तिमंत चैतन्य पाहिलं ! ...

□



१९७२ साली राळेगणशिदीत फक्त साठ एकर आठमाही बागायत होती. हजार एकर बारमाही बागायत करण्याची योजना गावाजवळ आजच तयार आहे.

## चित्रपट

# ' ओ गॉड !'

परवा गांधी पाहिला.

'गांधी'बद्दल ( म्हणजे सिनेमाबद्दल ) बोलताना आपला सुपरस्टार अमिताभ कुठं तरी म्हणाला— तसं गांधीतला अभिनय, दिग्दर्शन, तंत्र, छायाचित्र आपल्याकडचे लोकही उत्तम करू शकले असते. अॅटनबरोला क्रेडिट द्यायचंच झालं तर एकाच गोष्टीचं द्यावं लागेल. ते म्हणजे ज्या काळात लोक गांधी विसरायला लागले होते त्या काळात त्याने गांधी तयार केला !

गांधी कसा आहे, याबाबत लिहिण्याची जागा ही नव्हे; पण अमिताभच्या वाक्याचा अनुभव मात्र प्रत्यक्षपणे घेता आला.

साहेबी भाषेच्या प्रेमापोटी, आदरापोटीच मी ' गॅन्धी ' बघायला गेलो.

या चित्रपटगृहात इंग्रजी चित्रपटच चालत असल्याने, आमचो रेस्टॉरंटपडिक पोरं म्हणतात त्याप्रमाणे झगाळलेलं वातावरण.

आपल्याला आपल्याच मातृभाषेची लाज वाटावी इतकं झगाळलेलं.

दोन–तीन शाळांतली दीड-दोनशे पोरं होती.

तीही त्याच झग्याच्या झबल्यातली.

बाकी मग जीन्स, शॉर्टस्, सेंटस् लिपस्टिक, बॉयकट वगैरे कॉमन ड्रेपरी.

अशा एकूण वातावरणात, पोरांच्या कलकलाटात चित्रपट सुरू होतो...

आणि माझ्या मागच्या रोमध्ये दुसरा चित्रपट सुरू होतो.

त्यामध्ये असतो एक पप्पा, एक मम्मी व त्यांची दोन किडस्.

चित्रपटातल्या प्रत्येक प्रसंगावरची इंग्लिश कॉमेंट्री पाठच्या रोमधून कानावर आदळत असते.

'हू इज धिस ?' 'व्हेअरिज गांधी ?' 'व्हाट इज गोइंग ऑन ' असे प्रश्न.

त्यांची तशीच उत्सुकता संपवणारी त्रोटक उत्तरे.

त्या उत्तरात कुठेही इतिहासाची, स्वातंत्र्यलढ्याची जाण नव्हती.

शाळेच्या पुस्तकात वाचलं असेल तेवढंच सांगितलं जात होतं.

सर्व जगाला विस्मयचकित करणारा अहिंसक क्रांतीचा लढा, स्वातंत्र्यचळवळ, त्या सर्वांचा अग्रणी ' महात्मा ' याच्या आयुष्याचे काही पट उलगडत जाणारा हा चित्रपट.

पण संपूर्ण चित्रपटगृह थंड रक्ताचं !

कारण ते बघायला आले होते, बेन किंग्जले ' गांधी ' कसा काय करतो, बोलतो, चालतो.

अॅटनबरोने कित्येक कोटी रु. खर्चून उभं केलेलं वातावरण. फॉरिनची फोटोग्राफी इ. इ. आपल्या देशातल्या महात्म्यावर एक परदेशी सिनेमा बनवितो आणि आपल्याला तो तिकिट काढून पहावा लागतोय याची खंत कुणालाच नव्हती !

आमचा महात्मा आम्हालाच विकत होते, आम्ही जमल्यास त्याला 'ब्लॅक' मध्ये घ्यायला तयार होतो आणि आता 'टॅक्स फ्री ' म्हणून, गंमत म्हणून सुद्धा आम्ही तो बघू !

रुपय्या देड रुपय्या में बालकनीसे गांधी देखेंगे !

महात्मा बुद्ध, महात्मा फुले किंवा महात्मा गांधी काय, सर्वच महात्म्यांना आपण महात्मा करून मोकळे झालो, ज्या कारणासाठी त्यांना महात्मा केलं त्या गोष्टी आचरणात आणण्याचा प्रयत्न आम्ही कधी केला नाही.

कारण आम्हीही महात्मा झालो असतो आणि महात्म्याचं नंतर काय होतं ते आम्हाला चांगलं ठाऊक आहे.

आम्ही गांधींवर चित्रपट काढला नसेल; पण आमच्या कित्येक चित्रपटात पोलीसस्टेशनच्या, कोर्टाच्या सीनमध्ये, फोटोफ्रेममध्ये हसणारे बापू कित्येकदा स्वत: हसण्याचा विषय झालेत.

आमचा मनोजकुमार ऊर्फ ' भारत ' याच्या प्रत्येक सिनेमाच्या गाण्यात महेन्द्रकपूरच्या वीरशाली आवाजात ' बापू ' प्रकटतात.

मराठी चित्रपटात पांढरीस्वच्छ गांधी टोपी घालून माणूस आला की, 'तो लुच्चा, बदमाश, गुंड असलाच पाहिजे इतकी क्लियरकट इमेज आहे आमच्या मनात गांधी टोपीची.

अहिंसा, सत्य बोलणे वगैरे गोष्टी आम्ही म्युझियममध्ये ठेवल्यात.

म्हणजेच त्या सुरक्षित व भूषणावह ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून गणल्या जातील. सध्या अहिंसा म्हणजे पोलीस किंवा सैन्य आणून शांतता प्रस्थापित करायची !

हल्ली शांतता येते ती फक्त गोळीबाराच्या फैरी झाडल्यानंतर, बंदुकीच्या नळीत गस्त घालणारी मरणशांतता !

' सत्यमेव जयते ' हे आमचं ब्रीदवाक्यच आहे.

फक्त सत्याच्या व्याख्या आम्ही बदलल्यात.

श्रेष्ठी बोलतील ते सत्य-

श्रेष्ठी सांगतील ते सत्य.

श्रेष्ठी हेच महान सत्य.

आणि तेच ' सत्यमेव ' जयते !

आमच्या उद्याच्या पिढीत तर गांधींचं नाव म्हणजे विनोदाचा, हसण्याचा, शिव्या घालण्याचा विषय.

डिश्यॉंव, डिश्यॉंव सुपरस्टार फाइट खाऊन मरणपंथाला लागला तर सारा देश, सारी तरुण मनं हळहळली.

आता गुंडगिरीला, सेठ-साहुकारांना आपल्या मनगटाचं पाणी कोण पाजणार ?

है कोई माईका लाल ? अशी गर्जना कोण देणार ? 'हिलने की कोशिश की तो...' असा इशारा कोण देणार ?

सारी पोरं-पोरी चिंताक्रांत, त्यांचे आईबाप काळजीत, त्यांची लहान भावंडं सचित, सारा देश, पंतप्रधान सुद्धा काळजीत. हिंसेला हिंसेने उत्तर देणारा स्टार सुपरस्टार बनतो आणि अहिंसेचा महात्मा ' ती पहा ती पहा बापूजींची ..' असल्या ओळींचा ' बळी ' ठरतो !

धन्य ती महात्म्यांची भूमी.

' गांधी 'च्या सुरुवातीसच ' गांधीवध ' दाखवण्यात आलाय !

नथूराम अगदी जवळून गोळ्या झाडतो.

आज नथूरामची जागा आम्ही सर्वांनी घेतलीय.

प्रत्येक दिवसाला गांधींची हत्या करतोय आम्ही...

स्वत:च्या रास्त मागण्यांसाठी रस्त्यावर आलेली जनता गोळीबाराच्या फैरीत संपविली

जाते आणि हिंसेचे तत्त्वज्ञान आचरणाऱ्या डाकूंच्या शरणागतीचे शासकीय सोहळे संपन्न होतात !

सत्ता हेच अंतिम सत्य आज इथे...

मातृभाषा लाजेची गोष्ट ठरते.

विदेशी कपडे, वस्तू, भाषा प्रतिष्ठेची बनते.

आमच्या देशात आमच्याच प्रश्नासाठी लढून महात्मा पावलेल्या माणसाची 'विदेशी फिल्म ' आमच्या देशातच विकली जाते !

आमची पोरं विदेशी भाषेतूनच 'गांधी' अंडरस्टँड करण्याचा प्रयत्न करतात, फिल्म म्हणून बघतात !

कॉलेजमध्ये असताना एकदा रेल्वेस्टेशनवर एका माणसानं म्हटलेलं आठवतं—

'मजबूरीका नाम महात्मा गांधी !'

आज या एकूण वातावरणात गांधींचा होणारा दररोजचा खून आणि कॉन्व्हेंटी संस्कृतीत वाढणारी पुढची पिढी पाहिली की, चित्रपटात गोळी झाडल्यावर 'हे राम' ऐवजी 'ओ गॉड' असं गांधी म्हणतात ते सार्थच वाटतं !

— संजय पवार

# दानाचे आधुनिक प्रयोग

### प्र. ग. बापट

१९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यापासून, देशातील दरिद्रीनारायणाची सेवा करण्याचे व्रत शासनाने घेतले. त्यामुळे शासन–नियंत्रित, शासनाच्या अनुदानावर जगणाऱ्या सर्वच संस्था व संस्थांचे सभासद यांनीदेखील या व्रताचा स्वीकार केला आहे.

शिक्षणखात्यातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने प्रथम स्वत: एका गरीब विद्यार्थ्याला गणवेश शिवून दिला. ताबडतोब अनेक शिक्षकांनी त्याचे अनुकरण केले. त्यामुळे दोनएक हजार गरीब विद्यार्थ्यांना गणवेश मिळाले. गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे म्हणून एका महाविद्यालयातील प्रत्येक व्याख्याता एका गरीब विद्यार्थ्याचा शैक्षणिक सत्रकाळातील जेवणाचा खर्च करी. काही गरीब विद्यार्थ्यांचे परीक्षाशुल्क काही शिक्षणसंस्था भरतात. पुस्तकपेढीतून तीन–चार पाठ्यपुस्तके वर्षभर वाचण्यास मिळतात. शासन त्यांचे शिक्षणशुल्क भरते. काही अधिकोष काही खेडी दत्तक घेतात. मिशनसंस्था खेड्यातील गरिबांना फुकट औषधे देतात. गरीब, निराधार भारतीय नागरिकांसाठी व भावी नागरिकांसाठी अशा विविध योजना विविध स्तरांवर राबविल्या जात आहेत. आज भारतात दानाचे असे अनेक प्रयोग वर्षभर चालू असतात. वृत्तपत्रेदेखील यांची प्रतिवृत्ते फोटोसहित प्रसिद्ध करीत असतात.

इंग्रजांच्या शासनकाळात हे होत नव्हते. इंग्रजपूर्व स्वतंत्र भारतात राज्यकर्त्यांमध्ये जनसामान्यांचे हिताची दृष्टि नव्हती, त्यामुळे हे होत नव्हते. स्वातंत्र्योत्तर काळातील या समाजसेवेच्या मागे एक आधुनिक विचार आहे असे सर्वसामान्यपणे मानले जाते.

लोकशाही व्यवस्थेत, लोक सार्वभौम असतात. ही सार्वभौम सत्ता जागृत, शिक्षित, स्वयंपूर्ण नसेल, तर शासनाने आपल्या सार्वभौम सत्तेला जागृत, शिक्षित, स्वयंपूर्ण केले पाहिजे. भारतीय लोकशाहीचे ध्येय लोककल्याणकारी राज्य हे आहे. भारतीय बहुसंख्यसमाज अज्ञानी व दरिद्री आहे. त्यांचे अज्ञान व दारिद्र्य दूर करण्यासाठी शासनाने आपल्या उत्पन्नातील काही भाग खर्च करणे हे त्याचे कर्तव्य आहे. आपला देश अफाट, त्यामुळे अज्ञान व दारिद्र्य अफाट. शासनाचे स्रोत त्यामानाने तोकडे. त्यामुळे या देशातील 'आहे रे' समाजाने 'नाही रे' समाजासाठी काही केले पाहिजे. हा विचार आज दिसत असलेल्या नव्या समाजसेवेच्या विविध कार्यक्रमांचा आधार आहे.

प्रगल्भ, जागृत नागरिकत्व नागरिकांत निर्माण व्हावे, निकोप लोकशाहीची निर्मिती भारतात व्हावी, त्यासाठी प्रथम अज्ञान व दारिद्र्य दूर व्हावे, हे या समाजसेवेच्या नानाविध प्रयत्नांचे अधिष्ठान आहे, हा समज खरा आहे का ? हा समज नसून गैरसमज नाही ना ? जुन्याच प्रथा व रूढींना नवीन वेश व नवीन विचारांचा तकलादू आधार देण्याचा हा प्रयत्न नाही ना ?

आजही भारतात काही जुन्या प्रथा प्रचलित आहेत, तर काही अवशेषरूपाने जिवंत आहेत. सामान्यत: अवस मागायचा अधिकार विशिष्ट जातीचा मानला जातो. त्या दिवशी त्यांना खायचे तेल, ज्वारीचे पीठ, मीठ, मिरची व पैसा दिला जातो. ग्रामीण भागात अमावास्येला एका जातीतील कोणा एकाला तरी, घरच्या अंगणात पोटभर जेवायला दिले जात असे. ग्रामजोशी किंवा भिक्षुक घरात येऊ शकतो. पंचांग सांगितल्यावर गृहिणी त्यास शिधा व दक्षिणा देते आणि वर वाकून नमस्कार करते. गृहस्थाश्रमी व्यक्ती माध्यान्हकाळी जेवणापूर्वी पात्र घेऊन घराबाहेर येई. कुत्रा, गाय या प्राण्यांना पात्र दिल्यावर, अतिथीची वाट पाही. ब्रह्मचारी, विद्यार्थी व संन्यासी यांची जेवणाची सोय होतच असे. इंग्रजी राज्यापूर्वी संपूर्ण खेड्याची जमीन जरी सावकाराच्या वहीखात्यात गहाण असली तरी क्वचितच शेतकरी भूमिहीन होई. थोडक्यात मध्ययुगात भारतात प्रथा अशा धोरणाने निश्चित झाल्या होत्या की जो ज्या अवस्थेत जन्म घेई किंवा ज्या अवस्थेचा स्वीकार करी, तेथे त्याची जगण्याची सोय व्हावी. मदतीचा हात फक्त जगण्यापुरता होता. जगणाऱ्याला उभे राहण्यासाठी, उभे असलेल्याला चालण्यासाठी, चालणाऱ्याला पळण्यासाठी मदतीचा हात नव्हता. ह्या प्रथांमागे 'आहे रे' समाजाचे हितसंबंध गुंतले होते. पण समाजजीवनातील ह्या प्रथा नकळत जन्माला आल्या नव्हत्या.

### तडजोडवादी उत्तर

या प्रथा बदलत्या भारतीय समाजाच्या स्थितीशी निगडित होत्या. इ. स. पूर्वीच्या आणि आरंभीच्या काही शतकांत ब्राह्मणप्रधान जातिनिष्ठ समाज अनेक कारणांनी विस्कळित होऊ लागला. बौद्ध, जैन धर्मांचा विकास व प्रभाव आणि ग्रीक, शक, हूण इ. परकीयांच्या स्वाऱ्या ही काही प्रमुख कारणे होत[१]. यामुळे विस्कळित झालेल्या हिंदूसमाजाला एकत्र आणणे आवश्यक झाले. सर्व हिंदूधर्मीयांना, त्यांच्या क्षमतेनुसार श्रुतिस्मृतिग्रंथांचे अध्ययन-अध्यापन मोकळे करणे व गुणवत्तेचा बळी न देता त्यांच्या अध्ययनाची सोय करणे, हे या समस्येचे खरे उत्तर होते, असे आज जाणवते; परंतु त्या वेळी हिंदूसमाजाने वरील समस्येचे जे उत्तर शोधले, ते तडजोडवादी स्वरूपाचे होते.

श्रुति–स्मृतींचा अधिकार स्वत:कडे ठेवायचा पण त्याच वेळी पुराणोक्तधर्माला कमी प्रतीचा धर्म म्हणून मान्यता द्यावयाची या प्रवृत्तीतून पुराणग्रंथांचा उदय झाला.

प्रथम पुराणांनी सांगितलेला धर्म वेदप्रणीत धर्मापेक्षा कमी प्रतीचा मानला जाई. नंतर पुराणे, धर्म हा वैदिक, तांत्रिक आणि मिश्र असा तीन प्रकारचा असल्याचे म्हणू लागली.

कालांतराने वैदिक ग्रंथांत सांगितलेले विधी मागे पडून पुराणोक्त विधी प्रचारात आले. नंतर एखाद्याने पुष्कळ शास्त्रांचे आणि अनेक वेदांचे अध्ययन केले असले; परंतु जर त्याने पुराणांचे अध्ययन केले नसले, तर त्या मनुष्यास विद्वत्ता प्राप्त होत नाही,[२] असे पुराणे सांगू लागली.

सारासार विचार करता असे दिसते की, पुराणांची रचना व नंतर त्यामध्ये घुसलेले श्लोक, हे लोकमताला वळण लावणे, त्याची गुणवत्ता वाढविणे याऐवजी लोकमतानुसारी आहेत.[३]

मोठ्या फलप्राप्तीसाठी काही नैसर्गिक शक्तींची उपजत देणगी व अत्यंत श्रम आवश्यक असतात, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. प्राचीन ऋषी, मुनी व आधुनिक शास्त्रज्ञांची मोठी फलसिद्धी यावरच निश्चित होते. मोक्षप्राप्ती, आध्यात्मिक ज्ञान काय किंवा भौतिकशास्त्रामधील उच्च संशोधन काय, हे लोकमतानुसार निश्चित होत नाही. त्यासाठी नैसर्गिक उपजत गुणवत्ता व कठोर श्रम आवश्यक असतातच; पण प्राप्त होणारे मोठे फल, त्याच्या नियमानुसार ठरते हे मोठे फल संपूर्ण समाजाला प्राप्त व्हावे असे वाटत असेल तर संपूर्ण समाजाने त्यासाठी आवश्यक ते नियम पाळलेच पाहिजेत. यात समझोता होऊ शकत नाही. त्या मोठ्या फलाच्या प्राप्तीसाठी सामान्यजनांना नियमानुसार गुणवत्ता वाढविणे व कठोर श्रमास तयार करणे हाच एकमेव मार्ग आहे. त्यास अन्य पर्याय नाही. पुराणोक्त धर्माच्या प्रयोगाने हेच सिद्ध केले आहे; पण आपण त्यापासून काही शिकलो नाही असे वाटू लागते.

मलईयुक्त दही अधिकाधिकांना मिळावे असे वाटत असेल, तर मलईयुक्त दह्याच्या निर्मितीत अधिकाधिकांना प्रत्यक्ष सहभागी करून घेणे हाच एकमेव मार्ग आहे. मलईयुक्त दह्यात पाणी ओतून, त्याचे प्रमाण वाढवून ते अधिकाधिकांना वाटणे, या मार्गाचा पुराणांनी अवलंब केला.

अल्पश्रमात अतिशय मोठे फल कसे प्राप्त करून घेता येईल, हे सांगणे हाच पुराणांचा सर्वांत अधिक महत्त्वाचा हेतू व हेच पुराणांचे वैशिष्ट्य होय.[४]

कमी श्रमात मोठे फल व दानाचे महत्त्व, यामुळे कमी श्रमांत मोठ्या फलाचे आश्वासन देणाऱ्याचे व दान देणाऱ्याचे काहीच नुकसान होत नाही. (एक तर आश्वासन देणारा मोठेश्रम करतो व दान देणारा दान घेत नाही). नुकसान होते ते कमी श्रमात मोठे फळ मिळावे असे वाटणाऱ्याचे व दान स्वीकारण्यास आपण पात्र आहोत असे वाटणाऱ्याचे. लोकशाहीत बहुजनसमाज अज्ञानी व दरिद्री असताना, जर कमी श्रमात मोठे फळ मिळण्यास व दान स्वीकारण्यास आपण पात्र आहोत, अशी जर त्यांची मानसिक धारणा झाली, तर ते निरोगी लोकशाहीसाठी व जागृत नागरिकत्वाच्या निर्मितीस पोषक तर नाहीच, उलट घातक आहे.

शिक्षकाने दिलेला गणवेश विद्यार्थी घालतो, शासन शुल्क भरते म्हणून तो शिकतो, पुस्तकपेढी पुस्तके देते म्हणून तो वाचतो. अनुदानप्राप्त वसतिगृहात राहतो व जेवतो. पात्रता काय ? तर गरिबी पुन्हा स्वाभिमान नष्ट होऊ नये म्हणून तात्त्विक आधार काय तर हा त्यांचा अधिकार आहे व हजारो वर्षे त्यांच्या पूर्वजांची जी पिळवणूक झाली, त्याचे उतराई होण्यासाठी 'आहे रे' समाज 'नाही रे' समाजासाठी हे करीत आहे. थोडक्यात दारिद्र्यासाठी तत्त्वज्ञान आपण तयार करीत आहोत. पददलित राहण्याने जर स्वाभिमान नष्ट होणार असेल; दारिद्र्य अज्ञान हे जर शाप नसून वर ठरणार असतील, कठोर श्रम व नैसर्गिक गुणवत्ता या पात्रतेशिवाय जर अन्य पात्रता मोठे फल प्राप्त करून देत असतील तर, 'नाही रे' समाजाला 'आहे रे' समाज बनवण्यातील आनंद मिळावा असे का वाटावे ?

## पुराणकालीन शिकवण

मध्ययुगात दरिद्री व अज्ञानी समाजाला दरिद्रीनारायणाच्या पदवीपर्यंत पोहचवून, कर्तृत्व व गुणवत्तेच्या जोरावर नराला नारायण बनण्याचे आनंदापासून आपण वंचित ठेवले. प्रत्येक व्रत, सण व प्रायश्चित्ताच्या निमित्ताने पात्रतेच्या निकषाचा विचार न करता, ब्राह्मणांना जन्मसिद्धतेच्या पात्रतेवर भरपूर दान स्वीकारण्याच्या पुराणोक्त आदेशाने, बहुसंख्य ब्राह्मणांना ज्ञानसिद्ध पात्रता मिळवण्यापासून वंचित ठेवले; पण त्या वेळी ब्राह्मण हा राज्यकर्ता नव्हता.

कमी श्रमात मोठे फळ म्हणजे मध्ययुगात मोक्ष होते. मरण पावलेला आपण मोक्षालाच गेलो हे सांगायला परत येत नव्हता व नाही; पण कमी श्रमात पदवी मिळालेला माणूस ती पदवी, भौतिक स्पर्धेच्या युगात त्याच्या भौतिक समृद्धीसाठी निरुपयोगी आहे, हे सांगत आहे. आज स्वातंत्र्य, समता व बंधुता यावर आधारलेला लोकशाही राष्ट्रवाद हे जरी आपले ध्येय असले तरी आपण अंमलात आणत असलेले धोरण कमी श्रमात मोठे फल प्राप्त होते ही पुराणकालाचीच शिकवण भौतिक जीवनात बहुजनसमाजाला देत आहे. आजचे समाजसेवेचे कार्यक्रम आपल्यावर संस्काराने बिंबलेल्या पुराणोक्त मार्गाचेच आधुनिक प्रतिध्वनी आहेत. भरपूर अवस वाढणारी गृहिणी जाऊन त्या जागी ग्रामीण भागात वर्षातून दहा दिवस श्रमशिबिरात कार्य करणारी तरुणी आहे. तपशिलात बदल झाला; पण दोन्हीमागील तात्त्विक भूमिका एकच आहे. दान देणाऱ्याचे महत्त्व आहे, त्याच्या मानसशास्त्राचा विचार आहे.

पण अल्प श्रमात मोठे यश मिळू शकत नाही. आंतरिक गुणवत्ता वाढविल्याशिवाय अतिश्रमाला मोठे यश येत नाही. दान स्वीकारणे गौण, दान देण्याची क्षमता स्वतःत निर्माण करणे श्रेष्ठ. स्वतःचा उद्धार स्वतःच करावा लागतो. शासन, 'आहे रे' समाज यांचे दानात हितसंबंध गुंतले आहेत. दान घेणारे अस्तित्वात असणे, ही दान देणाऱ्याचे दानाची अट असते त्यामुळे खऱ्या अर्थाने ते दान 'नाही रे' समाजाच्या उन्नतीला कधीच मदत करू शकणार नाही. या तात्त्विक विचारांचा या समाजसेवा–कार्यक्रमात अभाव आहे. त्यामुळे आजही बहुजनसमाज या तात्त्विक विचारापासून दूरच आहे. उलट दान स्वीकारणे हा आमचा हक्क, या मध्ययुगीन ब्राह्मणसंस्कृतीचेच त्यास तात्त्विक शिक्षण मिळत आहे.

घराची स्वच्छता व आरोग्य कसे ठेवावे, हे सांगण्यासाठी आलेल्या डॉक्टरणीला, आज खेड्यांतील स्त्रिया 'औषधे का आणली नाहीत' असे विचारीत आहेत. शाळेच्या आवारात झाडे लावणाऱ्यांना, शिक्षक 'वर्षभर पाण्याची काय सोय करणार ?' अशी पृच्छा करीत आहेत. घरासमोर झाडे लावणाऱ्यांना गृहिणी 'आंब्याचे कलम असेल तर लावा, कडूनिंबाचे नको' असे सांगत आहेत. खेड्यातील पाच-दहा घरांसमोरून जाणारी गल्ली झाडून स्वच्छ करणाऱ्यांना 'आज तुम्ही स्वच्छता केलीत, उद्या कोण येणार ?' अशी विचारणा त्यापैकी एका घराच्या दारातून हसत हसत होत आहे. □

---


**आधार :**

(१) म. म. डॉ. काणे, अनु. य. आ. भट: **धर्मशास्त्राचा इतिहास, उत्तरार्ध** ( महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृतिमंडळ १९७० ) पृ. ३७२

(२) Ibid पृ. ३७५

(३) Ibid पृ. ३७७–३७८

(४) Ibid पृ. ३७६




# पोलंडचा पुरुषोत्तम
# लेक वालेसा

वालेसाच्या पुढारीपणाची पहिली चुणुक दिसली ती लेनिन बोट-कारखान्यातील कामगारांनी पोलिसांच्या अत्याचाराच्या निषेधार्थ मुख्य पोलिसकार्यालय व्यापलं तेव्हा. पोलीश वारंवार बोट कारखान्यात येऊन कामगारांना दटावण्या देतात अन् मारहाण करतात ही कामगारांची त्यांच्याविरुद्ध तक्रार होती. गेली अनेक वर्षं हा प्रकार चालू होता. वरिष्ठ अधिकाऱ्यांना पुनःपुन्हा सांगूनसुद्धा उपयोग झाला नाही. ते अधिकारी पोलिसांच्या या आगंतुक आचरटपणाकडे कानाडोळा करीत. याचाच अर्थ पोलिसांना आतून त्यांची फूस असावी, एवढंच नव्हे तर ते अधिकाऱ्यांच्या निमंत्रणावरूनच कारखान्याला भेटी देऊन तेथे दहशतीचं वातावरण पसरवीत असावेत असंच कामगारांना वाटू लागलं. त्यातच एक प्रसंग असा घडला की, कामगारांची त्यावरून खात्रीच पटली.

### क्षणात चमत्कार घडला !

मधल्या सुट्टीत गडबडीनं जेवणं आटोपून दहा–बारा कामगार कॅन्टिनमध्येच टेबलावर पत्ते खेळत बसले होते. इतर कामगारांची जेवणं चालू होती. सुट्टी संपायला अजून वीसएक मिनिटांचा अवकाश होता. अचानक पोलिसांचा एक ताफा त्या कॅन्टिनमध्ये शिरला. त्यांना पाहताच जेवणं आटोपलेले बरेचसे कामगार हात धुऊन बाहेर पडले. ज्यांची जेवणं संपायची होती ते खालच्या मानेनं घाईगर्दीनं जेवणं आटोपू लागले. पत्ते खेळण्यात दंग असलेल्या कामगारांचं मात्र पोलिसांच्या आगमनाकडे लक्षच गेलं नाही. ते तसेच खेळत राहिले. पबलांच्या गर्दीतून वाट काढीत पोलिसांचा तो ताफा त्या कामगारांच्या टेबलाजवळ गेला; पण त्या लोकांचं त्यांच्याकडे लक्षच गेलं नाही. प्रमुख पोलिससार्जंटनं आपला दंडुका टेबलावर आपटून मोठ्या आवाजात प्रश्न केला, 'तुम्ही कारखान्यात कामं करता की पत्ते खेळता ?'

'अजून दहा मिनिटांचा अवधी आहे मधली सुट्टी संपायला !' त्यातल्या एका कामगारानं हातातलं घड्याळ त्या सार्जंटला दाखवून उत्तर दिलं.

'मला तुझं घड्याळ दाखवू नकोस. माझ्याही हातात घड्याळ आहे.' तो सार्जंट आवाज चढवून म्हणाला, 'पण ही जागा पत्ते खेळण्यासाठी नाही. त्यासाठी वेगळा हॉल आहे !'

'हे बघा सार्जंट, जेवणं आटोपून त्या हॉलपर्यंत जायचं यातच पंधरा मिनिटं जातात. म्हणून आम्ही कंटाळा आला की इथंच खेळतो. यात काही फारसं बिघडलं असं वाटत नाही आम्हाला.' त्यातल्या दुसऱ्यानं उत्तर दिलं.

पत्ते खेळणारा कामगारांचा हा गट लेनिन बोटकारखान्यातल्या कामगारांचं पुढारीपण करीत असे. त्यांचं साऱ्या कामगारांवर तर वर्चस्व होतंच; पण अधिकारीही त्यांना बिचकून असत. त्यांचं वाढत चाललेलं प्रस्थ कमी करण्यासाठी अधिकारी कारणच शोधत होते. त्यांनी त्यासाठीच पोलिसांना बोलावून घेतलं होतं.

'तुम्ही कारखान्याचे कोणतेच नियम पाळत नाही असं दिसतंय.' तो सार्जंट त्यांना म्हणाला.

'अशी कोणी तक्रार केली आहे का तुमच्याकडे ?' त्यातल्या एकानं विचारलं.

'हो. तुमच्या सहकाऱ्यांनीच आमच्याकडे अशा तक्रारी केल्या आहेत !' त्या सार्जंटनं सांगितलं.

'आम्हाला त्यांची नावं सांगाल का ?'

'म्हणजे तुम्ही जाऊन त्यांच्यावर दादागिरी करणार ! ते काही नाही. तुम्ही सारे आमच्याबरोबर पोलिसचौकीवर चला. त्याशिवाय तुम्हाला समज येणार नाही !' असं म्हणून त्या सार्जंटनं खूण करताच सारे पोलीस त्या कामगारांना धरायला पुढं गेले. कामगारांनी त्यांना प्रतिकार केला. वादावादी सुरू झाली अन् प्रकरण मुद्द्यावरून गुद्द्यावर आलं. पोलिसांनी लाठीहल्ला करून कामगारांना हातकड्या घातल्या अन् जबरदस्तीनं पोलीसचौकीकडे नेलं. हा सारा प्रकार इतर कामगार पहातच होते. त्यापैकी काहीजणांनी बोटकारखान्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कानांवर हा प्रकार घातला; पण त्यांनी त्याकडे साफ दुर्लक्ष केलं.

कॅन्टिनमध्ये पत्ते खेळणं म्हणजे कारखान्याचे नियम मोडणं नव्हे. त्यातून वरिष्ठांनी सांगितलं असतं तरी चालण्याजोगं होतं; पण एवढ्या साध्या गोष्टीसाठी कामगारांना पकडून न्यावं हे योग्य

**वालेसा बोलला; पण नुसतं बोलून थांबला नाही तर त्यानं तसं करून दाखवलं. त्यानं हमी घेतल्याप्रमाणं अटक केलेल्या कामगारांना सोडवूनही आणलं. तो जेव्हा पोलीसप्रमुखांशी चर्चेसाठी गेला तेव्हा ते प्रथम त्याला भेटायलाही तयार नव्हते. त्याचं नावसुद्धा त्यांनी पूर्वी कधी ऐकलं नव्हतं. चर्चा करून वालेसा सुटला तो कामगारांच्या सुटकेची बातमी घेऊनच ! असं कधीच घडलं नव्हतं !**

## लेखांक चौथा

**लेखक : श्रीकांत मुंदरगी**

झालं नाही असं कामगारांच्या प्रतिनिधींनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगितलं. वरिष्ठांनी ताबडतोब या प्रकरणात लक्ष घालून कामगारांना सोडवून आणायला हवं असा इशाराही त्यांनी दिला; पण वरिष्ठांनी कानावर हात ठेवले ! ते पाहताच सारे कामगार खवळले आणि त्यांनी मुख्य पोलीसकार्यालयाकडे मोर्चा वळविला. त्या हजारो कामगारांनी गडॅन्स्कच्या प्रमुख पोलीसकचेरीसमोर निदर्शनं केली. त्यातील अनेकजणांनी पोलीसकचेरीत जबरदस्तीनं प्रवेश करून पहिला मजला गाठला !

कामगारांच्या काही नेत्यांनी पोलीसप्रमुखांना, अटक करून नेलेल्या कामगारांना सोडून देण्याची विनंती केली. पोलीसप्रमुख काही झालं तरी या गोष्टीला कबूल होईनात. इकडे वातावरण तर क्षणोक्षणी तंग होत चाललं. पोलीसकचेरीबाहेर जवळजवळ २० हजार कामगारांचा समुदाय जमला होता. अटक केलेल्या कामगारांना पोलीसकचेरीजवळ असलेल्या तुरुंगात डांबण्यात आलं होतं. ही बातमी वरून खाली आलेल्या काही कामगारांनी आणली. पोलीसप्रमुख अटक करून नेलेल्यांना सोडण्यास तयार नाहीत हे ऐकताच समुदाय खवळून गेला. तुरुंगकोठड्यांवर हल्ला करून साथीदारांना सोडवून आणायचंच असं ठरवून कामगार त्या दिशेला वळले. प्रकरण फारच चिघळत चाललं आहे हे पाहून काही विचारी कामगारनेत्यांनी समुदायाची समजूत घालण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा काहीही उपयोग होऊ शकला नाही. समुदायानं आरडाओरडा करत कोठड्यांच्या दिशेनं वाटचाल सुरू केली. आता काय अनर्थ ओढवणार याचा कुणालाच अंदाज येईना !

तुरुंगाच्या प्रचंड दाराशी उभे असलेले सशस्त्र पहारेकरी चाल करून येणाऱ्या खवळलेल्या त्या प्रचंड समुदायाला पाहताच भेदरून गेले. लोकसमुदायाची ही प्रचंड लाट आपल्याला गिळून टाकणार या भयानं ते धावत सुटले. तुरुंगाच्या दाराशी काही कामगार येऊन पोहोचले. त्या दाराशी आडवे हात करून त्यांचाच एक सहकारी निर्भयपणे उभा होता. त्याच्या चेहऱ्यावर भीतीचा लवलेशदेखील दिसत नव्हता. तो दरवाजाशीच उभा असल्यानं त्या कामगारांना पुढं जाता येईना.

'या दरवाजाला तुम्ही हात लावू शकणार नाही. हा दरवाजा फोडायचाच असेल तर मला मारून तुम्हाला पुढं जावं लागेल !'

तो धारदार आवाज ऐकताच सारेजण तिथंच थबकले, 'मित्रांनो, हा दरवाजा फोडून तुम्हा सर्वांनाच स्वतःला आत डांबून घ्यायची इच्छा झाली आहे का? ज्यांना अटक करून नेलं आहे ते दोन दिवसांत सुटल्याखेरीज राहणार नाहीत याची मी तुम्हाला हमी देतो ! जे काम केवळ सशाचा बळी देऊन होऊ शकेल त्यासाठी हत्ती बळी द्यायला कशाला निघालात ? ......' त्यानं समुदायाची अशी काही समजूत घातली की, क्षणापूर्वी रौद्रस्वरूप धारण केलेला तो समुदाय एकदम शांत झाला ! जादूची कांडी फिरावी तसा चमत्कार घडून आला. होणारा अनर्थ टळला याचं विचारी नेत्यांना समाधान वाटलं. एक नवं, दमदार अन् तेजस्वी नेतृत्व कामगारांना लाभलं होतं......लेक वालेसा !

वालेसा बोलला. नुसता बोलून तो थांबला नाही तर त्यानं ते खरंही करून दाखविलं. त्यानं हमी घेतल्याप्रमाणं अटक करून नेलेल्या कामगारांना सोडवूनही आणलं. तो जेव्हा पोलिसप्रमुखांशी चर्चेसाठी गेला तेव्हा ते प्रथम त्याला भेटायलादेखील तयार झाले नाहीत. 'हा कोण वालेसा, याचं नावदेखील आपण पूर्वी कधी ऐकलं नाही अन् हा कसला आपल्याशी वाटाघाटी करणार ?' असं ते म्हणाले; पण त्यांच्या सहाय्यक अधिकाऱ्यांनी, वीस हजार खवळलेल्या कामगारांना शांत करून अनर्थ टाळणारा मनुष्य तो हाच ! असं सांगताच पोलिसप्रमुख त्याच्याशी चर्चा करण्यास तयार झाले. इतर कामगारनेत्यांनी वालेसा आपल्या लोकांना सोडवून आणू शकणार नाही असं छातीठोकपणे सांगितलं. अटक झालेले कामगार चार–दोन दिवसांत सुटून परत आलेत असं आजपर्यंत पूर्वी कधीच घडलं नव्हतं. त्यामुळं कामगारांनाही वालेसा फार काही करू शकेल असं वाटत नव्हतं; पण चर्चा करून वालेसा परतला तो त्या कामगारांच्या सुटकेची बातमी घेऊनच ! सर्व कामगारांनी त्याला अक्षरशः डोक्यावर घेतलं. जुन्या नेत्यांना आपली संधी संपुष्टात आल्याचं या घटनेमुळं लक्षात आलं. चार–चार दिवस वाटाघाटी करूनही आपण जे निष्पन्न करू शकत नव्हतो ते एक तासाच्या वाटाघाटीत वालेसा कसं काय साध्य

करू शकला हा प्रश्न मात्र त्या नेत्यांना पुढं कित्येक दिवस सतावत राहिला.

वादळ तात्पुरतं का होईना शमलं होतं. कामगार शांत झाले होते; पण मूळ प्रश्न मात्र सुटले नव्हते. कामगारांचं राहणीमान खालावतच चाललं होतं. अन्नपदार्थांच्या किमती गोमुल्का सरकारनं अचानक वाढविल्या अन् पुन्हा दंग्याधोप्याला सुरुवात झाली. एक दिवस हजारो कामगार निदर्शनं करण्यासाठी रस्त्यावर आले. निदर्शनं शांततेनं पार पाडायची असंच त्यांनी ठरविलं होतं. लेनिन बोटकारखान्यातले कामगार सरकारविरोधी निदर्शनासाठी बाहेर पडलेत असं कळताच बाल्टिकच्या किनाऱ्यावर असलेल्या अनेक खाणींतून हजारो कामगार बाहेर पडले. पाहता पाहता इतर कारखानेही ओस पडले आणि सर्वजण लेनिन बोटकारखान्याच्या कामगारांना साथ देण्यासाठी त्यांना येऊन मिळाले. ही बातमी राजधानीत एअरकंडिशन्ड ऑफिसात सहकाऱ्यांशी चर्चा करण्यात गुंतलेल्या वॅदिस्लाव गोमुल्का यांच्या कानी घालण्यात आली. गोमुल्कासाहेब अगोदरच त्रासलेल्या मनस्थितीत होते. क्रेमलिनहून 'कामगारांना आवरा' असा कडक इशारा आला होता. त्यासंबंधीच चर्चा चालू होती. त्यात ही बातमी येताच त्यांची मनस्थिती आणखीनच बिघडली.

'पोलिसांना लाठीहल्ला आणि अश्रुधूर यांच्या सहाय्यानं जमाव पांगवून टाकण्याचा आदेश द्या. निदर्शनांचा जोर वाढवू देऊ नका!' गोमुल्कासाहेबांनी फोनवरूनच आदेश दिला.

तीनएक तासांनी परत बातमी आली, ती पूर्वीदेक्षाही वाईट होती. कामगारांची संख्या फारच वाढली होती. पोलिसबळ त्या मानानं अपुरं पडलं होतं. लाठीहल्ला आणि अश्रुधूर या गोष्टींना कामगार दाद देत नव्हते. अनावर होत चाललेला जमाव काय अनर्थ घडवून आणेल हे सांगता येत नव्हतं. परिस्थिती पोलिसांच्या आटोक्याबाहेर जात चालली होती.

## मृत्यूनं थैमान घातलं

गोमुल्कासाहेबांनी लष्कराला पाचारण केलं. लष्करप्रमुखांना काहीही करून परिस्थिती आटोक्यात आणण्याची आज्ञा देण्यात आली. सैनिकांनी सर्वसाधारण प्रयत्नांनी जमाव काबूत येत नाही असं पाहताच सरळ गोळ्यांच्या फैरी झाडण्यास सुरुवात केली. हवेत झाडण्यात आलेल्या गोळ्यांनीही म्हणावी तशी दहशत निर्माण होत नाही असं दिसताच बंदुकांच्या नळ्या जमावावर रोखल्या गेल्या. फैरीवर फैरी झडल्या. एक, दोन, दहा...वीस . पन्नास...शंभर किती कामगार या गोळ्यांना बळी पडले हे त्या वेळी कोणालाही सांगता आलं नसतं. मृत्यूनं प्रचंड थैमान घातलं......आपल्या सहकाऱ्यांचं रक्त पाहून कामगार हादरले...धावाधाव सुरू झाली... लोक सैरावैरा पळू लागले...रस्ते ओस पडू लागले...जमाव पांगला ...निदर्शनं संपुष्टात आली ती १४५ कामगारांचा बळी घेऊनच!

या लोकांना वाचविणं आपल्याला का शक्य झालं नसेल या विचारानं वालेसा हैराण होऊन गेला. सारा दिवस तो अखंड धूम्रपान करत राहिला. जणू त्या बाहेर पडणाऱ्या धुरावाटे हृदयात कोंडलेल्या भावनांनाच तो वाट करून देत होता. पाणावलेल्या नजरेनं दानुताकडं पहात तो म्हणाला, 'या कामगारांना चांगला मार्ग मी दाखवू शकलो नाही हाच याचा अर्थ. इतक्या सहकाऱ्यांचं रक्त सांडलं त्याला मीदेखील काही अंशी जबाबदार आहेच. याचाच अर्थ असा की, मीच अपुरा पडतोय!' दानुतानं कितीही समजूत घातली तरी वालेसाला ते पटलं नाही. तो सारा दोष आपल्यावरच घेत राहिला. जबाबदारीच्या जाणिवेतून निर्माण झालेली भावनाशीलता त्याला अस्वस्थ करून टाकत होती. फार थोड्या नेत्यांना आपल्यावरील जबाबदारीची जाणीव असते. बेजबाबदार अन् बेदरकार नेतृत्व दीर्घकाळ टिकू शकत नाही, याची त्याला रास्त जाणीव होती. १९७० साली मिळालेला हा धडा तो पुढं कधीही विसरला नाही, हे त्याच्या १९८० साली त्यानं काढलेल्या उद्‌गारावरून ध्यानात येतं. या वेळी तो केवळ गडॅन्स्कच्या कामगारांचं नेतृत्व करत नव्हता तर साऱ्या पोलंडभर चाललेल्या क्रांतीचं नेतृत्व करत होता. आपल्या चुका मोठ्या मनानं मान्य करणारे नेते सर्वार्थानंच मोठे असतात, हेच वालेसाच्या उदाहरणावरून दिसून येतं. चुकांची कबुली देताना तो म्हणाला,

'I did not lead my fellow workers with enough vigor or wisdom in 1970. What inspired me during the rebellion that began in August 1980 was the blood of the workers who had put their trust in me. It was my stupidity in not taking it to victory that time. I wanted to improve on myself.'

'माझ्या सहकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात १९७० साली माझी कुवत अन् ज्ञान अपुरं पडलं. १९८० च्या ऑगस्टमध्ये क्रांतीचं नेतृत्व करताना मी या गोष्टीची सतत जाणीव ठेवली की, ज्या अर्थी कामगारांनी एवढ्या विश्वासानं आपलं नेतृत्व माझ्यावर सोपवलंय त्या अर्थी त्यांच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबाची जबाबदारी मला घ्यायला हवी! माझ्या अज्ञान आणि मूर्खपणामुळंच मी त्या वेळी त्यांना यश देऊ शकलो नाही. आता मात्र स्वतःला सुधारून त्यांना विजयाप्रत नेण्याची खबरदारी मी घेतली आहे.'

कारखाने वा गिरण्या बंद पडल्या काय, देशाची उत्पादनक्षमता घटली काय किंवा कामगार उपासमारीनं मेले काय कशाचीही क्षिती न बाळगता आपला मोठेपणा अन् प्रस्थ वाढवत ठेवण्याची खबरदारी घेणाऱ्या नेत्यांना वालेसाकडून शिकण्याजोगं खूपच आहे.

१९७० सालचा कामगारांचा उठाव कामगारांचा बळी घेऊनच शांत झाला असं नव्हे तर पोलंडच्या राजकारणातही त्यानं प्रचंड उलथापालथ करून टाकली. गोमुल्काची राजवट संपून त्या जागी एडवर्ड गिरेकला नेमण्यात आलं. पूर्वाश्रमी कोळशाच्या खाणीत काम करणारा हा साधा कामगार. आपल्या कर्तृत्वानं त्यानं देशाचं नेतेपण मिळवलं. दक्षिण पोलंडच्या कॅटॉविस भागात कारखाने व खाणीत काम करणाऱ्या कामगारांचं जीवनमान सुधारण्यासाठी त्यानं फार मोठे कष्ट घेतले होते. त्याच्या या कर्तृत्वामुळंच सत्तासोपानाच्या पायऱ्या चढणं त्याला सोपं झालं होतं. कामगारांच्या सुखदुःखांची योग्य जाणीव असलेला हा आपल्यातलाच माणूस देशाच्या प्रमुखपदी आला म्हणून देशभरच्या कामगारांनाही फार बरं वाटलं. सत्तेवर आल्या–आल्याच देशाची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचं त्यानं आश्वासन दिलं अन् त्याप्रमाणं तो कामालाही लागला.

## दिवाळखोरीचा जाहीरनामा !

गिरेक एका सामान्य कुटुंबात जन्मला होता. गरिबीतच तो वाढला. कोळशाच्या खाणीत एक सामान्य कामगार म्हणून तो कामाला लागला. या वातावरणात बरीच वर्षं काढल्यामुळं कामगारांना काय हालअपेष्टा सोसाव्या लागतात हे त्याला पुस्तकं वाचून जाणून घ्यायची गरज पडली नाही. कामगारांच्या जीवनातल्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी त्याला कामगारांच्याकडून माहिती गोळा करावी लागली नाही. ज्या अघवड परिस्थितीत कामगारांना जीवन जगावं लागतं ज्या उष्ण वातावरणात भूगर्भात खाणी खोदताना रक्त जाळावं लागतं ते सारं त्याला चांगलंच ठाऊक होतं. म्हणून तर राज्याची सूत्रं हाती येताच, श्रीमंतांना गरीब करण्यापेक्षा गरिबांना श्रीमंत करायचं ही महत्त्वाकांक्षा उराशी बाळगून तो कामाला लागला. देशांतर्गत अन् देशाबाहेरची परिस्थिती अनुकूल असती तर आपलं स्वप्न पुरं करण्यात तो यशस्वी ठरला असता; पण कशाचाच अंदाज न घेता पाण्यात उडी ठोकल्यामुळं पाण्यात गुदमरून बुडण्याचीच पाळी त्याच्यावर आली. तो एकटाच बुडला असता तर चालण्याजोगं होतं. आपल्याबरोबर त्यानं देशालाही गोत्यात आणलं. त्यानं त्याच्याकडून देशाच्या आर्थिक उन्नतीसाठी केलेले प्रयत्न पराकाष्ठेचे प्रामाणिक होते हे मात्र कोणीही नाकारू शकणार नाही.

देशातल्या मोठमोठ्या उद्योगधंद्यांची प्रचंड वाढ करण्याच्या हेतूनं त्यानं अब्जावधी डॉलर्सचं कर्ज पश्चिम युरोपीय राष्ट्रांकडून घेतलं. त्यानं या राष्ट्रातील उत्तम तंत्रज्ञांनाही पाचारण केलं. उद्योग धंद्यांच्या पुनर्रचनेसाठी लागणारी अत्याधुनिक यंत्रसामुग्रीही त्यानं बाहेरून आणवली. आणि हे सारं कम्युनिझमच्या छायेखाली वाढणाऱ्या हडेलहप्पी यंत्रणेत गुंतवून टाकलं. ही त्याची सर्वांत मोठी चूक ठरली. अमेरिकेचे एक नामवंत अर्थतज्ज्ञ या चुकीबद्दल बोलताना म्हणाले, 'There he wasted all of it in textbook cases of how not to run an economy.'

वजनाने हलके अन् वेगवान ट्रॅक्टर्स बनविणाऱ्या मॅसी-फर्ग्युसन या कंपनीशी कोलॅबरेशनचा (सहकार्याचा) करार करून वार्साजवळील उर्सस ट्रॅक्टर कारखान्यात नवे ट्रॅक्टर्स बनविण्यास सुरुवात केली; पण दुर्दैवानं या कंपनीला युरोप-अमेरिकेत ट्रॅक्टर्स विकण्याला परवाना मिळू शकला नाही. किंमत जास्ती असल्यामुळं कम्युनिस्ट देशही हे ट्रॅक्टर्स विकत घ्यायला तयार झाले नाहीत. पोलंडमध्ये असणारी शेतीची अवजारं या ट्रॅक्टरला जोडण्याजोगी नसल्यामुळं तिथंही त्याला मागणी येऊ शकली नाही. वर्षाला ७५,००० ट्रॅक्टर्स बनविण्याच्या उद्देशानं सुरू करण्यात आलेला कारखाना केवळ ५०० ट्रॅक्टर्सच बनवू लागला.

असाच प्रकार कलर टेलिव्हिजनच्या बाबतीतही घडला. अमेरिकेच्या R. C. A. कार्पोरेशन आणि कॉर्निंग ग्लास वर्क्स यांच्या सहकार्यानं वार्सा येथे प्रतिवर्षी ६,००,००० टेलिव्हिजनसेटस् बनविणारी फॅक्टरी सुरू करण्यात आली. गैरव्यवस्था, कार्यतत्परतेचा अभाव आणि सुट्या भागांची टंचाई यामुळं प्रत्यक्षात तिथं वर्षभरात फक्त ५०,००० सेटस्च तयार होऊ शकले. हृदयबदलाच्या शस्त्रक्रियेत काही वेळा शरीर परक्या हृदयाचा स्वीकार करत नाही तसाच काहीसा प्रकार इथंही घडला. या गोष्टीची पुनरावृत्ती इतर अनेक धंद्यांतही घडली.

देशाची उत्पादनक्षमता कमी होत चालली असताना गिरेकनं लोकांना खुश ठेवण्यासाठी त्यांचे पगार भराभर वाढविण्यास सुरुवात केली. तो सत्तेवर येण्याआधी बारा वर्षांच्या काळात लोकांच्या पगारात फक्त १७% वाढ झाली होती. त्यानं १९७० ते १९७५ च्या दरम्यान पगारात ४०% वाढ केली. लोकांना भरपूर मांस मटण खाण्यास मिळावं म्हणून त्यानं हलकं धान्य अन् वैरण-चारा यांची आयात चौपटीनं वाढवली. दरडोई मांसान्नभक्षणाचं प्रमाण १३२ पौंडावरून (वार्षिक) १५४ पौंडावर गेलं. कम्युनिस्ट देशाला न पेलणाराच हा प्रकार होता.

त्यातच भर पडली इतर अन्नपदार्थांच्या किमती विचार न करता वेडचासारख्या खाली आणल्यामुळं. शेतकऱ्यांच्याकडून १० झिलॉट्सला १ लिटर दूध विकत घेऊन सरकारनं ते जनतेला ४ झिलॉट्सला विकण्यास सुरुवात केली. १ किलोग्रॅम डुकराचं मांस १३० झिलॉट्सला विकत घेऊन ७० झिलॉट्सला ते जनतेला उपलब्ध करून देण्यात आलं. तयार झालेल्या पावापेक्षा गव्हाची किंमत जास्त असल्यामुळं शेतकरी भरपूर किंमतीत गहू सरकारला विकू लागले आणि अत्यल्प किंमतीचा पाव त्यांच्याकडून घेऊन आपल्या डुकरांना गव्हाऐवजी तो चारू लागले असल्या जगावेगळ्या अर्थव्यवस्थेमुळं काय अनर्थ घडून येतील हे सांगायला अर्थतज्ज्ञांची वास्तविक गरज पडू नये. ६० पैशाला १ लिटर पेट्रोल आयात करून जनतेला ते ६ रुपयांना विकणाऱ्या देशाकडून थोडं तरी 'शहाणपण' पोलंडनं शिकायला नको होतं काय ? पोलंडची ही अर्थव्यवस्था म्हणजे 'दिवाळखोरीचा जाहीरनामाच' होता असं म्हटलं तर ती अतिशयोक्ती ठरू नये.

## KOR चा चमत्कार !

अशा तऱ्हेची अर्थव्यवस्था कोसळायला एखादं नाममात्र कारण हवं होतं. ते काही वर्षातच चालून आलं. १९७३–७४ साली तेल निर्यात करणाऱ्या (OPEC) देशांनी तेलाच्या किंमती एकदम वाढविल्या अन् जगभर मंदीची लाट पसरली. या लाटेच्या तडाख्यात सापडलेली पोलंडची अर्थव्यवस्था तुफानात सापडलेल्या नावेप्रमाणं डगमगू लागली. कारखान्यांतून, उत्पादनक्षमता घटल्यामुळं बऱ्याच कामगारांना कामावरून कमी करणं आवश्यक होतं; पण कम्युनिस्ट तत्त्वज्ञानात बेकारीला स्थान नसल्यामुळं ते शक्य नव्हतं. कामगारांचे पगार भागविण्यासाठी पाश्चिमात्य राष्ट्रांकडून अधिकाधिक कर्ज घेण्यावाचून पोलंडला दुसरा पर्यायच उरला नाही. कर्जाचा बोजा वाढतच राहिला, उत्पादन घटतच गेलं. युरोप-अमेरिकादी १५ राष्ट्रं आणि ५०१ पाश्चिमात्य बँका यांच्याकडून घेतलेल्या कर्जाचं व्याज फेडताफेडताच पोलंड मेटाकुटीला येऊ लागलं. मुद्दलाची गोष्ट तर सोडाच !

**आता अर्थव्यवस्था कोसळायला एखादं नाममात्र कारण हवं होतं.**

वाढते पगार, वाढती कर्जं अन् मारुतीच्या शेपटासारखं वाढत जाणारं त्यांचं व्याज यासाठी पुनःपुन्हा कर्ज घेण्याची गरज भासू लागली. मुद्दल न फेडता कर्जावरील व्याज फेडण्यासाठी नवनवीन कर्जं घेणाऱ्या पेशव्यांची इथं आठवण यावी. त्यातच भर पडली दुष्काळाची. १९७४ पासून १९८० पर्यंत पोलंडचं शेतकी उत्पादन म्हणावं तसं वाढलंच नाही. गिरेकनं आपलं सर्व लक्ष देशाच्या औद्योगीकरणावर केन्द्रित केल्यामुळं शेतकीविभाग पूर्णपणे दुर्लक्षित झाला.

या सर्व गोष्टींचा परिणाम दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किंमती वाढण्यात झाला असता; पण लोकमताला घाबरून गिरेकनं किंमती न वाढता देशाची तिजोरी मोकळी करण्यास सुरुवात केली.

देशाचा खजिना रिता होत येताच सहा वर्षं मूर्खांच्या नंदनवनात विहरणाऱ्या सरकारनं अखेर नाइलाजानं १९७६ साली किंमतीत भरमसाठ वाढ केली. सुखलोलुप होऊ लागलेली पोलिश प्रजा या अकल्पित भाववाढीमुळं बिथरली. त्याचा परिणाम देशात ठिकठिकाणी निदर्शनं अन् दंगेधोपे होण्यात झाला. राजधानीतील उर्सस ट्रॅक्टर फॅक्टरीच्या कामगारांनी केलेल्या निदर्शनाला हिंस्र वळण लागलं म्हणून सरकारनं ती निदर्शनं क्रूरपणे मोडून काढली आणि इथूनच एका प्रचंड संघर्षाला सुरुवात झाली ...

कामगारांनी स्वतःच्या संरक्षणासाठी कमिटी फॉर सोशल सेल्फ डिफेन्स (KOR) या नावाची संघटना स्थापन केली. या संघटनेला देशातील विचारवंतांनी जोरदार पाठिंबा दिला. आजवर कामगार आणि विचारवंतांचं सख्य पोलंडमध्ये कधीच जमलं नव्हतं; पण KOR संघटनेच्या स्थापनेमुळं हा चमत्कार घडून आला. कम्युनिझमच्या अतिरेकी तत्त्वप्रणालीला सातत्यानं विरोध करणाऱ्या जॅसेक कुरॉनसारख्या विचारवंतांनी कामगारांच्या चळवळीला संपूर्ण सहकार्य देण्याचं ठरविताच सरकारचं धाबं दणाणून गेलं. KOR सारख्या कामगारांच्या स्थानिक संघटनेच्या कुशीतून सॉलिडॅरिटीसारखी सरकारविरोधी देशव्यापी संघटना जन्म घेणार आहे असं आधी कळतं तर गिरेक आणि क्रेमलिनच्या नेत्यांनी KOR चा नायनाट करण्यासाठी आकाश-पाताळ एक करण्यास कमी केलं नसतं. भविष्याच्या उदरात काय दडलं आहे हे कळतं तर जगातले अनेक संघर्ष जन्मापूर्वीच गाडले गेले असते !

KOR संघटनेमुळं देशातल्या सर्व कामगारांना एक नवी दिशा दिसली. स्वतःच्या हक्कांचं संरक्षण करण्यासाठी स्थापण्यात आलेल्या या संघटनेनं ठिकठिकाणच्या कामगारांना अशा तऱ्हेच्या स्वतंत्र संघटना स्थापण्याची प्रेरणा दिली. गडॅन्स्कच्या काही कामगार पुढाऱ्यांनी अशा तऱ्हेची संघटना तिथं स्थापन केली आणि गडॅन्स्कच्या प्रमुख नेत्यांना त्यात सहभागी होण्याचं आवाहन केलं.

गिरेकच्या राजकीय कर्तृत्वाला ओहोटी लागलेली असतानाच लेक वालेसाच्या नेतृत्वाला भरती येऊ लागली होती. KOR च्या गडॅन्स्क शाखेत सामान्य स्वयंसेवक म्हणून दाखल झालेल्या वालेसाचे महत्त्व हा हा म्हणता वाढीस लागलं. कामगार संघटनेचं कप्तानपद कुशलपणे सांभाळणाऱ्या वालेसाला KOR मध्ये सामान्य स्वयंसेवक म्हणून ठेवणं संघटनेच्या संस्थापकांना मनात असूनही शक्य झालं नाही. माणिक कितीही झाकलं तरी आपलं तेज दाखविल्याविना ते थोडंच राहणार !

पोलिश सरकारनं ठिकठिकाणच्या KOR च्या संचालकांना तुरुंगात डांबलं आणि ही संघटना बेकायदेशीर आहे असं जाहीर केलं. पुढं तीन–चार वर्षांत ही संघटना गुप्तपणे कार्य करू लागली; एवढंच नव्हे तर ती सभासदांची संख्या वाढत जाऊन बलिष्ट झाली. संघटनेच्या नेत्यांना तुरुंगाच्या वाऱ्या वारंवार घडू लागल्या; पण सर्वांत जास्ती वाऱ्या कुणाच्या वाट्याला आल्या असतील तर त्या म्हणजे एकट्या लेक वालेसाच्या ! गिरेकनं वालेसाची किती धास्ती घेतली होती हेच यावरून ध्यानात येतं.

### पोलंडमध्ये पोप जॉन पॉल

मध्यंतरी पोलंडच्या धर्मपीठानं कामगार चळवळीला आपला पाठिंबा दर्शविला. क्रॅकोव गावच्या कार्डिनल वायज्योलानं KOR संघटनेला आशीर्वाद दिला अन् जाहीरही केलं. ' मानवी हक्कांची पायमल्ली आम्ही कदापीही सहन करणार नाही !' पोलंडमधील कम्युनिस्ट पक्षाच्या प्रवक्त्यानं ' कार्डिनलसाहेबांचं हे विधान म्हणजे पक्षाच्या अनिर्बंध सत्तेला लावण्यात आलेला अंकुश ' अशा शब्दात त्यांची निर्भर्त्सना केली. ही गोष्ट घडून आली १९७४ साली; पण पुढं चारच वर्षांत या प्रवक्त्याचं त्या वेळी दुर्लक्षित झालेलं हे विधान अक्षरशः सत्यात उतरलं. चार वर्षांपूर्वी कम्युनिस्ट सत्तेला अंकुश लावणारी ही व्यक्ती पोलंडमधली एक धर्मगुरू यापलीकडं कोणीही नव्हती. त्यामुळं त्या व्यक्तीच्या शब्दालासुद्धा फारशी किंमत देण्याची गरज पोलिश सरकारला त्या वेळी भासली नाही; पण १९७८ साली याच व्यक्तीची निवड जगातल्या अखिल ख्रिश्चन धर्मीयांचा धर्मगुरू म्हणून होताच पोलिश सरकारच्या पायाखालची वाळू अक्षरशः सरकली. एका सामान्य धर्मगुरूचं रूपांतर एका प्रचंड धर्मशक्तीत झालं होतं ...


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.

–डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. म. रा. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

ज्या दिवशी एका पोलिश कार्डिनलची निवड व्हॅटिकनच्या प्रमुख पोपपदासाठी करण्यात आली आहे हे पोलंडला समजलं तो दिवस पोलंडच्या इतिहासातला सुवर्णदिन मानला गेला ! धर्मावर जिवापाड प्रेम करणारं पोलंड अभिमान अन् अस्मितेच्या सुखसागरात न्हाऊन निघालं. धर्मपीठाच्या इतिहासात पोपपदावर वर्णी लावणारं पोलंड हे पहिलंच कम्युनिस्ट राष्ट्र होतं ! ...

The naming of the first Polish Pope caused an explosion of national pride in Poland. As had occurred so often in the past, a religious act had become a patriotic cause for the Poles.

पोपपदावर कार्डिनल वायज्योला यांची नेमणूक झाल्यानंतर पोलंडमध्ये देशभक्तीचं एक नवंच वारं वाहू लागलं. अनेकांनी या गोष्टीचा फायदा एका वेगळ्याच कारणासाठी करून घेतला. पोलंडमध्ये असे अनेक लोक होते जे धर्माला जिवापेक्षा जास्ती मानत. कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीत धर्म, देव इत्यादी गोष्टींना स्थान नव्हतं. म्हणून अशा लोकांना कम्युनिझमविरुद्ध उभं करण्यासाठी काही लोकांनी त्यांच्या धर्मभावनेला चिथावणी दिली. ही गोष्ट मात्र वालेसाला मुळीच पसंत पडली नाही. आपलं मत त्यानं लोकांच्या समोर स्पष्ट शब्दांत मांडलं, 'आपल्याला धर्म जसा प्रिय आहे, तसाच देशही प्रिय आहे. देश अबाधित राखायचा असेल, स्वतंत्र राखायचा असेल तर कम्युनिझमच्या काळजाला आपण हात लावता कामा नये. कम्युनिझमच्या चौकटीतच राहून आपल्याला अधिक हक्क मिळवायचे आहेत, अधिक स्वातंत्र्य मिळवायचं आहे !' वालेसाच्या या स्पष्ट इशाऱ्यानंतर त्याच्या काही सहकाऱ्यांनी लोकांच्या धर्मभावना चेतवण्याचं काम थांबविलं.

सॉलिडॅरिटीच्या निर्मितीला कोणत्या एका गोष्टीचा सर्वांत जास्ती हातभार लागला असेल तर ती म्हणजे पोप दुसरे जॉन पॉल यांची मातृभूमीस भेट ! १९७९ च्या जूनमध्ये पोप पॉल पोलंडला आले. विमानतळावर त्यांचं स्वागत करण्यासाठी लक्षावधी लोक जमले होते. रंगीबेरंगी पोषाखातले ते लोक हातात विविधरंगी फुलांचे गुच्छ घेऊन आले होते. त्या समुदायात स्त्रिया होत्या, पुरुष होते, लहान मुलं जशी होती तसेच वृद्धही होते. विद्यापीठातून उच्च शिक्षण देणारे प्राध्यापक होते, तसेच नांगर हाकणारे शेतकरीही होते. कामगारांच्या जोडीनं कारखान्यांचे अधिकारीही आले होते. आपल्या आदरणीय पोपला पाहण्यासाठी सारं पोलंड जणू तिथं आलं होतं.

विमानातून उतरताच पोपनी प्रथम काय केलं असेल तर मातृभूमीला वंदन ! जमिनीवर पाय टेकताच पोप पॉल गुडघे टेकून जमिनीवर बसले आणि अत्यंत नम्रपणे खाली वाकून मातृभूमीच्या पवित्र मातीला ओठ लावून त्यांनी तिचं चुंबन घेतलं. लोकांच्या अंतरभावनेला स्पर्श करणारं ते लोकविलक्षण दृश्य पाहून जमलेला समुदाय भारावून गेला. अनेकांचे डोळे पाणावले. त्या लक्षावधी ओठांतून आकाशाला भेदून जाणारा पोप पॉल यांचा जयजयकार निनादला ! ते अपूर्व दृश्य पाहण्याचं भाग्य ज्यांना लाभलं ते भाग्यवंत ही स्मृती आपल्या हृदयात कायमची जपणार होते. जे तिथं प्रत्यक्ष हजर नव्हते त्यांनी हा सोहळा टेलिव्हिजनवर पाहिला. त्यांच्या चित्तवृत्तीसुद्धा बहरून गेल्याशिवाय राहिल्या नाहीत.



निर्भय झालो तर पृथ्वीवरच स्वर्ग उभा करू – पोप आणि वालेसा

¤

वार्सांच्या व्हिक्टरी स्क्वेअरमध्ये जमलेल्या अतिप्रचंड जनसमुदायासमोर बोलताना पोप म्हणाले, 'धर्मभावनेला जीवनातून दूर सारणं हा मानवजातीच्या विरुद्ध सर्वांत मोठा गुन्हा ठरेल. मानवजातीच्या इतिहासातून ख्रिस्ताला वगळणं हे सर्वांत अमानुष कृत्य ठरेल ! –

'The exclusion of Christ from the history of man is an act against man.' आपल्या भाषणात कम्युनिझमवर प्रत्यक्ष टीका करण्याचा त्यांनी मुळीच प्रयत्न केला नाही; पण लोकांच्या स्वातंत्र्याची अन् हक्कांची गळचेपी करणाऱ्या कम्युनिस्ट सत्तांना शालजोडीतून जोडे मारण्यासही ते विसरले नाहीत. त्यांनी जगातल्या सर्व कम्युनिस्ट राज्यकर्त्यांना अप्रत्यक्ष इशारा दिला, 'जे लोकांच्या धर्मभावनेची कदर करत नाहीत त्यांना परमेश्वर कधीही क्षमा करणार नाही. आपले स्वातंत्र्य आणि हक्क यांच्या रक्षणासाठी सर्व लोकांनी एक होऊन जुलुम-जबरदस्तीविरुद्ध झगडलं पाहिजे. भयापोटी आपण सर्व गमावू, निर्भय झालो तर पृथ्वीवरच स्वर्ग उभा करू शकू !'

या भाषणामुळं लोकांच्या मनात असलेली भयगंडाची भावना पार दूर पळाली. बंदुका आणि दंडुके यांच्या सहाय्यानं जनतेला धाकात ठेवणाऱ्या कम्युनिस्ट राज्यकर्त्यांविरुद्ध प्राणपणानं झगडण्यास पोलंडची जनता सिद्ध झाली. पोपच्या पोलंडभेटीचा हा सर्वांत मोठा फायदा होता.

पोलंडच्या भेटीत इच्छा असूनही पोप वालेसाला भेटू शकले नाहीत; पण जाता जाता त्यांनी स्मरणपूर्वक संदेश दिला होता, 'वालेसा, तू रोमला आलास तर माझी अवश्य भेट घे !' जगातल्या एका श्रेष्ठ धर्मगुरूनं पोलंडच्या लोकनायकाला दिलेलं हे निमंत्रण त्याच्या तिथं असलेल्या आगळ्यावेगळ्या स्थानाचं निर्देशक होतं.

( क्रमशः )

**...मॅच संपल्यावर पाकिस्तानचा सेंटर फॉरवर्ड रशिद अस्लमजवळ आला आणि त्याच्या परफॉर्मन्सबद्दल रशिदनं अस्लमची पाठ थोपटली. अस्लमच्या डोळ्यांतून अश्रू वाहात होते. तो रशिदला म्हणाला–**

# पुढच्या वेळी आम्ही बाजू उलटविल्याशिवाय राहणार नाही

**'टू हेल विथ हॉकी' । रूपांतर : द्वारकानाथ संझगिरी**

१९७४साल उजाडलं आणि मरगळलेल्या, पराभवाने पिचलेल्या भारतीय हॉकीत नवीन जान फुंकली जाण्याची शक्यता दिसायला लागली. इंडियन एअरलाइन्सने पंजाबच्या हॉकी वर्चस्वाला सुरुंग लावल्यावर अध्यक्षपदाला घोरपडीसारखा चिकटून बसलेल्या अश्विनीकुमारला आसन सोडावं लागलं. 'आसन' रिकामं झाल्यावर त्या आसनासाठी इतरांनी झगडणं ही जुनी भारतीय परंपरा असल्यामुळं त्या परंपरेला जागून अध्यक्षपदासाठी झगडा सुरू झाला.

दोन व्यक्तींना आपण त्या जागेसाठी लायक आहोत असं वाटत होतं. एक व्यक्ती होती निवड–समितीप्रमुख पी. एन. सहानी आणि दुसरी व्यक्ती होती एम. ए एम. रामस्वामी–दक्षिणेचा एक मातब्बर इंडस्ट्रियालिस्ट ! 'खुर्ची' मिळवण्याच्या प्रयत्नात हे दोघे एवढे गुंग होते की, त्या वर्षीच्या आशियायी स्पर्धेकडेही त्यांचं लक्ष नव्हतं.

त्या वर्षी राष्ट्रीय हॉकी–स्पर्धा पुण्याला भरल्या होत्या आणि त्या स्पर्धेनंतर तेहरानच्या एशियाडसाठी भारतीय हॉकी संघाची निवड होणार होती. निवडीनंतर प्रशिक्षणशिबीर असलंच तर ते पतियाळाला होणार होतं.

माझी अर्थातच निवड झाली नाही. कारण उघड होतं. मी राष्ट्रीय स्पर्धेत भाग घेतला नव्हता. नव्हे घेऊच शकत नव्हतो. मी एअरलाइन्सतर्फे खेळत असल्यामुळं भोपाळतर्फे मला खेळता येत नव्हतं आणि एअरलाइन्सला तेव्हा राष्ट्रीय स्पर्धांमध्ये उतरण्याची मान्यता मिळाली नव्हती.

पण त्या वेळी माझे ग्रह चांगले असावेत. भारतीय ऑलिंपिक असोसिएशनला बॉम्बे गोल्डकप हॉकीस्पर्धेसाठी निरीक्षक पाठविण्याची सुबुद्धी झाली आणि निरीक्षकांनी माझी पतियाळाच्या शिबिरासाठी निवड केली.

१९७२ सालीही अगदी अस्संच घडलं होतं. त्या वेळी जिमि नगरवालाने माझ्या नावाचा आग्रह धरून मला आश्चर्यचकित केलं होतं. ज्या नगरवालाने इनामच्या कारकीर्दीचं खोबरं केलं, त्यानं मला पाठिंबा देणं मला विचित्र वाटलं होतं.

असो. पतियाळा शिबिरासाठी माझी निवड झाल्यावर अंतिम निवडीपूर्वी एका पेपरात बातमी झळकली–'हॉकीच्या निवडसमितीत माजी कर्णधारांचा समावेश होणार!' खुद्द भारत सरकारची ती आज्ञा होती. ही बातमी वाचल्याक्षणी माझा आत्मविश्वास वाढला. माझी निवड नक्की होणार ह्याची मला शंभर टक्के खात्री होती. भारतीय हॉकीचे जिथे तिथे वस्त्रहरण होत असताना माजी कर्णधार जास्तीत जास्त चांगला संघ निवडणार, तिथे 'राजकारणाला' मज्जाव असणार ह्याबद्दल मी निःशंक होतो. त्यामुळे मोठ्या आशा-आकांक्षा उराशी बाळगून मी पतियाळाला गेलो.

पण तिथेही काही धक्के बसलेच ! माझी निवड झाली नाही; एशियाडला जाणाऱ्या भारतीय संघाची जी व्यवस्था ठेवण्यात आली होती ती इतकी निकृष्ट दर्जाची होती की, कुणाचीही तळपायाची आग मस्तकात जावी. विशेषतः खाण्यापिण्याच्या बाबतीत ! शिबिरार घाम गाळून आल्यावर आमच्या ताटात काय पडायचं तर डाळ आणि चपात्या ! घरी आम्ही काही Five course डिनर किंवा लंच झोडत नसतो किंवा रोज नळ्या चोखत नसतो; पण शिबिरांत दिवसभर सराव केल्यावर, शारीरिक तंदुरुस्तीच्या दृष्टिकोणातून किमान चांगल्या आहाराची अपेक्षा करणं चुकीचं नव्हतं.

आम्ही एन्. आय्. एस् (नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ स्पोर्टस) च्या डायरेक्टरकडे तक्रार केली. आम्ही त्याला समजावलं की, किमान रोज एकदा तरी मटन आम्हाला मिळालं पाहिजे.

त्याने खाका वर केल्या ..'पतियाळात मटन मिळत नाही. आम्हीं तुम्हाला कुठून देणार?' हे त्याचं उत्तर. बरं तेवढ्यावरही तो थांबला नाही, वर आम्हाला सुनावलं, 'पाकिस्तानी संघाला त्यांच्या शिबिरात कुठं मटन वगैरे मिळतं?'

काही दिवसांनी जनरल कुमारमंगलम् पतियाळाला आले. त्या वेळी ते ऑल इंडिया स्पोर्टस कौन्सिलचे प्रमुख होते. सहाजिकच त्यांच्यासाठी एन्. आय्. एम्मध्ये खाना आयोजित केला होता. आम्हा खेळाडूंनाही निमंत्रण देण्यात आलं होतं. तिथं टेबलावर 'अरेंज' केलेलं जेवण पाहिलं आणि आम्ही सर्व टण्कन उडालो ! मस्तपैकी मटन, कोंबडी, मासे आमची वाटच पहात होते. पतियाळात मटण वगैरे मिळत नव्हतं, तर आता अचानक कुठून आलं ?

पाहिलंत, आपल्याकडे खेळाडूंना कसं वागवलं जातं !

'तेहरान' हे माझं पहिलं एशियाड आणि भारतीय संघाबरोबरची तिसरी विदेशवारी ! मी अल्लाकडे करुणा भाकली–निदान

ह्या वेळी तरी प्रत्यक्ष संघात माझा समावेश होऊ दे! सिंगापूर आणि म्युनिकला अल्लाने प्रतिसाद दिला नव्हता. ह्या वेळी प्रार्थना फुकट गेली नाही.

आम्ही मलेशियाविरुद्ध सामना जिंकला. त्यात पेनल्टी-कॉर्नरच्या सहाय्याने गोल करण्याचं भाग्य मला लाभलं. नंतर अंतिम सामन्याच्या दिशेने झेप घेताना, वाटेत आम्ही जपानला ओलांडलं. हा सामना मी उभ्या जन्मात विसरणार नाही! अक्षरशः मी शाळेच्या संघातून खेळतोय असा मला भास झाला. हे जपानी दिसायला सारखे, आकाराने सारखे, उंची, वजन सबकुछ एकसारखं! आणि भयंकर आक्रमक! पर्ल हार्बरवर हल्ला चढवणाऱ्या बॉम्बर्सच्या आवेशाने ते चेंडूवर तुटून पडत आणि त्यात त्यांचे चेहरे सारखे असल्यामुळे 'फारवर्ड' पुढे येतोय किंवा 'फुलबॅक' पुढे येतोय, काहीही कळत नव्हतं. त्यामुळं त्यांचा एकही डावपेच मला कळला नाही. आम्ही त्यांना हरवलं खरं; पण त्यांनी आमचं डोकं भंडावून सोडलं.

शेवटी गाठ पडली पाकिस्तानशी! १४ सप्टेंबरचा दिवस होता तो! त्या दिवशी सकाळी आमचा कोच बालकिशनने मला उठवलं आणि म्हणाला, 'चल जरा मोकळ्या हवेत फिरून येऊ या!'

बाहेर पडल्यावर तो मला म्हणाला, 'आज तू पाकिस्तानविरुद्ध खेळणार आहेस.'

मला कळेना की, एखादं गुपित सांगितल्यासारखं तो मला बाहेर घेऊन जाऊन का सांगतोय? रूमवर परतलो तर आमच्या संघात प्रत्येक खेळाडू भलताच टेन्स होता आणि प्रत्येकजण मला सांगत होता, 'तुला आज शर्थ करायला हवी!' अगदी आमचा मॅनेजर आणि एके काळचा महान खेळाडू क्लॉडियसनेसुद्धा सतत माझ्यामागे एकच टुमणं लावलं होतं – 'तुला आज चांगलं खेळायलाच हवं. तू गोल मारायलाच हवा!'

जो–तो माझ्यापाठी का लागलाय कळेना! 'पाकिस्तान' झालं म्हणून काय झालं, तोही जगातल्या इतर संघासारखा एक संघच ना! मलेशिया किंवा जपानविरुद्ध खेळताना कुणीही आग्रहाने सांगितलं नाही की, तुला प्राण पणाला लावून खेळलं पाहिजे. मग आजच हा आग्रह का चाललाय?

थोड्या वेळाने माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला!

स्वातंत्र्यानंतर सत्तावीस वर्षांनी पाकिस्तानविरुद्ध खेळणारा मी पहिला मुसलमान खेळाडू होतो!

आणि त्या क्षणी माझ्यावरच्या मोठ्ठ्या जबाबदारीची मला जाणीव झाली. मला जिवाची बाजी लावणं आवश्यक होतं... पुढच्या मुस्लिम खेळाडूंची भवितव्यं त्यावर अवलंबून होती... माझ्या हातून चूक झाली असती, तर त्याची शिक्षा त्यांना भोगावी लागली असती.

आर्यमेहर स्पोर्टस् क्लबच्या मैदानावर जेव्हा मी उतरलो तेव्हा माझ्या हातापायांना घाम फुटला होता. जबाबदारीची जाणीव सतत मनाला बुटातल्या खिळ्याप्रमाणे टोचत होती. त्या दिवशी पाकिस्तान्यांनी लाजवाब खेळाचं प्रदर्शन भरवलं. खेळाचा वेग भन्नाट ठेवला. डाव्या फळीतल्या सॅम्युअल्ला आणि उजव्या फळीतल्या इस्लाहने आमच्या तोंडचं पाणी पळवलं.

त्या दिवशी त्यांनी आपल्या खेळाचा नेहमीचा ढंगच साफ बदलून टाकला होता डाव्या फ्लॅन्कवरून सॅमी आपल्या राइट हाफ विरेंदरला चकवत चेंडू इनसाइडलेफ्ट शहनाझला द्यायचा आणि शहनाझ चेंडू सेंटरफॉरवर्ड रशिद किंवा इनसाइड–राइट आझमकडे द्यायच्याऐवजी सरळ राइटफ्लॅन्कवरच्या इस्लाहकडे द्यायचा. त्यामुळे आमचा संपूर्ण बचावच कोसळायची वेळ आली होती.

आमच्या फॉरवर्डस्‌ने तसा 'गनिमी कावा' दाखवला नाही. 'जिंकू किंवा मरू' हेच तत्त्व डोळ्यांसमोर ठेवलं. आम्ही प्रयत्नांची शिकस्त केली आणि धारातीर्थी पडलो. अजितपालने कर्णधाराला साजेसा खेळ केला. त्या दिवशी तो चक्क 'सर्वव्यापी' वाटला. अजितपालच्या खेळाने मला स्फूर्ती दिली ... माझी सर्व गुणवत्ता मी त्या दिवशी पणाला लावली ...

ते मैदान तसं खूप उंचावर आहे ... त्यामुळं श्वास घेताना भयंकर त्रास व्हायचा. मी नीरासारखा पुढे सरकणाऱ्या शहनाझला अडवण्याचा बऱ्याच वेळा यशस्वी प्रयत्न केला; पण श्वास घ्यायला त्रास होत असल्याने माझी दमछाक व्हायची .. एव्हढा महान खेळाडू तो शहनाझ; पण त्याचीही माझ्यासारखीच हालत झाली होती ...

शहनाझ हा मोठा बिलंदर खेळाडू आहे ... तो त्याच्या दोन्ही बाजूंच्या बचावासाठी धडपडणाऱ्या खेळाडूंना अगदी आरामात फसवू शकतो... पण त्याच्या सर्व ट्रिक्स माझ्यापुढे फोल ठरल्या ... शहनाझला माहीत नव्हतं की, मी मूलतः डावरा आहे. अगदी मी जेवतोसुद्धा डाव्या हाताने! मी त्या दिवशी राइट–फूलबॅकला खेळलो. कारण सुरजीतला संघात सामावून घ्यायचं होतं आणि सुरजीतला फक्त लेफ्टफुलबॅक जागेवरच खेळायला जमतं ...

त्या दिवशी अर्थात पाकिस्ताननेच पहिल्यांदा पेनल्टी–स्ट्रोकवर आघाडी घेतली; पण तरीही आम्ही खचलो नाही .. उलट त्यानंतर आमच्या फॉरवर्डसनी बेफाट खेळ केला .. तापलेल्या जमिनीवर अनवाणी पायाने जिवाच्या आकांताने पळावं तसे आमचे फॉरवर्डस् चेंडूसह वेगात पुढे सरसावत होते. आमची बचावाची फळी त्यांच्यापासून काही अंतरावर अभेद्य कवच करून उभी होती ...

आणि तो क्षण अवतरला!

### ते आनंदाश्रू होते

सुरजीतने चेंडू राइटहाफ विरेंदरकडे दिला. विरेंदरने अजितपालला दिला. अजितपाल २५ यार्डांची रेषा पुढे ओलांडून गेला आणि त्याने चेंडू हळूच सेंटर फॉरवर्ड कुशाकडे सुपूर्त केला. कुशा तो घेऊन पाकिस्तानच्या 'डी' मध्ये शिरला आणि गोल करणार इतक्यात पाकिस्तानचा लेफ्टबॅक मुनावर आडवा आला .. त्याने चेंडू अडवला; पण पायाने. भारताला पेनल्टी–स्ट्रोक मिळाला ... अजितपालच्या हातून चूक झाली नाही .. भारताने पाकिस्तानशी बरोबरी केली ...

ही स्पर्धा लीग बेसिसवर खेळण्यात आली होती ... हा सामना

**आमची बचावाची फळी काही अंतरावर अभेद्य कवच करून उभी होती!**

संपल्यावर असं लक्षात आलं की, भारत आणि पाकिस्तान दोघांचेही गुण समसमान आहेत. त्यामुळे झुंज झडणं क्रमप्राप्त होतं ...

ती झडली; पण यश रुसलं ! ते पाकिस्तानवर मेहरबान झालं !

मस्क्यातून सुरी फिरावी तसे आमचे फॉरवर्डस् पाकिस्तानी फळी कापून पुढे जात; पण ऐन मोक्याच्या वेळी चुका करत. गेली कित्येक वर्षं हीच भारतीय हॉकीची शोकांतिका आहे. आम्हाला डॉजिंग शिकवलं जातं, ड्रिबलिंगमध्ये आम्ही चतुर असतो; पण पहिली संधी मिळताक्षणी गोल कसा करावा ह्यावर कधी फारसा जोर दिला जात नाही. हल्ली पेनल्टी-कॉर्नरवरून गोल करण्याचं तंत्र सोकावलंय; त्यामुळं पेनल्टी-कॉर्नर स्पेशालिस्ट तयार करण्यात शक्ती खर्च केली जाते ... फील्ड गोल्सचं महत्त्व आम्ही विसरलोय !

ह्या परतीच्या सामन्यात सहाव्या मिनिटातच पाकिस्तानच्या मनझूरने पेनल्टी-कॉर्नरच्या सहाय्याने गोल केला आणि तिथेच आमचं नीतिधैर्य खचलं आणि नंतर मुनावरने दुसरा गोल केल्यावर सर्वच संपलं. पाकिस्तान पुन्हा चॅंपियन झाले !

व्यक्तिशः माझा खेळ अत्यंत समाधानकारक झाला. हातच्या कंकणाला आरसा कशाला, दुसऱ्या दिवसाचे रिपोर्टस्च नजरेखालून घाला 'टाइम्स'ने लिहिलं होतं, 'It was a tearful Aslam Sherkhan after the match. And one's heart went out to the great defender who learnt that, as much surprised as us, he was not selected for the All-Asian team dispite his. superb showing in both matches against Pakistan.'


" एका वेगळ्या विषयावर भर देणारी ही कादंबरी. स्त्री-बुवाबाजीच्या प्रकारांमागचे मर्म उलगडून सांगणारी. कुठलंही भाष्य न करता एक सत्यघटना जशीच्या तशी मांडल्याने झपाटून टाकण्याचे चांगलेच सामर्थ्य या कादंबरीला लाभलंय. त्याच त्या प्रेमाच्या त्रिकोणकथांपेक्षा एक महत्त्वाचा सामाजिक विचार लालित्यपूर्णतेने या नवोदित लेखकाने घडवलाय, त्यामुळे बुवाबाजीसारख्या गोष्टींबाबत वाचक अधिक जागरूक बनतील."

**पुस्तक पंढरी / ऑगस्ट १९८२ अंक**
**बॉंबे बुक क्लब-ऑगस्ट निवड**

# सबला

लेखक : माधव शिरवळकर.
राजहंस प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : रुपये बारा


मॅच संपल्यावर पाकिस्तानचा सेंटर-फॉरवर्ड रशिद माझ्याजवळ आला आणि माझ्या परफॉर्मन्सबद्दल माझी पाठ थोपटली, माझ्या डोळ्यांतून अश्रू वाहात होते...मी रशिदला म्हटलं, 'पुढल्या वेळी आम्ही बाजू उलटवल्याशिवाय रहाणार नाही !' इतक्यात घामाने थबथबलेला शहनाझ तिकडे आला. त्याची मी अशी कोंडी केली होती की इनसाइडलेफ्टऐवजी इनसाइड-राइटला त्याला खेळवण्यात आलं होतं...

'अस्लम, 'पुढली वेळ' आता कदाचित पुन्हा येणारच नाही' तो मला म्हणाला !

शहनाझ चुकला ! एका महिन्याच्या आत ऑल एशियन टीम, भारतीय संघाविरुद्ध भारतात सात सामने खेळली ... ह्या ऑल एशियन संघातून काही भारतीय खेळाडूही पाकिस्तानी खेळाडूंच्या खांद्याला खांदा लावून भारतीय संघाविरुद्ध खेळत होते... 'राष्ट्र' ह्या शब्दाचा आपण किती संकुचित अर्थ आजपर्यंत लावत होतो. ह्याचा मला उलगडा झाला...चक्क आशियातल्या विविध राष्ट्रांतले खेळाडू केव्हढ्या गुण्यागोविंदाने नांदत होते ! केव्हढ्या संघभावनेने एका संघातून खेळत होते !

ही मालिका अत्यंत लोकप्रिय ठरली. सुरुवात जलंदरला झाली आणि तो सामना आम्ही जवळजवळ जिंकला होता ! ३५००० प्रेक्षक भारतीय आणि पाकिस्तानी खेळाडूंना एकाच संघातून खेळताना पहायला आले होते...सर्व डोळे अर्थातच शहनाझला न्याहाळत होते; पण पुन्हा मी त्या दिवशी शहनाझला मुसंडी मारायला दिली नाही. मध्यंतराच्या वेळी शहनाझ मला म्हणाला, 'तू काय चालवलयस. अरे, हा महोत्सवी सामना आहे, ही काही आंतरराष्ट्रीय स्पर्धा नाही.पब्लिकचा पैसा तरी वसूल होऊ दे.' मला त्याचं दुःख कळलं त्याला त्याची कला दाखवायला संधी मिळत नव्हती...शहनाझ जगातला सर्वोत्कृष्ट 'इनसाइड-लेफ्ट' असेल; पण 'हम भी कुछ कम नही', मीही चांगला राइट फूल-बॅक आहे हे मला सिद्ध करायचं होतं... दुसरं म्हणजे पराभवाचा मला नेहमीच तिटकारा वाटायचा...अगदी शाळेत गोट्या खेळतानाही मला पराभव सहन व्हायचा नाही.

त्या सामन्यात आम्हाला एक पेनल्टी-कॉर्नर मिळाला. मी शॉट मारला आणि तो चेंडू गोलपोस्टच्या आतल्या कडेला लागून चेंडू पुन्हा मैदानात आला. शॉट इतक्या जोरात होता की, त्या गोलपोस्टचा कपचाही उडाला ! नियमानुसार चेंडूने गोलरेषा ओलांडली होती. त्यामुळे गोल आम्हाला मिळायला हवा होता. पंचगिरी करणाऱ्या गुरुदेवने तो आम्हाला बहालही केला; पण अजितपालसिंगने काय युक्तिवाद केला देव जाणे, गुरुदेवने निर्णय फिरवला !

आणि तिथेच मॅचही फिरली !

बंगलोर सोडलं, तर प्रत्येक ठिकाणी 'आशियायी' संघाने आमचा पराभव केला. बंगलोरला सामना, आम्ही बरोबरीत सोडवला; पण खरं सांगू, पराभवाचं दुःख तेव्हढं जिव्हारी लागलं नाही. मी माझ्याच पराक्रमावर बेहद्द खूष होतो. नामवंत क्रीडापत्रकारांनी मुठी भरभरून स्तुतिसुमनं माझ्यावर उधळली. सामने संपल्यावरही किती तरी दिवस मी माझं त्यांनी केलेलं गुणगान तासन्तास वाचत बसायचो.

बॉबी तल्यारखानने ब्लिट्झमध्ये लिहिलं होतं- 'In fact it

was here that could lie the sole interest of this grand exhibition fixture – to see how India's outstanding, full back Aslam Sher Khan would once again hold the flying Pakistani forwards as he had done at Tehran where one can now see Leslie clandis was dead right when stating that Pakistan should have won by a very wide margin· But Aslam had actually policed the Pakistani wizard Shahnaz from his proper position at inside-left to inside-right and since then the towering Aslam has compelled the world's reputed best inside-left to change over to the other side. A tremendous compliment to the right Full back's anticipation, tackling and covering. "

दुसऱ्या एका पत्रकाराने लिहिलं होतं, 'The All-Asian Forwards were like Five bullets against whom was pitted one man– Aslam Sherkhan· '

खरंच, अम्माला इंग्लिश येत असतं तर काय बहार झाली असती !

आता स्वारी होती कौलालंपूरवर ! तिथे 'विश्वचषक ' आमची वाट पहात होता. ह्या वेळी ' माझी निवड होईल का ?' वगैरे चिंता डोक्यावर नव्हती. एशियाड आणि नंतर ऑल एशियन संघाविरुद्धचा माझा परफॉर्मन्स, वजन पारडं माझ्या बाजूनं निर्विवादपणे झुकवायला पुरेसं होतं !

' परीक्षेमुळं मला शिबिराला किमान महिनाभर तरी येता येणार नाही ' असं भारतीय ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष राजा कालिंदरसिंगना मी नुसतं सांगितल्याबरोबर ते म्हणाले, ' काही काळजी करू नकोस. तुझी परीक्षा तुझ्या हॉकीएव्हढीच मला महत्त्वाची वाटते. ' इतकी माझी वट वाढली होती !

कौलालंपूरला पोहचलो आणि नंतर नशिबाचे फासे पुन्हा उलटे पडायला सुरुवात झाली. पहिल्याच सामन्यात ' अस्लमशेरखान ' बाहेर हात चोळत बसला आणि वशिल्याचे तट्टे मैदानात हॉकीस्टिक घेऊन उतरली.

हा माझा घोर अपमान होता. फार मोठी मानहानी होती. क्रोध आणि निराशा ह्या दोन्ही भावना एकाच वेळी मनात उसळल्या.

खरंच मला कळेना की, अचानक तलवार माझ्या मानेवर का ठेवली गेली ? अगदी काल-परवा झालेल्या गोड कोडकौतुकाची चव अजूनही जिभेवर होती. सुसाटत येणाऱ्या फॉरवर्डस्‌ना एकटयाने समर्थपणे तोंड दिलं म्हणून जाणकारांनी तोंड भरून कौतुक केलं होतं. बॉबी तल्यारखाननं जे काही अंगावर मोरपीस फिरावं असं लिहिलं, त्याची शाई सुद्धा वाळली नव्हती. रशिदनं पाठीवर कौतुकाने फिरवलेल्या हाताचा स्पर्श अजूनही केव्हढा उबदार वाटत होता...

मग अचानक काय झालं ? शहनाझची शान धुळीस मिळवणाऱ्या अस्लमशेरखानच्या हातून असं काय पाप घडलं की पुन्हा बळीचा बकरा बनवलं ?

माझ्या भावना माझ्या चेहऱ्यावर उमटणार नाहीत ह्याचा आटोकाट प्रयत्न करत मी मलेशियाविरुद्धचा सामना पहात बसलो.

सर्व स्टॅन्डस् काठोकाठ भरले होते. त्या दिवशी मलेशियाचा राष्ट्रीय सण होता आणि हजारो मलेशियन्स त्यांच्या खेळाडूंना चिअरअप् करण्यासाठी तिथे जमले होते. त्यात काही शाळेतल्या मुला-मुलींचा भरणा होता. लाल, पिवळ्या, हिरव्या, निळ्या युनिफॉर्ममधल्या मुला-मुलींच्या हालचालींमुळे संपूर्ण स्टॅन्डला एक सायकेडेलिक इफेक्ट आला होता. जणू काही आमच्या खेळाडूंची एकाग्रता नष्ट करण्यासाठीच हे षड्‌यंत्र रचलं होतं. पन्नास हजार कंठांतून एकच आवाज उमटत होता. ' मलेशिया की जय ' (Malisia win.)

मलेशियाच्या सेंटर फॉरवर्ड पून फॉक लॉकने आपल्या बचावाच्या फळीला हळूच गुंगारा दिला आणि एक गोल चढवला. लगेच मलेशियाचे राष्ट्रध्वज सर्वत्र फडकायला लागले. विजयी वाद्यं गर्जायला लागली.

आमच्या वाटेला पेनल्टी-कॉर्नर्स आले आणि गेले. तो तमाशा माझ्याने पहावत नव्हता ! किती वर्षं ही मंडळी स्वतःला ' पेनल्टीकॉर्नर एक्सपर्ट ' समजणार आहेत ? ही मंडळी स्वार्थापलीकडे जाऊन विचारच करू शकत नव्हती. इतरांना संधी द्यायचा विचारसुद्धा त्यांना शिवत नव्हता. त्यांना संधी दिली तर आपली छुट्टी होईल ही भीती त्यांना सतावत असावी.

मला त्या प्रत्येकाचा राग आला, किळस आली. त्या क्षणी मला माझ्या आई-वडलांचाही राग आला. विशेषतः आईचा ! अल्लावर पूर्णपणे श्रद्धा ठेव हे ती कानीकपाळी ओरडून सांगायची. ' भगवान के घर देर है, लेकिन अंधेर नहीं ' प्रत्येक नैराश्येच्या प्रसंगी हेच वाक्य तिने माझ्या तोंडावर फेकलं होतं. खूप वाट पाहिली; पण अंधार काही संपत नव्हता. दिवसेन्‌दिवस जास्तच गडद होत चालला होता.

डोक्यातल्या विचारांच्या गाठी सुटता सुटत नव्हत्या आणि इतक्यात एक पेनल्टी-कॉर्नर मिळाला. थोडीशी आशा पालवली; पण तो फुकट गेला. नंतर अशोककुमार गोलपाशी येऊन थडकला; पण ' अंतिम संस्कार ' जमले नाहीत. लागोपाठ संधी येत होती आणि आशा दाखवून पळत होती. बलबीरसिंग (ज्येष्ठ) आमचा मॅनेजर होता. चाललेला प्रकार बघून त्याच्या अंगाची लाही लाही होत होती. आम्ही अर्जेंटिनाविरुद्ध हरलो होतो. मलेशियाबरोबर हरलो की सर्व संपुष्टात येणार होतं. त्यामुळं बलबीरनं अस्वस्थ होणं चुकीचं नव्हतं. आमचा कोच गुरुचरणसिंग बोधी त्याला शांत करण्याचा प्रयत्न करत होता.

काही क्षणात त्यांच्यात चर्चा सुरू झाली. मला अंदाज यायला लागला की, मला खेळायला पाठवावं की नाही ह्यावर बोलणं चाललंय. मी सरसावून बसलो. घड्याळाचा काटा पुढं सरकत होता. बहुमोल वेळ वाया चालला होता. मी भलताच अधीर झालो. खेळ

**घड्याळाचा काटा पुढं सरकत होता, वेळ वाया चालला होता. मी भलताच अधीर झालो.**

४ लाख ६३ हजार वाचकांची एकमुखी प्रशंसा




चौथी
डिलक्स
आवृत्ती

लेखक : वि. ग. कानिटकर

।। पृष्ठसंख्या ५४० ।। मोठा डबल क्राउन आकार ।। भरपूर छायाचित्रे ।।
।। मूळ कि. १४० रु. ।। सवलतीत ९५ रु. ।।

चौथ्या डिलक्स आवृत्तीचे खास आकर्षण

**माइन काम्फ**

या हिटलरच्या दुर्मिळ आत्मचरित्राची सचित्र ओळख

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

संपायला फक्त १७ मिनिट उरली तरी निर्णय होईना. सोळा मिनिटं राहिली तरी वाद सुरूच ! पंधरा मिनिटं उरली. माझी अधीरता वाढली. पुन्हा सेकंदकाटयाने एक चक्र पूर्ण केलं आणि बलबीर ओरडला, 'अस्लम, तू जा मैदानावर. कदाचित तुझा अल्ला आज आमची प्रार्थना ऐकेल !'

मी स्टिक उचलून जाणार इतक्यात पुन्हा एकदा पेनल्टी-कॉर्नर मिळाला. मी तसाच स्तब्ध उभा राहिलो. वाटलं सुरजीत गोल करणार ! पण पुन्हा निराशा !

बलबीर ओरडला, 'अस्लम, चल जा !' गळयातला वडलांनी दिलेला तावीज ओठाला लावला आणि मैदानात गेलो.

काही क्षणात पुन्हा पेनल्टी–कॉर्नरचा नजराणा मिळाला. अजितपाल माझ्याकडे अक्षरशः धावत आला आणि म्हणाला, 'मियाँ, गोल कर डाला !'

'मियाँ' हा शब्द जरा विचित्र आहे मुस्लीम सद्गृहस्थाला नेहमी 'मियाँ' म्हटलं जातं; पण काही टिंगल उडवण्यासाठीही तो उच्चारला जातो. तो कसा उच्चारला जातो ह्यावर त्यामागची भावना वळते. अजितपालनं अगतिक होऊन मला मियाँ म्हटलं होतं.

मी पेनल्टी–कॉर्नर मारण्यासाठी उभा राहिलो. माझे सर्व साथीदार मोठ्या अपेक्षेने माझ्याकडे पहात होते. क्षणभर वाटलं ज्या भारतीय हॉकीने सातत्याने माझ्यावर अन्याय केला, त्याचा बदला घ्यावा ! एकदाचा सूड उगवून टाकावा ! पण हा अभद्र विचार क्षणभरच टिकला. आमचं कुराण आम्हाला शिकवतं की अल्लावर, पैगंबरावर आणि राष्ट्रावर श्रद्धा ठेवा ! माझ्या वैयक्तिक दुःखापेक्षा माझ्या राष्ट्राशी एकनिष्ठता जास्त महत्त्वाची होती. मला जास्त प्रिय होती.

मी 'डी'वर उभा राहिलो. पुन्हा एकदा तावीज ओठाला लावला. गोविंदाने चेंडू अगदी योग्य पुश केला. अजितपालने तो अडवला. गोलच्या डाव्या कोपऱ्यात चेंडू मारण्याचा निश्चय मी आधीच मनातल्या मनात पक्का केला होता. चेंडूवर स्टिक उगारणार इतक्यात लक्षात आलं, मलेशियन गोलकीपर त्याच्या उजवीकडे, म्हणजे गोलाच्या डावीकडे सरकतोय.

'राइट' आतून आवाज आला. पवित्रा चुकीचा होता, शरीराचा तोल बरोबर नव्हता; पण तरीही मी उजवीकडे चेंडू फटकावला. चेंडूने गोलची रेषा ओलांडली. संपूर्ण स्टेडियमभर शांतता पसरली. मलेशियन पाठीराख्यांचा उत्साह क्षणात मावळला !

पुढच्या क्षणाला माझ्या साथीदारांनी आनंदाने मला मिठ्या मारल्या. बरोबरी झाली होती. त्यामुळे जादा वेळ मिळाला. नंतर हरचरणने गोल मारला. आम्ही जिंकलो !

बलबीर अक्षरशः लहान मुलासारखा रडत होता.

'मला वाटतं मी तुमच्या विश्वासास पात्र ठरलो !' बलबीरला मी म्हटलं.

त्यानं मला मिठी मारली आणि म्हणाला, 'नको, नको. मला स्वतःची लाज वाटेल असं बोलू नकोस. आज तू आम्हाला वर उचललंयस !'

मॅच संपल्यावर मी पूर्णपणे थकलो होतो. मानसिकदृष्टया तर जास्तच ! माझी अम्मा नेहमी मला सांगते अशा वेळी भरपूर खावं ! मी जेवणावर ताव मारत होतो. इतक्यात फोनची बेल वाजली. बलबीरचा फोन होता

'तू आज प्रार्थनेसाठी मशिदीत जाणार आहेस का ?' त्याने विचारलं.

'हो, पण का ?' –मी.

'एकटा जाऊ नकोस, मी तुझ्याबरोबर येतोय !' बलबीर म्हणाला.

दुसऱ्या दिवशी पाकिस्तानबरोबर मॅच होती...मी आणि बलबीर 'शाही' मशिदीत गेलो. तिथे पाकिस्तानी खेळाडूही होते...त्यांचा तो सेंटर–फॉरर्व्ड रशिद तिथे भेटला. माझ्याबरोबर बलबीरला पाहून त्याला आश्चर्य वाटलं.

तो खवचटपणे म्हणाला, 'तू काय चालवलंयस काय ? आज बरोबरी साधणारा गोल मारलाय आणि आता बलबीरला चक्क मशिदीत घेऊ आलायस ?'

आणि मग गालातल्या गालात हसत, बलबीरकडे बघून म्हणाला, 'पुढचा विचार काय ?'

मी त्याच्या टोमण्याकडे लक्ष दिलं नाही. अल्ला पुढे गुडघे टेकून फक्त एकच त्याला सांगत होतो– 'उद्या पाकिस्तानबरोबर विजय मिळू दे !'

बलबीर पहिल्या रांगेत बसून प्रार्थना करत होता. तिथे जमलेले मलेशियन्सही बलबीरला पाहून चक्रावून गेले. बलबीरने त्यांना सांगितलं,

'आम्ही असेच आहोत ! आम्ही एकत्र खेळतो आणि एकत्र प्रार्थना करतो. आमच्या इथे अस्लमही आमच्याबरोबर गुरुद्वारात येतो.'

परतताना पुन्हा एकदा रशीद आमच्याकडे पाहून शहनाझला हसतहसत म्हणाला,

'कळलं का शन्नू, उद्या इंडिया जिंकणार !'

'का, तू खेळत नाहीस म्हणून की काय ?' शहनाझने विचारलं.

'नाही रे, बलबीरला पहातोयसनं ! तो आयुष्यात पहिल्यांदाच अल्लाला प्रार्थना करायला आलाय...आणि अल्ला पहिल्या प्रार्थनेला नेहमीच साद देतो !'

रशिदचे बोल खरे ठरले ! आम्ही जिंकलो ! आम्ही विश्वचषक हस्तगत केला !

त्या दिवशी मलेशियात स्थायिक झालेल्या भारतीयांनी आमच्या ड्रेसिंगरूमला अक्षरशः घेराव घातला. माझ्या सवंगड्यांनी मला अक्षरशः ड्रेसिंगरूमबाहेर ढकललं ! हजारो हात हालताना दिसत होते.

माझं हृदय भरून आलं. मीही त्यांच्या दिशेने हात हलवायला लागलो; पण खरं सांगू, मी हात हलवावे असं तिथे जवळचं कुणीच नव्हतं. वडलांनी जग सोडलं होतं आणि अम्मा तिथे दूर भोपाळात होती. एव्हढं मोठं यश मिळूनही मी त्याक्षणी एकटा होतो !

माझ्या आनंदात सहभागी होणारं कुणीही नव्हतं. ज्यासाठी केला होता अट्टाहास ती मंझील आज माझ्या मुठीत होती...

( क्रमशः )

## रंगभूमी

# डबल–डेकर

### ट्रिपा यशस्वी होणार !

'नाट्य–सुमन' या संस्थेतर्फे सुरेश प्रिप्रोडिया–लिखित आणि शशिकांत निकते–दिग्दर्शित 'डबल डेकर' हा फार्स नुकताच रंगभूमीवर झाला.

श्रीनाटयदेवता, श्रीगजानन आणि श्रीप्रेक्षक या सगळयांना 'नमिले सु-मनाने' असा पुकारा झाल्यानंतर पडदा उघडतो आणि अनेक धमाल घटनांचा एक भरधाव प्रवाह सुरू होतो. आनंद (शशिकांत निकते) नावाचा विवाहित तरुण, नव्वद नंबरच्या डबल–डेकरमधून प्रवास करताना कोणत्या ना कोणत्या तरुणीशीं त्याचे हमखास लफडे जमायचे आणि मग ते निस्तरण्यासाठी तो आणि या कामी त्याला अनिच्छेने का होईना पण हमखास साथ देणारा त्याचा मित्र एकनाथ (लक्ष्मीकांत बेर्डे) यांची धावपळ उडायची. आनंदचे असेच एक नवे लफडे–विमल (रुही) पहिल्याच भेटीत आनंदने विमलला लग्नाचे वचन दिले. भरीस भर म्हणून तिला आपल्या घराशेजारच्याच रिकाम्या जागेत राहण्यास आणले. नाटकाची सुरुवात होताना रंगमंचावर फक्त आनंद एकनाथची वाट पाहात उभा असतो. त्यानंतर प्रवेश करणाऱ्या प्रत्येक पात्राबरोबर–एकनाथ, विमल, शैला (भावना)–आनंदची पत्नी, गजानन झेंडे (रवींद्र बेर्डे) वडील–इत्यादी प्रत्येकाच्या प्रवेशाबरोबर या फार्समधील एका नव्या घोळाला आणि नवनव्या घोटाळयांना सुरुवात होते. फार्समधील हे घोळ आणि घोटाळे म्हणजे निरनिराळया विनोदी घटनांची गुंतागुंत किंवा फक्त शब्दांच्या विनोदी कसरतीने बांधलेल्या एकमेकांनंतर घडणाऱ्या घटनांची रांग नसते, तर एका चढत्या क्रमाने आणि अत्यंत पद्धतशीरपणे या घटना एकीमधून दुसरी, दुसरीमधून तिसरी अशा बाहेर पडत असतात. प्रत्येक पात्राचा प्रवेश हासुद्धा या घटनांच्या चढतेपणाला पूरक ठरणाराच असावा लागतो. 'डबल–डेकर'मध्ये लेखक सुरेश प्रिप्रोडिया हे भान ठेवण्यात आत्यंतिक यशस्वी झाले आहेत. केवळ रंगमंचावर वावरणारी मानवी पात्रेच नाहीत, तर रंगमंचावरील स्थावर सामान–दारूचे कपाट, उंच स्टूल, सोफा–हेसुद्धा या फार्सच्या घटनाप्रवाहात सामील होते आणि एक पात्र म्हणून त्याची रंगत वाढवायला मदत करते. (यात दिग्दर्शक शशिकांत निकते यांचाही वाटा मोठा असावा.) केवळ घोटाळयांची पद्धतशीर मांडणी करूनच फार्समध्ये भागत नाही, तर शेवटच्या मोजक्या मिनिटांमध्ये त्याची निस्तरानिस्तर करून प्रेक्षकाला हसते ठेवावे लागते. बहुतेक फार्समध्ये शेवटच्या याच मोजक्या मिनिटांमध्ये प्रेक्षकाच्या चेहऱ्यावरील हसण्याचे जांभईत रूपांतर करण्याचे सामर्थ्य असते. 'डबल–डेकर'मध्ये सुदैवाने हे सामर्थ्य नाही. प्रिप्रोडियांनी आधी घातलेले सर्व घोळ अक्षरशः एका हाताच्या बोटांवर मोजता येतील इतक्या थोडक्या वेळात आटोपल्याने 'डबल–डेकर' आपले हसविण्याचे इंजिन न थांबवता शेवटच्या मुक्कामापर्यंत पोहोचते. लेखक म्हणून प्रिप्रोडियांनी इतकी जोरदार लेखणी गाजवल्यानंतर दिग्दर्शक शशिकांत निकत्यांचे काम बरेच सोपे झाले होते. मुळात नाटकाची निवड आणि त्यातील पुरुष भूमिकांसाठी पात्रांची निवड या गोष्टींमध्ये डिस्टिंक्शनइतके मार्क निकत्यांनी मिळवले. स्वतः शशिकांत निकते, लक्ष्मीकांत बेर्डे आणि रवींद्र बेर्डे या तिघांची कामे अतिशय अफलातून झाली. शशिकांत निकते तीन–चार वेळा काही अतिरेकी बालिश चेष्टिते करतात; पण ती अपवादभूत. मुख्य म्हणजे फार्समधील द्वयर्थी संवादांचे कोलीत तोंडात मिळूनही कुठेही प्रिप्रोडियांचा दादा कोंडके न बनवण्याची खबरदारी शशिकांत निकत्यांनी घेतली आणि तरीही (किंवा खरे म्हणजे त्यामुळेच) डबल–डेकरच्या विनोदाचा वेग कोणत्याच ठिकाणी कंटाळवाणा होत नाही. लेखन–त्यामधील घटनांपासून व्यक्तिचित्रणापर्यंत आणि रंगमंचावरील हालचाली यांमध्ये प्रिप्रोडिया आणि शशिकांत निकते या दोघांनीही घेतलेले स्वातंत्र्य फार्सच्या इतर गुणवैशिष्टयांमुळे खपून जाते, त्यामुळेच 'एकनाथ बायकोला फोन करतो की नाही ? केल्यास केव्हा ?' असे चिल्लर प्रश्न किंवा इतर वेळी कथानकातून संदर्भ म्हणून येणाऱ्या, पण या फार्समध्ये मोकळया राहणाऱ्या जागा आपल्या डोक्यातही येत नाहीत. रंगमंचावर नव्याने येणारा प्रत्येक घोटाळा ठळकपणे आपल्या डोक्यात मारला जात असतो आणि आपल्याला सुसाट हसवत ही डबल–डेकर धावत असते.

'डबल–डेकर'बद्दलची सर्वांत महत्त्वाची तक्रार त्यातील स्त्रीपात्रांबद्दल. फार्समध्ये घडणाऱ्या घटनांमध्ये–घोटळयांमध्ये या पात्रांचा सहभाग खूपच मोठा होता; पण बहुतेक वेळा 'डबल–डेकर'मध्ये हा सहभाग जाणवत होता तो लेखकाच्या लेखणीमधून आणि इतर पात्रांच्या प्रतिक्रियांमधून. रुही आणि स्वाती बोवलेकर या दोघीजणी म्हणजे गुळगुळीत चेहऱ्याच्या ठोकळचा होत्या, तर भावना म्हणजे एकदम विरुद्ध टोक ! चेहऱ्याचे सर्व स्नायू आकसून घेऊन टिटॅनसच्या रोग्यासारखा एकाच वेळी हसरा आणि रडका चेहरा करून वावरणाऱ्या भावनांचा वेगवेगळया भावछटा दाखवणारा मुद्राभिनय पहाणे म्हणजे एक भयंकर शिक्षाच होती. जणू आपले नाव, भाव–ना त्या सार्थ करीत होत्या. त्याऐवजी तिचीही भूमिका निकते किंवा एखाद्या बेर्ड्यांनी केली असती, तर ती अधिक सुसह्य झाली असती. पुरुषपात्रांच्या निवडीत डिस्टिंक्शन मिळवणाऱ्या दिग्दर्शक निकत्यांना स्त्रीपात्रांच्या निवडीत तेहतीसचे पस्तीस करून पास करणेही कठीण वाटते.

लेखन आणि सर्व पुरुषपात्रांचा समर्थ अभिनय या दोन चाकांवर भक्कमपणे उभी राहिल्यामुळे या डबल–डेकरला प्रकाश वा संगीताचे जॅक लावण्याची काही जरुरच उरली नाही.

'ती पाहताच बाला' पाठोपाठ हा दुसरा अधिक सरस मराठी फार्स प्रदर्शित झाला. या 'डबल–डेकर'च्या भरपूर यशस्वी ट्रिपा होवोत, ही सदिच्छा !

**–डॉ. सदानंद बोरसे**

# बावनखणी

## अंमळ फसवणूकच झाली

बावनखणी ही पेशवाई-काळातील पुण्यातील नाच–गाणं करणारी गणिकांची वस्ती. मुळात आम्हाला या बावनखणीबद्दल आणि गाण्याबद्दल प्रेम असल्याने आम्ही या विसाव्या शतकातील बावनखणीत गाणं ऐकायला गेलो. ' क्या सुनाऊँ ? आम्ही एखाद्या हिंदी गाण्याची फर्माइश सुरू करू अशी बैठकीच्या मध्यभागी बसलेल्या मध्यमवयीन बाईची कल्पना झाली. आम्ही गझलची फर्माइश केली. पुरे वीस रुपये खर्चून आम्ही ' जब हम नहीं होंगे तो वफा कौन करेगा ' ही गझल परवडत नसताना ऐकली आणि परतलो. असो. विषयाशी साधर्म्य असल्याने मुद्दाम ही आठवण आली.

विद्याधर गोखले यांच्या ' बावनखणी'ची जाहिरात पाहिली आणि आम्ही धावतपळत गेलो. (९॥ ला पडदा वर म्हणजे वर जाणार ! ) प्रयोग पाहिल्यानंतर मात्र अंमळ फसगतच झाली.

सुरुवातीस नाटककाराचं निवेदन–

भाण नामक नाट्यप्रकारावर (गद्य–पद्य-युक्त एकपात्री नाट्यप्रकार ) आधारलेलं; पण बहुपात्री असलेलं. आगळ्या आणि वेगळ्या शैलीतलं, संगीत–नृत्यमय नाटक बावनखणी. द्वितीय बाजीरावाच्या कारकिर्दीत पुण्याच्या विख्यात बावनखणीचे चार तासांत दर्शन घडविण्याचा प्रयत्न ह्या नाटकात केला आहे.

त्या काळच्या समाजात सुज्ञजनांची कामशक्तीकडे पाहण्याची वृत्ती विटकी नव्हती, विकृत नव्हती तर निरोगी होती. बावनखणीकडे हीन विषय, सुखाचा उकिरडा म्हणून ते पाहत नव्हते तर संगीत–नृत्य त्रिकलांचं निधान म्हणूनच सुज्ञ व सुसंस्कृत माणसं ह्या वस्तीकडे पाहत होती.

ही विचारधारा ह्या नाटकात अथपासून इतिपर्यंत अनुस्यूत आहे. नेहमीच्या पद्धतीचं हे सुश्लिष्ट बांधणीच्या कथानकानं नाटक नव्हे. जणू काही बावनखणी हीच या नाटकाची नायिका आहे, हे लक्षात ठेवून ह्या वेगळ्या धरतीच्या नाटकाची रंगत लुटावी.

' ललितकलादर्श'च्या या नाटकात भालजी आणि फैय्याज ही आघाडीची जोडी असल्याने आम्ही नाटक पहाण्यास सरसावून बसलो. आजूबाजूला नाट्यक्षेत्रातली थोरथोर मंडळीही होती.

खंडो शंकर हा पेशव्यांचा बावनखणीचा संरक्षक राखणदार, गजरेवाला. पहिले दोन अंक खंडो शंकर आपल्याला या बावनखणीत गजरे वाटीत, निरनिराळ्या स्वरूपसुंदर गायिकांच्या महालातून फिरवून आणतात.

पेशव्यांच्या या विख्यात बावनखणीत निरनिराळ्या प्रकारचे लोक येत होते, हे दाखवून देण्यासाठी विद्याधर गोखल्यांनी जॉन्सन या गोऱ्या पात्राची निर्मिती केली आहे. हा जॉन्सन रोशनवर प्रेम करणारा, तिच्या नजरेचा ॲरो आमच्या दिलातील सॉरी नष्ट करतो ' असं म्हणून– ' मिठी मिठी नाइटिंगेल, व्हेरी व्हेरी रंगेल ' हे गाणं इंग्रजी पद्धतीनं गाऊन, नाचून आणि (संगीत नाटकाचा उद्देश पार पाडून ) पंधरा–वीस मिनिटे खाऊन पडद्याआड होतो. या बावनखणीत इंग्रजी गोरे अधिकारीसुद्धा यायचे, एवढंच या निमित्ताने गोखल्यांना सांगायचंय. ह्या रोशनच्या रंगमहालात जाण्यासाठी सर्जेराव मोहिते ( ९६ कुळी खानदानी मराठा ) व त्याचा बाप एकाच वेळी येतात आणि चक्क भांडणेसुद्धा होतात.

पेशव्यांचे सावकार श्रीधरपंतही नित्याने बावनखणीत येत असतात. हे श्रीधरपंत– ' अग मी शुचिर्भूत ब्राह्मण दे ग रतिदान या मंगल वेळी मज सुसयज्ञ सांगता ' ह्या गाण्याद्वारे चंपा नायकिणीकडे रतिसुख मागतात. चंपा त्याचा अपमान करते व लाथ मारून हाकलून देते. (श्रीधरपंत खंडो शंकरजवळ रतिसुखासाठी चंपाच्या पायावर डोके ठेवल्याचे कबूल करतात. ) हा अपमान झाल्यावर त्याचे स्वर्गस्थ पितर स्वप्नात येऊन त्याला सतावतात, शिव्याशाप देतात. श्रीधरशेठ कंटाळून प्रायश्चित्त घेण्याचे ठरवितात.



बावनखणीत पंचायत भरते. भांगेच्या तारेत असलेली पंचमंडळी वेश्याशास्त्राच्या नियमानुसार श्रीधरपंतांकडून ह्या लाथप्रकरणात काहीही पापाचरण न झाल्याचे सांगतात.

हे श्रीधरपंत गायब झाल्यानंतर होनाजीरावांचा शिष्य, बावनखणीत बसंती बेळगावकरणीकडे दाक्षिणात्य संगीताची खंडणी वसूल करावयास येतात. हे शिष्य 'वाजे झननूझन तानपुरा' हे गाणे गाऊन स्वतःची शास्त्रीय संगीतातली ओळख पटवून दिल्यावर बसंती खंडणीदाखल– 'जाऊ नको मनरंगा रे सुखसजना सोडुनिया' हे गाणे (द्वंद्वगीत) होते.

होनाजीरावांच्या शिष्यानंतर मोरोबा हे प्रकांडपंडित बावनखणीतल्या शालूमागे खास पेशवाई ब्राह्मणीभाषेत लगट करीत हिंडतात. ह्या म्हाताऱ्याला कोणी (नायकिणी) जवळ करीत नसल्याने, मोरोबा व महंत महाबळेश्वर खंडो शंकराला जबाबदार धरतात.


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

**मूल्य दहा रुपये**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**


## 'ती' कुठेच दिसली नाही!

दुसऱ्या अंकात फैय्याजचा प्रवेश होतो. ही चंद्रा देवाशिवाय इतर कोणापुढं नाच–गाणं न करणारी. देवाची पूजा करून बैठकीत येते. त्या वेळी........(अगदी सुरेखच!) खंडो शंकर ऊर्फ भालजींचं गाणं–'दोन ही हसरी निरांजने' ह्या गाण्यातल्या –'कळे कोणा न कश्या तेविती ज्योती तेलाविनी' यातला 'तेलाविनी' हा शब्द आम्हाला पहिल्या रांगेतही बराच प्रयत्न करून ऐकावा लागला. आता नेमका त्या दिवशी खंडो–शंकरांचा वाढदिवस! वाढदिवसाची भेट म्हणून चंद्रा ऊर्फ फैय्याज–'प्रीतीचा कल्पतरु जो मला लाभला, जीवना दिव्यतम गंध त्याने दिला', हे सबंध नाटकातील एकमेव चांगले गाणे सुस्पष्ट, नाजूक स्वरांच्या हेलकाव्यावर प्रेक्षकांच्या टाळ्या घेत म्हणते.

कुणाची सोबत न मिळालेले, मोरोबा व महंत महाबळेश्वर हे खंडो शंकरच्या प्रेमात बिब्बा घालण्यासाठी चंद्राला बाजीरावाच्या दरबारात होलिकोत्सवाच्या प्रसंगी गाण्याचे आमंत्रण देण्याचे कारस्थान यशस्वीपणे करतात. चंद्राने गाण्याला नकार दिला तर ती जबाबदारी खंडो शंकरची. चंद्रा खंडो शंकरचे प्राण वाचावे म्हणून तयार होते.

तिसऱ्या अंकात बाजीरावाचा दरबार भरतो. चंद्रा दरबारात प्रवेश करते. महंत, मोरोबा व इतरजण खाकरणे वगैरे प्रकार करतात. चंद्राने गायला सुरुवात केल्यानंतर नाही त्या ठिकाणी दाद देऊन त्रास देण्याचा प्रयत्न करतात. शेवटी चंद्राला गाणे अशक्य झाल्यावर–गाण्याला बाजीरावाशिवाय इतर कोणी दाद द्यायची नाही असा वटहुकूम विसाजी काढतात. तरीही खंडो शंकरने दाद दिल्यावर त्याच्या नावाने बोंब मारतात. बाजीराव मध्यस्थी करतात. मग परत चंद्राची–'मोरे महाराज–ओ मेरे सजना, मोरे सरताज' ही बंदिश होते. त्यानंतर–'कंदुकवती मी नवयुवती', 'प्रेमरंगामध्ये रंगली होलिका' व शेवटी सामूहिक 'आज ही सजली बावनखणी' हे गाणे झाल्यावर बावनखणीचा प्रयोग संपतो.

नाटककाराला अभिप्रेत असलेली, आमच्या पूर्वजांची काम–कलेकडे पहाण्याची दृष्टी मात्र आम्हाला नाटकात कुठेच आढळली नाही. उलट ती कुजकी–चिडकी असल्याचेच जाणवते. पहिले दोन अंक या विविध वारांगनांच्या रंगमहाली येणाऱ्या लोकांचे दर्शन घडविण्यातच खर्ची पडलेत. दुसऱ्या अंकाच्या शेवटापासून खंडो शंकर व चंद्रा यांच्या प्रेमकथेला सुरुवात होते. तिसऱ्या अंकात तर वेगवेगळ्या पद्धतीची नुसती गाणीच आहेत.

नाटककाराचे निवेदन आणि नाटक यांच्यात हा असा फरक सोडून दिला तर हे नाटक एका वेगळ्या पद्धतीचे आहे हे मान्य करावयास हवे.

नाटकाचे नेपथ्य चित्रकार द. ग. गोडसे यांनी अत्यंत सुंदररीत्या मांडले. त्या वेळच्या बावनखणीचे स्वरूप लक्षात घेऊन त्यांनी रंगमहालाचा सेट अतिशय सुंदर कलात्मक रीतीने सजवलाय.

खंडो शंकर आणि चंद्राच्या भूमिकेत भालजी आणि फैय्याजने अतिशय सुंदर कामे केली यात वाद नाही. त्याचबरोबर सुखदेव व बाजीराव पेशवे (अरविंद पिळगावकर), बसंती (नयना आपटे), मोरोबा (चंदू डेग्वेकर) इत्यादींनीही आपल्या भूमिका समजून पार पाडल्यात. नृत्याची बाजू संयोजनासहित माया जाधव यांनी चांगल्या रीतीने सांभाळली आहे.

–चारुदत्त बागूल